रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

रायगड | शुक्रवार । दि. ११ सप्टेंबर २०२६ । अंक ९७ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## वेधक

### मंत्र्याच्या भावाला बेदम मारहाण

**संभाजीनगर** : शेती आणि रस्त्याच्या वादातून राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या सख्ख्या भावासह पुतण्याला मारहाण झाल्याची घटना पैठण तालुक्यातील नायगाव खंडेवाडी येथे घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. अजित मोरेश्वर सावे (७०) आणि अमेय अजित सावे (३५), रा. खडकेश्वर, छत्रपती संभाजीनगर अशी जखमींची नावे आहेत. वादातून झालेल्या मारहाणीत दोघेही जखमी झाले असून, त्यांना बिडकीन येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच बिडकीन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच रुग्णालयात दाखल जखमींची विचारपूस करून त्यांचे जबाब नोंदविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

### विद्यार्थ्यांच्या लढ्याला मोठे यश

**मुंबई** : एमपीएससी मुख्य परीक्षा २०२५ मधील पेपर लीक प्रकरणावरून विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाला अखेर यश आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत मुख्य परीक्षा २०२५च्या उत्तरपत्रिकांचे रिचेकिंग करण्यास मान्यता देण्यात आली असून, २०२५च्या मुलाखतींना तात्काळ स्थगिती देण्यात आली आहे. दळवी समितीच्या शिफारशीनुसार पुनर्तपासणी करून नव्याने निकाल जाहीर करण्यात येणार आहे. तसेच मुलाखतींमध्ये जास्त गुण देण्यास आळा घालण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात येणार आहेत. यासाठी व्ही. राधा यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन केली जाणार आहे.

## मुंबई-गोवा महामार्गाच्या उद्घाटनाला येणार नाही

# मला लाज वाटतेय!

### कामाच्या विलंबाबद्दल नितीन गडकरी संतापले

**। गोवा । प्रतिनिधी ।**

गेल्या १८ वर्षांहून अधिक काळ रेंगाळलेल्या पूर्वीच्या मुंबई-गोवा महामार्गाला जणू ग्रहण लागल्याची स्थिती आहे. गेली अनेक वर्षे लोकार्पणच्या प्रतीक्षेत असलेल्या या महामार्गाची कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. महामार्ग रुंदीकरणाच्या कामाला होत असलेल्या प्रदीर्घ विलंबाबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या कामाला विलंब होत असल्याने आपल्याला लाज वाटत असल्याचे ते म्हणाले. याच कारणामुळे महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर उद्घाटन सोहळ्याला उपस्थित राहणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पणजी येथील पोरवोरिममध्ये त्यांनी



सहापदरी उन्नत मार्गाचे उद्घाटन केले. यावेळी गडकरी बोलत होते. मुंबई-गोवा महामार्गाची ते आता ऑक्टोबरमध्ये स्वतः पाहणी करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच मुंबई विमानतळापासून पान ५ वर

**२०११ मध्ये कामाला सुरुवात**

मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा प्रकल्प २०११ मध्ये सुरू झाला होता आणि तो २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. मुंबई आणि गोवा यांच्यातील प्रवासाचा वेळ साधारण १२ तासांवरून ६ तासांपर्यंत कमी करणे हा यामागचा उद्देश होता. मात्र, मुदत संपल्यानंतरही अनेक टप्प्यांवरील काम अपूर्णच राहिले. सुमारे १६,००० कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प होता.

**ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट, अधिकाऱ्यांचे निलंबन**

पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये विलंब किंवा निकृष्ट काम करणाऱ्यांची आता गय केली जाणार नसल्याचे गडकरींनी स्पष्ट केले. जबाबदार ठेकेदारांवर कारवाई करून त्यांना ब्लॅकलिस्ट केले जाईल. त्याचबरोबर निष्काळजीपणासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवरही निलंबनाची कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. एका वर्षात जास्तीत जास्त ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट करणे, त्यांच्यावर कारवाई करणे आणि दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचा रेकॉर्ड करायचा असल्याचे त्यांनी सांगितले.

## डिजिटल प्रणाली शेतकऱ्यांची डोकेदुखी!




- अल्पभूधारकांना मागणीनुसार खत मिळेना
- ४५ किलोच्या बॅगचा नाहक पडतोय भार

**४५ किलोची बॅग घेण्याची सक्ती**

रायगडमध्ये बहुतांश शेतकरी अल्पभूधारक आहेत. पाच ते पंधरा गुंठे क्षेत्र असलेल्या शेतकऱ्याला संपूर्ण ४५ किलोची खताची बॅग घेणे आवश्यक नसते. मात्र, एफएफएस प्रणालीमध्ये सुट्टे खत उपलब्ध होत नसल्याने गरजेपेक्षा अधिक खत खरेदी करण्याची वेळ येत आहे. त्यामुळे डिजिटल प्रणालीने सुविधा वाढण्याऐवजी अल्पभूधारकांची कोंडी केल्याचे चित्र आहे.

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांचे हेलपाटे कमी करून घरबसल्या खत उपलब्ध करून देण्याच्या गाजावाजात कृषी विभागाने सुरू केलेली एफएफएस

> ई-पीक पाहणी सध्या बंद आहे. ही पाहणी वेळेवर होणे अपेक्षित आहे. अन्यथा भात खरेदीवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच ऑनलाईन खत खरेदीचा फटका अल्पभूधारक शेतकऱ्यांना बसत आहे. अपेक्षित साठा उपलब्ध होत नाही.
> – डॉ. रवींद्र पाटील, उपाध्यक्ष, शेतकरी सभा, शेतकरी कामगार पक्ष

डिजिटल प्रणालीच रायगडच्या अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या डोकेदुखीचे कारण ठरली आहे. गुंठ्या-गुंठ्यावर शेती असलेल्या शेतकऱ्यांना गरजेनुसार अवघे दहा-बारा किलो खत हवे असताना डिजिटल प्रणालीमुळे थेट ४५ किलोची बॅग खरेदी करण्याची वेळ येत आहे. परिणामी, गरजेपेक्षा अधिक खत खरेदीचा आर्थिक भार शेतकऱ्यांवर पडत आहे. दुसरीकडे खरीप हंगामातील ई-पीक पाहणीलाही गेल्या आठ दिवसांपासून तांत्रिक ब्रेक लागल्याने शेतकऱ्यांच्या पान ५ वर

## सोलर पंप थेट शेतकऱ्यांच्या दारात

- शेतकरी कामगार पक्षाच्या मागणीची दखल
- सहा महिन्यांपासून रखडलेला प्रश्न अखेर मार्गी

**। गडचिरोली । प्रतिनिधी ।**

सहा महिन्यांपासून सोलर पंपाची प्रतीक्षा करणाऱ्या मुलचेरा तालुक्यासह अहेरी उपविभागातील शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळाला आहे. शेतकरी कामगार पक्षाने विद्युत विभागाला दिलेल्या निवेदनासह बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर विभागाने तातडीने हालचाली करत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या दारात



सोलर पंपाचे साहित्य पोहोचविले आहे. त्यामुळे रखडलेले सोलर पंप आता लवकरच शेतांमध्ये बसविले जाणार असून, शेतकरी कामगार पक्षाच्या पाठपुराव्याला यश आल्याचे बोलले जात आहे.

मुलचेरा तालुक्यासह अहेरी उपविभागातील अनेक शेतकऱ्यांनी सोलर पंप योजनेसाठी शासनाकडे आपली अग्रीम रक्कम वेळेत भरली होती. फेब्रुवारी महिन्यात पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी आपल्या हिस्स्याची अग्रीम रक्कम ऑनलाइन पद्धतीने शासनाकडे जमा केली. मात्र, रक्कम भरून तब्बल सहा महिन्यांचा कालावधी उलटूनही विद्युत विभागाकडून शेतकऱ्यांच्या शेतात सोलर पंप पान ५ वर

## ‘जलजीवन’बाबत भाजपचा दिखावा!

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

- पंधरा पट जास्त वेगाने घरांमध्ये नळाद्वारे पाणी पोहोचल्याचा दावा
- जिल्ह्यातील निम्म्याहून अधिक योजना निधीअभावी अद्याप अपूर्णच

रायगड जिल्ह्यातील शेकडो गावांमध्ये आजही नळाद्वारे पाणी पोहोचण्याची प्रतीक्षा कायम असताना, भाजपकडून मात्र जलजीवन योजनेच्या यशाचे ढोल बडविले जात असल्याचे चित्र समोर आले आहे. भाजपच्या दक्षिण रायगड जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत घराघरांत नळाद्वारे पाणी पोहोचविण्याचे काम पंधरा पट जास्त वेगाने झाल्याचा दावा करण्यात आला. मात्र, दुसरीकडे रायगड जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या तब्बल ६०२ योजना अद्याप अपूर्ण असून, राज्य सरकारकडून सुमारे १३० कोटी रुपयांचा निधी प्रलंबित असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे एका बाजूला पंधरा पट वेगाचा दावा आणि दुसऱ्या बाजूला निधीअभावी रखडलेल्या शेकडो योजना, या परस्परविरोधी वास्तवामुळे भाजपचा जलजीवन योजनेबाबतचा दावा कितपत खरा, असा सवाल आता राजकीय वर्तुळातून उपस्थित केला जात आहे.

भाजपच्या दक्षिण रायगड जिल्हा कार्यकारिणीची बैठक अलिबाग येथे गुरुवारी (दि. १०) पार पडली. या बैठकीमध्ये विविध राजकीय विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी राजकीय प्रस्तावासह अभिनंदनाचा प्रस्तावही सादर करण्यात आला. बैठकीत केंद्र व




राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती कार्यकर्त्यांसमोर मांडण्यात आली. याचदरम्यान जलजीवन योजनेच्या माध्यमातून घरांमध्ये नळाद्वारे पाणी पोहोचविण्याचे काम सरासरी पंधरा पट जास्त वेगाने झाले असल्याचा दावा अहवालाच्या माध्यमातून करण्यात आला.

मात्र, भाजपच्या बैठकीत मांडण्यात आलेल्या या दाव्याला रायगड जिल्ह्यातील प्रत्यक्ष परिस्थिती छेद देत असल्याचे चित्र आहे. केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन मिशन अंतर्गत ‘हर घर जल’ या संकल्पनेतून प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे पाणी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. प्रत्येक व्यक्तीला दररोज प्रतिमाणशी ५५ लीटर पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना रायगड जिल्ह्यात राबविण्यात आली.

रायगड जिल्ह्यामध्ये जलजीवन मिशनअंतर्गत एकूण १ हजार ४९२ योजना हाती घेण्यात आल्या आहेत. त्यापैकी ८९० योजना पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत असले, तरी तब्बल ६०२ योजना अद्याप अपूर्ण स्थितीत आहेत. म्हणजेच, जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणातील योजना अद्याप पूर्णत्वास गेलेल्या नाहीत. विशेष म्हणजे, या अपूर्ण योजनांसाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध होणे हीदेखील मोठी अडचण ठरत आहे. राज्य सरकारकडून जलजीवन मिशनसाठी सुमारे पान ५ वर

**१३० कोटींचा निधी प्रलंबित**

एका बाजूला ६०२ योजना अपूर्ण, दुसऱ्या बाजूला १३० कोटी रुपयांचा निधी प्रलंबित, तर तिसऱ्या बाजूला घरांमध्ये पाणी पोहोचविण्याचे काम पंधरा पट वेगाने झाल्याचा दावा, असा विरोधाभास रायगड जिल्ह्यातील जलजीवन योजनेबाबत निर्माण झाला आहे. त्यामुळे भाजपने बैठकीत मांडलेला दावा नेमक्या कोणत्या आधारावर करण्यात आला, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

### वाहनाच्या धडकेत महिला वकिलाचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगतच्या सेवा रस्त्यावर चालण्यासाठी गेलेल्या ३२ वर्षीय महिला वकिलाला भरधाव वाहनाने धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. अपघातानंतर जखमी महिलेला कोणतीही वैद्यकीय मदत न करता वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. याप्रकरणी आंतरराष्ट्रीय विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

प्रिया गोस्वामी (वय ३२, रा. द्वारका शिवम सोसायटी, सेक्टर २ ए, करंजाडे) असे मृत महिलेचे नाव आहे. प्रिया या वकिलीची प्रॅक्टिस पान ५ वर

## परप्रांतियांकडून स्थानिकावर हल्ला

### पत्नीसह मुलगी जखमी; स्कूटीची तोडफोड



**। उरण । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील द्रोणागिरी येथील निर्मल हाईट्स, सेक्टर ५० परिसरात अंगावर खरकटे पाणी उडाल्याचा जाब विचारणे एका लॉजिस्टिक्स व्यावसायिकाला चांगलेच महागात पडले. याच कारणावरून तेथील अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या परप्रांतीय व्यक्तींनी जमाव जमवून संबंधित व्यावसायिकावर तसेच त्याच्या पत्नी व लहान मुलीवर प्राणघातक हल्ला केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली असून, उरण पोलीस ठाण्यात तिघांसह १०-१५ अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रुपेश विनोद भोईर (३८, रा. जसखार) हे दि. ९ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ९.१५ वाजण्याच्या सुमारास आपल्या पत्नी व लहान मुलीसह स्कूटीवरून निर्मल हाईट्स, सेक्टर ५०, द्रोणागिरी येथून जात होते. त्याचवेळी तेथे अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या अंगावर खरकटे पाणी उडवले. याबाबत रुपेश भोईर यांनी जाब विचारताच पान ५ वर

### १९.२३ लाखांचा गुटखा जप्त

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड शहरातील अवैध व्यवसायांविरोधात पोलिसांनी धडक कारवाई सुरूच ठेवली असून, अवैध गुटखा विक्रीचा पर्दाफाश करत १९ लाख २३ हजार २९६ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला. या कारवाईत समीर वसंत पारेख (५२, रा. सरेकरआळी, महाड) यास अटक करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आणि महाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पान ५ वर




**चाकरमान्यांची ओढ गावाकडे | वृद्ध आई-वडिलांच्या डोळ्यांत अश्रू**

## रिकामी खेडी पुन्हा हसणार

**। कापोली । प्रतिनिधी ।**

एरव्ही घरात आम्हा दोघांशिवाय असतं तरी कोण? मुले रोजगारासाठी शहरात गेल्यावर ही रिकामी घरं खायला उठतात... कोकणातील एका वृद्ध मातेने व्यक्त केलेली ही खंत आज संपूर्ण रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील घराघरांचे जळजळीत वास्तव आहे. एरव्ही वर्षभर गावात केवळ वयोवृद्ध लोकच तुरळक दिसतात. मात्र, लाडक्या गणपती बाप्पाच्या आगमनाला अवघे दोन दिवस उरले असल्याने, आतापासूनच प्रत्येक वृद्ध आई-वडिलांचे डोळे लेकरांच्या आणि नातवंडांच्या वाटेकडे लागले आहेत. पोरांना वर्षातून एकदा का होईना घराची ओढ लावणाऱ्या बाप्पाचे आभार मानताना



आज प्रत्येक पालकाचे डोळे पाणावले आहेत.

या सणाच्या निमित्ताने एक गोष्ट मात्र प्रकर्षाने जाणवते की, गणपती बाप्पा घरात जरी आले, तरी आपले खरेखुरे दैवत म्हणजेच आपले आई-वडील घरात असल्याशिवाय कोणताच सण-उत्सव पूर्ण होऊ शकत नाही. आई-वडील घरात असतील, तर मुलांवरील जबाबदारीचा भार हलका होतो, कारण त्यांच्या अनुभवाची आणि मायेची सावली पाठीशी असते. याउलट, ते जर घरात नसतील, तर घराला घरपण लाभत नाही आणि सणाचा सगळा उत्साह फिका पडतो.

रोजगाराच्या निमित्ताने तरुण पिढी शहरात गेल्यामुळे ओस पडलेली ही खेडी आता गणपती बाप्पाचे विसर्जन होईपर्यंत तरी माणसांनी आणि आनंदाने पूर्णपणे फुलणार आहेत. गावातील या सणाचा आनंद तो वेगळाच असतो, एक प्रकारे ते ‘स्वर्गसुखच’ असते. शहरात कितीही सुबत्ता असली, तरी गावाकडच्या मातीतील मायेचा पान ५ वर

**घरांची रंगरंगोटी जोरात**

बाप्पाच्या स्वागतासाठी सध्या कोकणातील गावागावांत घरांना रंगरंगोटी करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. वर्षभर बंद असलेली कुलुपे उघडून चाकरमानी घर चकचकीत करण्यात व्यस्त आहेत. बाजारपेठांमध्ये इतर दुकानात हवी तशी गर्दी अद्याप नसली, तरी रंगांचे डब्बे घेण्यासाठी दुकानांमध्ये ग्राहकांची प्रचंड गर्दी पाहायला मिळत आहे. या मोसमात रंग विकणारे दुकानदार मात्र सध्या भलतेच तेजीत आहेत.

# माणगावात जुगार अड्ड्याचा पर्दाफाश | नऊ वाहने, २९ मोबाईलसह ७५.८२ लाखांचा मुद्देमाल जप्त



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरातील मुंबई-गोवा महामार्गा लगत कार्तिक हॉटेल समोरील एका इमारतीत सुरू असलेल्या कथित जुगार अड्ड्यावर माणगाव पोलिसांनी गुरुवारी (दि. १०) पहाटेच्या सुमारास धडक कारवाई केली. पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत ३२ जणांवर कारवाई करण्यात आली. घटनास्थळावरून ऑडी कार, दोन अर्टिगा, दोन मोटार सायकली, चार स्कुटी अशी एकूण नऊ वाहने तसेच २९ मोबाईल फोन पोलिसांनी ताब्यात घेतले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची प्राथमिक किंमत सुमारे ७५ लाख ८२ हजार २५ रुपये असल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे जुगारमाफीयांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, माणगाव शहरातील मुंबई-गोवा महामार्गावरील कार्तिक हॉटेल समोरील नारायण शेठ यांच्या मालकीच्या इमारतीमध्ये जुगाराचा प्रकार सुरू असल्याची माहिती माणगाव पोलिसांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी संबंधित ठिकाणी कारवाईचे नियोजन केले. गुरुवारी पहाटे सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला. समोरील बाजूने खोलीला कुलूप असल्याचे निदर्शनास आले. मात्र, पोलिसांनी मागील बाजूने अचानक प्रवेश केल्याने आत असलेल्या व्यक्तींमध्ये मोठी धावपळ उडाली. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात घेत ३२ जणांना ताब्यात घेतले. या कारवाईमध्ये हितेन छेडा हा मुख्य आरोपी असल्याची प्राथमिक माहिती असून, जुगारासाठी वापरल्या जात असल्याचा संशय असलेले २९ मोबाईल फोनही पोलिसांनी जप्त केले आहेत. याशिवाय घटनास्थळी आढळलेल्या नऊ वाहनांमध्ये एक ऑडी, दोन अर्टिगा, दोन मोटारसायकली आणि चार स्कुटींचा समावेश आहे.

जप्त केलेल्या वाहनांसह इतर मुद्देमालाची एकूण किंमत ७५,८२,०२५ रुपये असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात सुरू असलेल्या या कथित जुगार अड्ड्यावर पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलिसांनी ही कारवाई केली. या प्रकरणाचा पुढील तपास माणगाव पोलीस करीत असून, या जुगाराच्या प्रकारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही तपास होण्याची शक्यता आहे. दरम्यान, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर माणगाव शहर व परिसरात अवैध धंद्याविरोधात पोलिसांकडून कारवाई सुरू असल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. शहरातील अवैध जुगार, मटका व इतर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी अशाच प्रकारची कारवाई सातत्याने सुरू ठेवण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

---

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**११ सप्टेंबर**

१) श्रीम.अनुराधा सुभाष क्षीरे
चेंढरे, अलिबाग, ११-९-१९४७

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक,कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. हरिश्चंद्र लक्ष्मण पाटील स्मरणार्थ अलिबाग**

---

## सार्वजनिक सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे सूचित करण्यात येते की, याचिकाकर्ते श्री. विकास दादा निकम यांनी **विकास दादा निकम विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर** या शीर्षकाखाली, मुंबई येथील मा. उच्च न्यायालयात रिट याचिका (स्टॅम्प) क्र. १६८३३/२०२४ दाखल केली आहे.

सदर याचिकेत, इतर मागण्यांसह, विविध पोलीस ठाण्यांमध्ये नोंदविण्यात आलेल्या पाच प्रथम माहिती अहवालांचे (FIR) एकत्रीकरण आणि/किंवा संलग्नीकरण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सदर रिट याचिका महाराष्ट्र राज्य व इतर संबंधित प्राधिकरणे तसेच त्यामध्ये नमूद आरोपी/प्रतिवादी व्यक्तींविरुद्ध दाखल करण्यात आली आहे.

प्रतिवादी/आरोपी व्यक्तींना याद्वारे सदर कार्यवाहीची दखल घेऊन, प्रकरण मा. न्यायालयासमोर जेव्हा जेव्हा सुनावणीसाठी सूचीबद्ध होईल, तेव्हा मा. न्यायालयासमोर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सदर प्रकरण मुंबई येथील मा. उच्च न्यायालयासमोर दिनांक १६.०९.२०२६ रोजी सुनावणीसाठी सूचीबद्ध आहे.

**प्रतिवादींची नावे पुढीलप्रमाणे आहेत:**
1) भगवान बाळू कोंडाळकर (ठाणे)
2) सागर विष्णू बोराटे (रायगड)
3) सचिन बाळासो डोंगरे (सातारा)
4) मदन जहांगीर पाडवी (पुणे)
5) छगन जहांगीर पाडवी (नाशिक)
6) प्रविण दादा निकम (पुणे)
7) वंदनादेवी मदन पाडवी (पुणे)
8) शिवराज संजय खळदकर (पुणे)
9) विकास काशिनाथ निंभोरे (पुणे)
10) अब्बास सय्यद (ठाणे)

---

**कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना दिनांक 11.09.2026**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून पुढील कामांसाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे. **कामाचे नाव** - वरिष्ठ डिईएन/रत्नागिरी विभागांतर्गत बोगद्यांच्या नावाच्या फलकांचे रंगकाम. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-31, अंदाजित खर्च:** ₹ 13,76,550/-, **ईएमडी**- ₹ 27,500/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 05.10.2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)

---

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहीर निवेदन**
**जागा भाडयाने मिळणेबाबत**

म.रा.वि.वि. कंपनीच्या पनवेल ग्रा. विभागांतर्गत कोन, आजिवली तसेच खानावले शाखा कार्यालयासाठी, कोन, आजिवली तसेच खानावले तालुका-पनवेल जिल्हा-रायगड या परिसरात सुमारे ४०० चौ. फुट इतकी जागा भाडयाने घ्यावयाची आहे. तरी इच्छुक जागा मालकांनी त्यांची जागा कोणत्या दराने देण्यास ते तयार आहेत. याबाबतचे सीलबंद देयक कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, पनवेल ग्रामीण विभागीय कार्यालय, पनवेल यांचेकडे दिनांक ३०/०९/२०२६ पर्यंत सादर करावेत.

PRO NO - ०९० **कार्यकारी अभियंता, महावितरण, पनवेल ग्रामीण विभाग.**

---

## Tender Notice

**PANVEL MUNICIPAL CORPORATION**
**(Medical health department)**
**Tender Notice No: - PMC/MHD/02/2026-27**

The Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel invites Request for Proposal (TENDER) through e-tendering system from experienced and competent bidders for "Appointment of agency for Supply, Installation, Testing & Commissioning and Maintenance of Medical Gas Pipeline System at Dialysis centre, (Plot no. 16, Sector- 36, Kharghar) of PMC for 90 Days". The forms and the detailed information regarding the tender will be available on the website www.mahatenders.gov.in from Dt. 11/09/2026 to 28/09/2026 up to 12:30 PM. The completed tenders are to be uploaded from 11/09/2026 to 28/09/2026 up to 12:30 PM and the technical proposals will be opened on 29/09/2026 at 12:30 PM.

| Sr. No. | Name of Work No. | Cost of Blank Tender form (in INR) (to be paid Online only) | Earnest Money Deposit (in INR) (to be paid Online only) | Duration of Work |
|---|---|---|---|---|
| 1 | Appointment of agency for Supply,Installation, Testing & Commissioning and Maintenance of Medical Gas Pipeline System at Dialysis centre, (Plot no. 16, Sector- 36, Kharghar) of PMC | Rs. 1,000 + GST | Rs. 1,50,000 | 90 Days (3 Months) |

A pre-bid meeting will be held on 21/09/2026 at 12.30 pm at Conference room of the Panvel Municipal Corporation, Panvel.

The intimation of opening of Financial Proposal (Envelope-2) shall be sent to the shortlisted Bidders whose Technical Proposals are qualified.

Rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof are reserved by Commissioner, Panvel Municipal Corporation and whose decision will be final and legally binding on all the Bidders.

**Sd/-**
**Additional Commissioner**
**Panvel Municipal Corporation**
**Panvel**

---

**MAHAGENCO** Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## AMENDEMENT-1

**Tender Specification No.** CE(C)-III/ KGSC Pophali/ Rfx. No. 3000071596, 3000071597, 3000071599, 3000071600, 3000071602/2026-27.

| Sr No. | Name of Work | Estimated cost in Lakhs (Without GST) |
|---|---|---|
| 1 | Upgradation work of control room building at Transformer yard Stage-III, KGSC Pophali | 41.23 |
| 2 | Arresting leakage by fixing new GI sheeting at Stage-III tunnel, KGSC Pophali. | 10.00 |
| 3 | Construction of storm water gutters at Transformer Yard, Stage-III, KGSC Pophali. | 18.10 |
| 4 | Construction of storm water gutters in Stage -III Power house premises KGSC Pophali. | 22.06 |
| 5 | Providing furniture & partition at Control room S.Y. Stage-III, KGSC Pophali. | 12.37 |

**Sale Date:-** 29.08.2026 at 11:00 Hrs to 18.09.2026 up to 17:00 Hrs. | **Date of Submission:-** 19.09.2026 up to 17:00 Hrs.

**Contact person:-** Executive Engineer (C)(Mob-8879485202), O/o Chief Engineer (Civil) -III, M.S.P.G. Co. Ltd., Mumbai. **Fax :**(022)26581469 **Tel.No.** 022-69853619, E-MAIL ID:- cgmcivil3@mahagenco.in

**For further details visit our Website** https://eprocurement.mahagenco.in
**Agencies are requested to register themselves for this and future E-Tenders.**

---

**MAHAGENCO** Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## AMENDEMENT-1

**Tender Specification No.** CE(C)-III/ KGSC Pophali/ Rfx. No. 3000071604, 3000071814, 3000071815, 3000071816, 3000071817, 3000071818/2026-27.

| Sr No. | Name of Work | Estimated cost in Lakhs (Without GST) |
|---|---|---|
| 1 | Construction of toilet bathroom along with ladies room near store room building at T.Y. Stage -III, KGSC, Pophali | 18.58 |
| 2 | Construction of retaining wall at Transformer Yard, Stage-III, KGSC Pophali | 70.08 |
| 3 | Upgradation of tea room/dining hall at Stage-III, Power House, KGSC, Pophali | 8.14 |
| 4 | Construction of sedimentation tanks, water tank and allied works at Transformer Yard, Stage-III, KGSC Pophali | 59.36 |
| 5 | Upgradation of all toilet block units at S.Y. Stage -III Power House, KGSC Pophali. | 12.80 |
| 6 | Work of strengthening of CT foundations & other structures at S.Y., T.Y. Stage -III, KGSC Pophali. | 33.98 |

**Sale Date:-** 08.09.2026 at 11:00 Hrs. to 28.09.2026 up to 17:00 Hrs. | **Date of Submission:-** 29.09.2026 up to 15:00 Hrs.

**Contact person:-** Executive Engineer (C) (Mob-8879485202), O/o Chief Engineer (Civil) -III, M.S.P.G. Co. Ltd., Mumbai. **Fax :** (022) 26581469 **Tel. No.** 022-69853619, E-MAIL ID:- cgmcivil3@mahagenco.in

**For further details visit our Website** https://eprocurement.mahagenco.in
**Agencies are requested to register themselves for this and future E-Tenders.**

---

**उपविभागीय अधिकारी रोहा, उपविभाग रोहा यांच्या न्यायालयात जाहीर नोटीस**

आरटीएस विलंबमाफी अर्ज क्र.६७/२०२६

१. लिला सिताराम देसाई
रा. कल्याण, पो.जांभुळपाडा, ता.सुधागड, जि.रायगड
२. श्रीमती वंदना नरेंद्र पालवे मयत तर्फे वारस
२/१. विशाल नरेंद्र पालवे
२/२. प्रियांका नरेंद्र पालवे
२/१ व २/२ रा.शिव मंदिर जवळ,
कुरवंडे, लोनावळा, पुणे, ४१०४०२.
२/३. दर्शना मयुर वाजे — अपिलार्थी
रा. उद्धर, खवली, ता.सुधागड, जि.रायगड

विरूद्ध

१. नारायण बबन दळवी, मयत तर्फे वारस
१/१. श्रीमती ताराबाई नारायण दळवी
१/२. नामदेव नारायण दळवी
१/३. वसंत नारायण दळवी
१/४. दत्ता नारायण दळवी
अ.क्र. १/१ ते १/४ रा. भेलीव, ता.सुधागड, जि.रायगड
२. शांताराम बबन दळवी
रा. भेलीव, ता. सुधागड, जि. रायगड
३. कलाबाई दत्तु पालवे,
रा.माणगाव बु. ता. सुधागड
४. फुलाबाई सखाराम वाघमारे
रा. माठळ, ता.सुधागड, जि.रायगड
५. रामचंद्र शंकर अभ्यंकर
६. जगन्नाथ मोरेश्वर पवार — उत्तरार्थी
अ.क्र. ५ व ६ रा. जांभुळपाडा, ता. सुधागड,
जि. रायगड ४१० २०५
७. योगेश संपतराज जैन
रा. १३०३, ए १३ वा मजला, शांती कमल सी. एच. एस., बवालवाडी,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, चिंचपोकळी, परेल मुंबई
८. रजत अहलुवालिया
रा.डी-४०१, भगवती ग्रीन्स १, प्लॉट नं.६,
सेक्टर २३, खारघर, जि.रायगड ४१० २१०
९. तनुश्री जैन,
रा. घर नं.९९४, हातवारा मोहल्ला वार्ड नं.१२,
तळवेहट, ललितनी, उत्तरप्रदेश २८४१२६
१०. अनुपम मोहनती
रा. ५०३, मयुरेश इनक्लेव, प्लॉट नं.२११,
सेक्टर २०, नेरूळ पूर्व, नवी मुंबई ४०० ७०६
११. ग्राम महसूल अधिकारी सजा माणगांव बु.
१२. मंडळ अधिकारी जांभूळपाडा
ता. सुधागड, जि. रायगड

सर्व संबंधितांस या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते कि, अपिलार्थी यांनी या न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये मौजे भेलीव, ता.सुधागड येथील गट नं. १०३. २५९, २४८ या जमीन मिळकतीबाबत फेरफार नोंद क्र. १३७, ४७८, ७३४, ७४७, ८३७, ८३८, ८४५ च्या विरोधात अपील दाखल केले आहे.

सबब, या जाहीर नोटीशीद्वारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की या अपिलाकामी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. तरी संबंधितांनी दिनांक २८/०९/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता स्वत: अथवा वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे. नमुद तारखेस हजर न राहिल्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदरहू नोटीस माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे. दि. २८/०९/२०२६

दिनांक : २८/०९/२०२६ — सही/-
**उपविभागीय अधिकारी रोहा**
**उपविभाग रोहा**

---

दिनांक : १०/०९/२०२६

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे वानिवली, ता. खालापूर, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती सदर मिळकतींचे मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे वानिवली, ता. खालापूर, जि. रायगड**

| मालक/ कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| कुसुम लक्ष्मण तारु<br>यशवंत बाबू थोरवे<br>इंदुबाई पांडुरंग पवार<br>ताराबाई मारुती पवार | २२ | १ | १-०६.०० | १४.१३ |
| कुसुम लक्ष्मण तारु<br>यशवंत बाबू थोरवे<br>इंदुबाई पांडुरंग पवार<br>ताराबाई मारुती पवार | २२ | २ | ०-१२.०० | ०.१२ |
| कुसुम लक्ष्मण तारु<br>यशवंत बाबू थोरवे<br>इंदुबाई पांडुरंग पवार<br>ताराबाई मारुती पवार | २२ | ३ | ०-१३.३० पैकी ०-११.३० | ०.१३ |
| अनंत सखाराम थोरवे<br>तानाजी सखाराम थोरवे<br>रमेश सखाराम थोरवे | २२ | ५ | ०-०८.०० | ०.४२ |
| अनंत सखाराम थोरवे<br>तानाजी सखाराम थोरवे<br>रमेश सखाराम थोरवे | २२ | ६ | ०-४९.९५ | ७.४५ |
| वासंती अनिल कांबळे<br>बाळु कोंडु थोरवे<br>विष्णु कोंडु थोरवे<br>सुदाम कोंडु थोरवे<br>अनंता हरीश्चंद्र थोरवे<br>कुंदाबाई हरीश्चंद्र थोरवे<br>गणपत हरीश्चंद्र थोरवे<br>पांडुरंग हरीश्चंद्र थोरवे<br>भाग्यश्री भारत सालेकर | २२ | ७ | ०-३३.५० | ३.४४ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार यांचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यू. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील मालक/कब्जेदार यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. ११/०९/२०२६. **श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं.ए २, जय नगर को.ऑप हौ.सोसा.लि.,
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८
tushar.deore82@gmail.com

---

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**
**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड**

जा.क्र.७९१ **फॉम झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक १३/०७/२०२३ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १५/०७/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. घनश्याम मधुकर समेळ श्री स्वामी कृपा, ब्लॉक नं. २०२, दूसरा मजला, कासार आळी, ता. पेण, रायगड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक १५/०३/२०२३ पर्यतची रक्कम रूपये १४, ४८,९१९/- व दिनांक १६/०३/२०२३ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील ११.५० टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारणाने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकांनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकांराचा वापर करून

श्री. घनश्याम मधुकर समेळ यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन. पेण नगरपरिषद हद्दीतील ता. पेण मालमत्ता क्र.१४६१ क्षेत्रफळ ४८.६१३ चौ.मी

येथिल खालिल मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा वडखळ च्या दिनांक १५/०३/२०२३ रोजी येणे रक्कम रूपये १४,४८,९१९/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री.घनश्याम मधुकर समेळ**
श्री. घनश्याम मधुकर समेळ यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन.
पेण नगरपरिषद हद्दीतील ता. पेण मालमत्ता क्र.१४६१ क्षेत्रफळ ४८.६१३ चौ.मी

स्थळ : पेण
दिनांक : १०/०९/२०२६

**श्री अजित नामदेव भगत**
वसूली व विक्री अधिकारी पेण रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

---

**जाहीर नोटीस**
**अलिबाग येथील सिव्हिल जज्ज सिनिअर डिव्हिजन यांचे कोर्टात,**

दिवाणी चौकशी अर्ज ०१/२०१८
नि. ३४/ड
पु. ता. २८/०९/२०२६

जे. एस. डब्ल्यू स्टील लिमिटेड, — अर्जदार
विरूद्ध
श्रीमती पद्मूबाई जनार्दन पाटील वगैरे, — सामनेवाले

वर नमूद केलेल्या अर्जातील सामनेवाला क्रमांक ९/३) नलिनी मणिराम पाटील यांस मु. उबर्डे पोस्ट कोप्रोली तालुका पेण, जिल्हा रायगड यांस वेळोवेळी वकिलामार्फत अर्जाचे समन्स/नोटीस पाठविली असता बजावणी झालेली नाही.

तरी सदर सामनवाले यांस याद्वारे असे कळविणेत येत आहे की, या अर्जाची पुढील तारीख २८/०९/२०२६ रोजी असून सकाळी ११=०० वाजता या कोर्टात स्वतः अभवा प्राधिकृत व्यक्तीमार्फत त्यांनी हजर व्हावे व आपले म्हणणे द्यावी. त्याचप्रमाणे बजावणीकरिता स्वतःचा पत्ता दाखल करावा. अन्यथा तुमचा बचाव रद्द करण्यात येईल.

सदर तारखेस हजर होण्यास व जबाब देण्यास कसुरी केल्यास सदर तुमचे विरुद्ध योग्य तो हुकुम करणेंत येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख २४/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याने दिले.

**वरीष्ठ लिपीक** — **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, अलिबाग-रायगड** — कोर्टाचा शिक्का — **दिवाणी न्यायालय, अलिबाग-रायगड**

---

**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड**
**महसूल लोक अदालत नोटीस क्रमांक/आरटीएस/अपील क्र. २०५/२०२६**

दिनांक :- ९/०९/२०२६

१ श्री. कमलाकर हरिश्चंद्र पाटील
रा. डोलवी, ता. पेण, जि. रायगड — अपिलार्थी

विरुद्ध

१ श्री. रघुनाथ हरिश्चंद्र पाटील
रा.डोलवी, ता.पेण, जि.रायगड
२ गायत्री गणेश उतेकर उर्फ ललिता दत्तात्रेय पाटील
रा.सरफलेवाडी, पो.पुंडली, ता.रोहा, जि.रायगड
३ श्रीम. कल्पना हिरामण म्हात्रे
४ श्री. संकेत हिरामण म्हात्रे
५ श्रीम. माधुरी हिरामण म्हात्रे
६ श्रीम. अमृता हिरामण म्हात्रे
अ.क्र.३ ते ६ रा.कोलवे, पो.वडखळ, ता.पेण, जि.रायगड
७ श्रीम. नर्मदा धर्माजी कोठेकर
रा.गडब, ता.पेण, जि.रायगड
८ श्रीम. निर्मला नारायण म्हात्रे
रा.कोप्रोली, ता.पेण, जि.रायगड
९ श्रीम. कौसल्या महादेव पाटील
रा. रामवाडी, पिकोडा फर्निचरच्या बाजूला, ता.पेण, जि.रायगड
१० श्री. वामन वसंत पाटील — उत्तरार्थी
११ श्री. मच्छिंद्र वसंत पाटील
१२ श्री. शरद वसंत पाटील
अ.क्र.१० ते १२ रा.डोलवी, ता.पेण, जि.रायगड
१३ श्रीम. चंपाबाई रामदास भोईर
रा. धोंडपाडा, पो.कोप्रोली, ता.पेण, जि.रायगड
१४ श्रीम. सुभद्रा आत्माराम भोईर
रा. शहाबाज, ता.अलिबाग, जि.रायगड
१५ वासंती वासुदेव पाटील मयत तर्फे वारस
१५/१ श्रीम. मालती वासुदेव पाटील
रा. शिवभक्ती नगर, ठाणे बेलापूर रोड, तुर्भे स्टोर,
शिवसेना ऑफिसजवळ, नवी मुंबई-४००७०५
१५/२ श्री. महेश वासुदेव पाटील
१५/३ श्री. नरेश वासुदेव पाटील
अ. क्र. १५/२ व १५/३ रा. तरणखोप, ता.पेण, जि.रायगड
१६ श्री. दिनकर महादू पाटील
रा. पारिजात सोसायटी, चेंढरे, मारुती मंदिराजवळ,
ता.अलिबाग, जि.रायगड

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये दाखल अपील**
**'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत' अभियान अंतर्गत घेणेबाबत**

अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी पेण यांचेकडील अपील क्र. १७/२०२५, दि. १३/०३/२०२६ मधील आदेशाविरुध्द या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे.

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय संकीर्ण: मराअ-२०२५/प्र.क्र.२७/समन्वय-१, दिनांक १४/०८/२०२६ चे शासन निर्णयानुसार अर्धन्यायिक प्रकरणे जलद गतीने व दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने व तडजोडीने निपटारा करणेसाठी 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत' अभियान राबविणेत येत आहे.

अपिलार्थी यांनी या न्यायालयात दाखल केलेले अपील 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत' अभियानातंर्गत दि. ०५/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालय अलिबाग येथे तडजोडीने निपटारा करणेसाठी ठेवणेत आलेले आहे. सदर दिवशी आपण स्वतः अथवा आपल्या विधिज्ञासह उपस्थित रहावे.

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करीता**

# आरोग्यसेवेच्या नावाखाली जीवाशी खेळ?

**सोसायट्यांमधील दवाखान्यांची वैधता तपासण्याची गरज**

**प्रशासनाला संयुक्त धडक तपासणीचे आव्हान**



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहरात आरोग्यसेवेच्या नावाखाली रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असून याचा माघ घेणे गरजेचे आहे. येथील निवासी कॉम्प्लेक्स आणि गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये सुरू असलेले दवाखाने, क्लिनिक, पॅथॉलॉजी लॅब तसेच सॅम्पल कलेक्शन सेंटर यांची वैधता, आवश्यक परवानग्या आणि प्रत्यक्ष कामकाजाची पद्धत याबाबत उरणमधील नागरिकांकडून गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे प्रशासनाने कागदोपत्री कारवाईचा देखावा न करता थेट मैदानात उतरून संयुक्त धडक तपासणी करावी, अशी मागणी देखील करण्यात आली आहे.

उरणमध्ये निवासी वापरासाठी मंजूर असलेल्या फ्लॅटमध्ये वैद्यकीय व्यवसाय सुरू करताना संबंधित जागेचा वापर, आवश्यक स्थानिक परवानग्या, सोसायटीचा ना हरकत दाखला, वैद्यकीय नोंदणी, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन आणि इतर लागू नियमांचे पालन केले जाते का, हा मूळ प्रश्न आहे. काही ठिकाणी आवश्यक परवानग्या किंवा सोसायटीची संमती नसल्याच्या तक्रारी असल्याने प्रशासनाने प्रत्येक आस्थापनाची स्वतंत्रपणे कागदपत्रे तपासावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच दवाखाना, क्लिनिक किंवा प्रयोगशाळेत डॉक्टरांची फी, इंजेक्शन, ड्रेसिंग, विविध वैद्यकीय प्रक्रिया तसेच तपासण्यांचे शुल्क स्पष्टपणे दर्शविले जाते का, याबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. रुग्णाला उपचार किंवा तपासणीपूर्वी किती खर्च येणार हेच कळत नसेल, तर शुल्क आकारणीमध्ये पारदर्शकता कुठे आहे? रुग्णांना पावती किंवा बिल दिले जाते का, याचीही तपासणी होणे गरजेचे आहे. रुग्ण आणि त्याचे नातेवाईक उपचाराच्या गरजेपोटी मानसिकदृष्ट्या अडचणीत असतात. अशा परिस्थितीत शुल्काबाबत कोणतीही संदिग्धता राहू नये, यासाठी प्रशासनाने स्पष्ट नियमांचे पालन होत आहे की नाही हे तपासले पाहिजे. आरोग्यसेवा ही नागरिकांच्या मजबुरीचा फायदा घेण्याचा बाजार बनू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

त्याचबरोबर उरणमधील पॅथॉलॉजी लॅब आणि त्यांच्या नावाखाली सुरू असलेल्या शाखा अथवा सॅम्पल कलेक्शन सेंटरची वैधताही तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. एका प्रयोगशाळेच्या नावाखाली विविध ठिकाणी नमुने गोळा केले जात असल्यास प्रत्येक केंद्राची आवश्यक नोंदणी व परवानगी आहे का? नमुने कुठे तपासले जातात? प्रत्यक्ष तपासणी कोण करते? रिपोर्ट कोण तयार करतो? संबंधित पात्र व्यक्तीची जबाबदारी आणि मान्यता काय आहे? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने शोधणे आवश्यक आहे. एक परवाना दाखवायचा आणि त्याच्या सावलीत किती केंद्रे चालवायची? असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे. नमुना संकलन केंद्र आणि प्रत्यक्ष प्रयोगशाळा यांच्यातील नियमांचे पालन होते की नाही, याची प्रत्यक्ष पाहणी होणे गरजेचे आहे. खासगी प्रयोगशाळांमध्ये तपासल्या जाणाऱ्या नमुन्यांपैकी काही नमुन्यांचे शासकीय प्रयोगशाळेमार्फत क्रॉस-व्हेरिफिकेशन केले जाते का, याचीही प्रशासनाने तपासणी करावी, अशी मागणी आहे.

उरणकरांच्या आरोग्याशी खेळ होत असेल तर प्रशासनाने डोळ्यांवरची झापड काढावी. आरोग्यसेवेच्या नावाखाली नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारींचा बुरखा फाडण्यासाठी

### नियम मोडणाऱ्यांना मोकळे रान?

नियमांचे पालन करून प्रामाणिकपणे सेवा देणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांवर कोणताही आक्षेप नसून, नियमबाह्य पद्धतीने व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी व्हावी, एवढीच स्थानिक नागरिकांची मागणी आहे. मात्र, कोणत्याही आस्थापनाला राजकीय, आर्थिक किंवा प्रशासकीय दबावामुळे संरक्षण मिळत असल्याचे आढळल्यास त्याचीही चौकशी झाली पाहिजे. त्यामुळे नियम मोडणाऱ्यांना नोटीस आणि सामान्य नागरिकांना फेऱ्या हा कारभार आता चालणार नाही. प्रशासनाने आरोग्यसेवेशी संबंधित तक्रारींकडे गांभीर्याने पाहून सर्व आस्थापनांची समान निकषांवर तपासणी करावी, अशी मागणी होत आहे.

### कागदावर तपासणी नको

उरण शहरासह तालुक्यातील सर्व दवाखाने, क्लिनिक, हॉस्पिटल, पॅथॉलॉजी लॅब आणि सॅम्पल कलेक्शन सेंटरची अचानक संयुक्त तपासणी मोहीम राबविण्याची मागणी स्थानिकांमधून करण्यात आली आहे. या तपासणीत आस्थापनांची वैध नोंदणी, डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व संबंधित वैद्यकीय नोंदणी, जागेचा मंजूर वापर, सोसायटीचा ना हरकत दाखला, स्थानिक प्राधिकरणांच्या परवानग्या, जैववैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट, प्रयोगशाळेतील पात्र मनुष्यबळ, आवश्यक उपकरणे, स्वच्छता व सुरक्षितता व्यवस्था यांची तपासणी करण्याची देखील मागणी होत आहे.

आता कागदावरील चौकशी नव्हे, तर प्रत्यक्ष धडक कारवाईची गरज आहे. रुग्णांच्या जीवाशी संबंधित बाबींमध्ये कोणाचाही मुलाहिजा न ठेवता नियमांचा बडगा उगारला पाहिजे, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते घनश्याम कडू यांच्यासह उरणमधील नागरिकांनी केली आहे.

## निवडक

### कचऱ्यामुळे दुर्गंधीचे साम्राज्य



**रसायनी :** खालापूर तालुक्यातील मुंबई-पुणे जुन्या महामार्गालगत असलेल्या कलोतेरयती गावाकडे जाणारा रस्ता सध्या कचऱ्याच्या विळख्यात सापडला आहे. या रस्त्याच्या दुतर्फा हॉटेल, रिसॉर्ट व इतर आस्थापनांमधील अन्नमिश्रित व कुजलेला कचरा नियमितपणे टाकला जात असल्याने परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. कलोतेरयती मार्गावरून रयती गावासह विविध आदिवासी पाडे, फार्महाऊस, व्यसनमुक्ती केंद्रे तसेच धार्मिक संस्थांकडे नागरिकांची नियमित ये-जा असते. मात्र, रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने या मार्गावरून प्रवास करणे नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. अन्नमिश्रित कुजलेल्या कचऱ्यामुळे परिसरात भटकी कुत्री, जंगली प्राणी तसेच सापांचा वावर वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. डोंगरालगत व काही प्रमाणात दुर्गम भागातून जाणारा हा रस्ता दिवसा पायी जाणाऱ्या नागरिकांसाठीही असुरक्षित वाटत असून रात्रीच्या वेळी या मार्गाने प्रवास करणे अधिक धोकादायक ठरत असल्याची भावना स्थानिकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग, संबंधित रस्ते प्राधिकरण तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाची तातडीने दखल घ्यावी. रस्त्याच्या दुतर्फा कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, नियमित स्वच्छता व्यवस्था करावी आणि कलोतेरयतीकडे जाणारा हा रस्ता पक्का, सुरक्षित आणि कचरामुक्त करावा, अशी कळकळीची मागणी रयतीसह परिसरातील आदिवासी पाड्यांतील नागरिकांनी केली आहे.

### रस्त्यावरील खड्डा बनलाय डोकेदुखी



• (छायाचित्र: अनिल गवळे)

**वेनगाव :** कर्जत चारफाटा येथील नेरळ-माथेरान रस्त्याच्या मार्गावर मोठा खड्डा पडला असून, हा खड्डा येथे कर्तव्यावर असलेल्या वाहतूक पोलिसांची डोकेदुखी होऊन बसला आहे. या मार्गावरून जाणाऱ्या अनेक वाहनांना दक्षतापूर्ण वाहन चालवावे लागत आहे. अनेक छोटी मोठी वाहनांची चाके या खड्ड्यात अडकल्याने येथे लगेच वाहतूक कोंडी होते. त्यामुळे ही वाहतूक कोंडी सुरळीत करणे पोलिसांना जिकिरीचे होऊन बसले आहे. तसेच, बऱ्याच वेळा या खड्ड्यात चाक आपटून दुचाकींचा अपघात होऊन प्रवासी जखमी झाले आहेत. तर, बऱ्याच रिक्षा या खड्ड्यात जाऊन बंद पडल्याने वाहतूक पोलिसांना त्या बाहेर काढण्यासाठी सहकार्य करावे लागत आहे. हा रस्ता एमएसआरडीसी विभागाकडे वर्ग असल्याने गणपती सणाच्या अगोदर लवकरात लवकर हा खड्डा भरण्यात यावा, अशी मागणी येथील प्रवासी व वाहनचालकांकडून होत आहे.

## चित्रलेखा पाटील यांच्याकडून थळे कुटुंबियांचे सांत्वन



**। मापगाव । प्रतिनिधी ।**

विजय थळे यांच्या निधनानंतर शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या व राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी मापगाव येथे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनील थळे यांच्या घरी भेट देऊन थळे कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी चित्रलेखा पाटील यांनी सुनील थळे व त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधत दुःखात सहभागी होत धीर दिला. यावेळी त्यांच्यासमवेत ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, अनिल गोमा पाटील, अशोक नाईक, दीपक पाटील, माजिद कुर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## बैठका होतात, कारवाई कधी?

**। उरण । प्रतिनिधी ।**

सार्वजनिक गणेशोत्सव शांततेत व निर्विघ्न पार पाडण्यासाठी दरवर्षी पोलीस प्रशासनाकडून बैठका घेतल्या जातात. गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना कायदा व सुव्यवस्थेबाबत सूचना दिल्या जातात. मात्र, सण संपल्यानंतर काही दिवसांतच परिस्थिती पुन्हा जैसे थे होत असल्याने "बैठका होतात, पण ठोस कारवाई कधी?" असा संतप्त सवाल उरणकरांकडून उपस्थित केला जात आहे.

गणेशोत्सवाच्या काळात वाहतूक कोंडी, ध्वनिप्रदूषण आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून खबरदारी घेतली जात आहे. मात्र, उरण परिसरातील वर्षभराच्या समस्यांकडेही प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. उरण परिसरात बेकायदा आठवडा बाजारांनी थैमान घातले असून, भर रस्त्यातच बाजार भरविले जात असल्याने वाहतुकीचा अक्षरशः बोजवारा उडत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. वाहनचालक, पादचारी तसेच स्थानिक नागरिकांना या कोंडीचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच विविध ठिकाणी फेरीवाल्यांनी रस्ते व पदपथांवर अतिक्रमण केल्याच्या तक्रारी वाढत आहेत. परिणामी नागरिकांसाठी असलेले रस्ते आणि पदपथ व्यवसायासाठी वापरले जात असून, वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. दर सणासुदीला बैठका होतात, सूचना दिल्या जातात आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले जाते. मात्र, काही दिवसांनी पुन्हा बेकायदा बाजार, रस्त्यावरील अतिक्रमणे आणि वाहतूक कोंडी सुरू होत असेल, तर या बैठकांचा उपयोग तरी काय? फक्त कागदावरच्या सूचनांनी उरणकरांची वाहतूक कोंडी सुटणार आहे का? असा सवाल संतप्त नागरिकांकडून केला जात आहे.



## कर्नाळा परिसरातील वनजमिनीची डील?

**। उरण । प्रतिनिधी ।**

कर्नाळा परिसरातील वन विभागाच्या जमिनीबाबत सध्या मोठी खळबळजनक चर्चा सुरू झाली आहे. एका कंपनीच्या प्रकल्पासाठी वन विभागाच्या जमिनीशी संबंधित मोठ्या आर्थिक व्यवहाराची डील झाल्याची कुजबुज परिसरात सुरू असून, या चर्चेने प्रशासनाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. मात्र, या कथित व्यवहाराची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

वनजमीन ही खासगी मालमत्ता नसून तिचा वापर, हस्तांतरण अथवा बिगर-वनीकरणासाठी मंजुरी देताना केंद्र व राज्य शासनाच्या विविध कायदेशीर प्रक्रिया आणि परवानग्या लागू होतात. त्यामुळे एखाद्या कंपनीच्या प्रकल्पासाठी वनजमिनीचा वापर झाला असेल किंवा होणार असेल, तर त्यामागील जमिनीचा सर्व्हे क्रमांक, क्षेत्रफळ, मालकी हक्क, वनजमीन दर्जा, मंजुरी आदेश, वापरबदलाची परवानगी आणि संबंधित कंपनीचे नाव या सर्व बाबी स्पष्ट होणे गरजेचे आहे. रायगड जिल्ह्यातच वनजमिनीशी संबंधित वाद आणि कथित गैरव्यवहारांची प्रकरणे यापूर्वी समोर आली आहेत. त्यामुळे कर्नाळा परिसरातील या चर्चेकडेही प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे '२०० खोक्यांची डील' नेमकी कुठे झाली? कोणाच्या माध्यमातून झाली? कोणत्या जमिनीचा यात समावेश आहे? आणि संबंधित कंपनीला वनजमिनीचा वापर करण्यासाठी कोणत्या परवानग्या देण्यात आल्या आहेत? हे प्रश्न आता उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, कर्नाळा परिसरातील वनक्षेत्र पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील मानले जाते. अशा भागातील जमिनीबाबत कोणताही निर्णय होत असेल, तर तो नियमांच्या चौकटीत आणि पारदर्शक पद्धतीनेच झाला पाहिजे. कागदावर वनजमीन आणि प्रत्यक्षात कंपनीचा प्रकल्प, असा प्रकार असेल तर त्यामागचा संपूर्ण व्यवहार जनतेसमोर येणे आवश्यक आहे. याबाबत 'कृषीवल' प्रतिनिधींनी वनविभागाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

### समुपदेशकाला ३८ लाखांचा गंडा

**पनवेल :** खारघर येथील ज्येष्ठ समुपदेशकाला सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाइन 'पाच पैसा कॅपिटल' कंपनीच्या नावाने गुंतवणुकीची माहिती मिळाली. संबंधित लिंकला प्रतिसाद देत गुंतवणुकीची तयारी दर्शवल्यानंतर त्यांना एका व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये सहभागी करण्यात आले. त्यानंतर त्यांना टप्प्याटप्प्याने विविध खात्यांमध्ये पैसे भरण्यास सांगण्यात आले. त्यानुसार त्यांनी तब्बल ३८ लाख २२ हजार रुपये गुंतवले. मात्र, त्यानंतर गुंतवलेली रक्कम किंवा अपेक्षित नफा परत मिळाला नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तक्रार केली.

## दुचाकीच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील कोळखे येथे भरधाव दुचाकी चालविल्याने भीषण अपघात घडला. या अपघातातील १९ वर्षीय तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर, त्याचा मित्र गंभीर जखमी झाला असून, त्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अर्जुन माळगे हा आपल्या मित्रासोबत पनवेल येथे जात होता. यावेळी कोळखे येथील महिंद्रा शोरूमच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावर अर्जुन माळगे याच्या दुचाकीसमोर स्वराज गायकवाड हा दुचाकीवरून भरधाव वेगाने आला. त्याने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून दुचाकी चालविल्याने ती घसरली. या अपघातात स्वराज गायकवाड याच्या पायावर, छातीवर व हाताला गंभीर दुखापत झाली होती. तसेच, त्याच्यासोबत असलेल्या जयेश खरात यालाही गंभीर दुखापत झाली. मात्र, उपचारादरम्यान स्वराज गायकवाड याचा मृत्यू झाला, तर जयेश खरात याच्यावर उपचार सुरू आहेत. पनवेल शहर पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**पनवेल :** कल्याण येथील २० वर्षीय तरुणाने कामोठे येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या अत्याचारातून पीडित मुलीने एका मुलीला जन्म दिल्यानंतर आरोपी फरार झाल्याचे पोलिसांच्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. हाफीज अन्सारी असे आरोपीचे नाव आहे. त्याने पीडित अल्पवयीन मुलीला लग्न करण्याचे आश्वासन देत तिच्याशी संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप आहे. या अत्याचारातून पीडितेला अपत्य झाले. मात्र, मुलीच्या जन्मानंतर आरोपी हाफीज अन्सारी फरार झाला. याप्रकरणी कामोठे पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून, त्याचा शोध सुरू केला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास करण्यात येत आहे.

## खोदाईमुळे बाप्पाचा प्रवास खडतर



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

गणपती बाप्पाचे आगमन अवघ्या तीन दिवसांवर आले असता राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे काशिद रस्त्यावरील दोन्ही बाजूंवर खोदाई करण्यात आली आहे. त्यामुळे बाप्पाचा प्रवास खडतर होणार आहे. याबाबत वाहनचालक, प्रवासी, ग्रामस्थ व भक्तगणांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून, प्रशासन व संबंधित अधिकारी वर्गाने तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली जात आहे. गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर आला असल्याने मुंबई-पुणेसह अन्य ठिकाणाहून चाकरमानी कोकणातील आपल्या गावात येत आहेत. मात्र, राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे साळाव-मुरुड रस्त्यावरील काँक्रिटिकरणात काशिद रस्त्यावरील दोन्ही बाजूंनी खोदाई करण्यात आली आहे. त्यामुळे चाकरमान्यांसह बाप्पाचा प्रवास खडतर होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. वेळप्रसंगी अपघाताला सामोरे जावे लागण्याची शक्यता देखील वर्तविली जात आहे. त्यामुळे राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळाचे संबंधित अधिकारी, प्रशासन तसेच आपत्ती व्यवस्थापनाने याची तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.




**पॅकेजवरून 'बेस्ट बिफोर' गायब** | **उरणमध्ये ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ**

# मिठाईच्या गोडव्याला बेभरवशाचा वास!

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील मिठाईची दुकाने बाहेरून चकाचक दिसत आहेत. तसेच, काचेत झगमगणारी मिठाई आणि आणि आकर्षक डबे ग्राहकांना भुरळ घालत आहेत. परंतु, त्या डब्याच्या आत नेमके काय आहे? संबंधित मिठाई कधी बनली, कशी बनवली, किती दिवस खायची आणि कशी साठवली? याबाबतची कोणतीची माहिती त्या ठिकाणी उपलब्ध नसते. जरी दुकानदारांना प्रश्न विचारले तरी त्यांच्याकडून त्याची उत्तरे मिळतच नाही. त्यामुळे मिठाई विक्रीचा हा गोडधोड धंदा नेमका कोणाच्या भरवशावर सुरू आहे? असा प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित होत आहे.



काही दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपला आहे. त्यासाठी उरणकर मिठाई खरेदीसाठी मिठाईच्या दुकानात गर्दी करत आहेत. तसेच, जास्तीत जास्त ग्राहक आकर्षीत होण्यासाठी मिठाई दुकानदार वेगवेगळ्या शक्कल लढवत आहेत. त्यासाठी काचेत झगमगणारी मिठाई ठेऊन आणि आकर्षक डबे तयार करून ग्राहकांना भुरळ पाडली जात आहे. परंतु, त्या डब्यांमध्ये नेमके काय आहे? संबंधित मिठाई कधी बनवली गेली, तसेच ती किती दिवसापर्यंत खायची? याबाबत कोणतीची माहिती त्याठिकाणी नमुद केलेली नसते. तसेच, ती मिठाई ग्राहकांना स्पष्टपणे दिसत नसल्याबाबत काही ठिकाणी तक्रारी करण्यात आल्या आहेत. तर, काही ठिकाणची मिठाईची दुकाने बाहेरून एकदम चकाचक दिसत आहेत. परंतु, मिठाई बनविण्याच्या ठिकाणी प्रचंड उस्वच्छता असल्याच्या तक्रारी देखील केल्या जात आहेत. त्यामुळे नियम फक्त पुस्तकात छापून ठेवायचे आणि प्रत्यक्षात मिठाईवाल्यांना मोकळे रान द्यायचे, असा संताप स्थानिकांमधून व्यक्त केला जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित विषयात कागदी घोडे नाचवण्यापेक्षा प्रत्यक्ष तपासणीची गरज असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



# कधीही फुटेल असा बॉंब

गेल्या आठवड्यात याच स्तंभामध्ये राजेंद्र रुपनवर या तरुण डॉक्टरच्या आत्महत्येबाबत लिहिले होते. फलटणच्या उपजिल्हा रुग्णालयात होत असलेल्या वरिष्ठांच्या जाचामुळे त्याने टोकाचा निर्णय घेतला. दोन दिवसांपूर्वी त्याहूनही पुढच्या पिढीतल्या ठाण्यातील बारावीच्या एका विद्यार्थ्याने ९५ टक्के गुण मिळाल्यानंतरही स्वतःचे जीवन संपवले. त्याला शास्त्र शाखेत विशिष्टच कॉलेज हवे होते. ते न मिळाल्याने त्याचा जगण्यातला रस संपला. आता प्रथमेश देशमुख या विद्यार्थ्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतील अपयशामुळे आत्महत्या केल्याची घटना बुधवारी पुण्यात घडली आहे. प्रथमेश हा मूळचा धाराशिवचा होता. गेल्या दोन-तीन वर्षांपासून तो पुण्यात होता. त्याला चार बहिणी आहेत. आई गावी असते. त्याने सुमारे दोन लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. त्याने शनिवार पेठेतील राहत्या ठिकाणी गळफास लावून घेतला. तिथे पोलिस पोचले तेव्हा हे पैसे कोणाकडून घेतले व त्यातले कोणाचे किती दिले याच्या नोंदी असलेले कागद पोलिसांना मिळाले. त्याव्यतिरिक्त चिठ्ठी त्यांना मिळालेली नाही. पण हे कागद हेच तो मरणाकडे का गेला हे सांगणारी चिठ्ठी आहे. दोन वर्षे अभ्यास करूनही तो पूर्वपरीक्षा देखील पास होऊ शकलो नव्हता. यातूनच निराश होऊन तो गावी परत जाण्याचे मित्रांकडे बोलला होता. पण गावी अपयशी तोंड घेऊन जाण्याच्या कल्पनेने तो किती कासावीस झाला असेल याची कल्पना करता येईल.पोरगा पुण्यात तयारी करायला गेलाय म्हणजे अधिकारी होऊन येणार अशी कुटुंबीय आणि गाववाल्यांची कल्पना असते. मुलांनाही त्या कल्पनेत रमायला आवडते. पण वास्तव किती भयंकर असते ते प्रथमेशच्या दुर्दैवी अंतावरून दिसते. प्रथमेश हा असा एकटा नाही. अशी लाखो मुले दरवर्षी राज्यात व देशात निराशेच्या गर्तेत फेकली जात असतात. सुदैवाने ती आपल्या जिवाचे बरेवाईट करून घेत नाहीत. पण आपल्याला या परिक्षेत यश मिळाले नाही म्हणजे आपण नाकाम आहोत ही भावना राहतेच. त्यातलेच असंख्य लोक गावी परतून नाइलाजाने काही उद्योग करीत राहतात. काही जण शेतीत परत जातात.

### चक्रव्यूह

केंद्रीय किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा म्हणजे स्पर्धेचा एक चक्रव्यूहच झाला आहे. कोणताही तरुण त्यात सापडला की सहजी बाहेर येणे कठीण असते. अशकेंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेला दरवर्षी सुमारे दहा लाख मुले अर्ज करतात आणि त्यातली पाच ते सहा लाख प्रत्यक्ष परीक्षेला बसतात. प्रीलिम किंवा प्राथमिक परीक्षेतून केवळ तेरा ते पंधरा हजार मुले उत्तीर्ण होतात. ती अंतिम परिक्षेला बसतात. पण त्याच्या सहा ते सात टक्के म्हणजे ७०० ते १००० मुलेच मुलाखतीसाठी पात्र ठरतात. त्याहूनही कमी जागा असतात. त्यामुळे मुलाखतीलाही अनेक जण गळतातच. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेलाही जवळपास दोन ते चार लाख मुले बसतात. त्यातली केवळ सहा हजार लेखी परिक्षेत उत्तीर्ण होतात आणि जेमतेम चारशे मुलांचा नोकरीसाठी नंबर लागतो. म्हणजे इच्छुकांच्या प्रमाणात यशस्वी मुलांची संख्या जेमतेम एक टक्का आहे. तरीही लाखो मुले नव्या इर्षेने या उद्योगात घुसतात. पुणे, नाशिक, लातूर, नागपूर, संभाजीनगर इत्यादी ठिकाणी या परिक्षांच्या तयारीचे क्लासेस चालतात. त्यांच्या फी लाखोंच्या घरात असतात. काहीही न करता किंवा किरकोळ नोकऱ्या करून ही मुले दिवसरात्र अभ्यास करतात. पेइंग गेस्ट म्हणून राहतात. पैसे नसतील तर उपाशी राहतात. परिक्षेचा वाया जाणाराएकेक अटेम्प्ट म्हणजे आपल्या कुटुंबावरचा वाढता बोजा आहे अशा तणावाखाली ते जगत राहतात. मराठवाडा व विदर्भात शेतीची दुरवस्था झाली आहे. तिच्यातून बाहेर पडायचे तर तरुणांकडे दुसरे कोणतेही कौशल्य शाळा-कॉलेजातून मिळत नाही. अशा स्थितीत केवळ स्पर्धा परीक्षा हाच त्यांना एकमेव सहारा वाटतो. पण सरकारी नोकऱ्यांची संख्या मर्यादित असते. अलिकडे तर खर्चात कपात करण्यासाठी या जागांमध्ये आणखी घट होऊ लागली आहे. त्यामुळे मग मुले तलाठी, पोलिस निरीक्षक यापासून ते जिल्हाधिकारी अशा कोणत्याही पदांसाठी घेतल्या जाणाऱ्या परिक्षांमध्ये नशीब अजमावत राहतात. या परिक्षांना बसणारी लाखो मुले आणि त्यांची निराशा हा एक मोठा अस्वस्थ असा आणि कधीही फुटेल असा बॉंबगोळाच आहे.

### मोदींची चूक करू नका

त्यातच अलिकडे या परिक्षांच्या पेपरांबाबत आणि निकालांबाबत कमालीचा संशय निर्माण झाला आहे. आणि, हे देशभर सर्वत्र आहे. नीटच्या पेपरफुटीनंतर बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश अशा अनेक ठिकाणी स्थानिक परिक्षांमधील पेपरांमधील भ्रष्टाचार आणि निकालांमधील वशिलेबाजी यावरून आंदोलने झाली. झारखंडमध्ये उपोषण करून विद्यार्थ्यांनी परीक्षा रद्द करण्याला भाग पाडले. त्याच दरम्यान महाराष्ट्रातही औषध निरीक्षक परिक्षेचा पेपर फुटला. ती परिक्षाच रद्द करावी लागली. त्यामुळे ज्यांचा गुणवत्ता यादीत नंबर लागला होता ती मुले चिडली आहेत. त्यांच्यातील काही जण न्यायालयात गेले आहेत. दुसरीकडे वारंवारच्या पेपरफुटीने मुले चिडली असून पुणे, नागपूर, नाशिक, संभाजीनगर इथे गेल्या चार दिवसांपासून त्यांनी मोर्चे काढले. लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा द्यावा अशी त्यांची मागणी आहे. पण हे अध्यक्ष म्हणजे स्वतःला बहुधा लोकमान्य टिळक समजत असावेत. मी शेंगा खाल्ल्या नाहीत, मी टरफले उचलणार नाही असा त्यांचा आविर्भाव आहे. पेपरफुटीचे प्रकार आपल्या नियुक्तीच्या आधी झाले होते, आपला त्याच्याशी संबंध नाही असे ते म्हणतात. पण हे जे कोणी भीमनवार नावाचे अध्यक्ष आहेत ते लोकसेवा आयोगासारख्या प्रतिष्ठित संस्थेचे प्रमुख आहेत. मुलांना आश्वस्त करणे आणि पेपरफूट होणार नाही यासाठी काय केले जात आहे हे ठोसपणे सांगणे ही त्यांची जबाबदारी आहे. पेपरफुटीचा तपास पोलिस स्वतंत्रपणे करतील व दोषींना सजा होईल हे उद्या अधिकारी होऊ पाहणाऱ्या मुलांना कळतेच. लोकसेवा आयोगाचा कारभार विश्वास ठेवण्याजोगा राहिलेला नाही हे मुले सांगत आहेत त्याकडे तातडीने लक्ष देण्याची जास्त गरज आहे. ते न करता हे भीमनवार किंवा सरकारने केवळ पोलिस कारवाई चालू आहे असे थातूरमातूर सांगणे योग्य नाही. लोकसेवा आयोगातील पेपरफुटींमुळे यापूर्वीच्या परिक्षांमधील गुणवत्ता याद्यांबाबतही शंका निर्माण झाली आहे. आपण लायक होतो, पण आपली संधी लबाडीमुळे वा भ्रष्टाचारामुळे डावलली गेली अशी एक भावना लाखो मुलांच्या मनात तयार होणे हे धोकादायक आहे. ती दूर करण्याचा कोणताही प्रयत्न लोकसेवा आयोग वा सरकारकडून होताना दिसत नाही. आज ही मुले शांतपणे मोर्चे काढत आहेत. पण त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर ती दुसरे मार्ग अवलंबू शकतात. कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनानंतर तरी केंद्र व राज्य सरकारे याबाबत अधिक जागरुक होतील अशी अपेक्षा होती. पण तसे घडलेले नाही. पंतप्रधान मोदी हे विद्यार्थ्यांना दिमागी नक्सल ठरवत आहेत. फडणवीसांनी तसे करू नये. केले तर ते डोळ्यावर कातडे ओढून घेतल्यासारखे असेल.

**। विचार**

# उत्तर प्रदेशमध्ये मतांची काटेरी लढाई

***उत्तर प्रदेशची निवडणूक दिल्लीच्या सत्तासमीकरणांवर परिणाम करत असल्याने अवघ्या देशाचे लक्ष वेधते. सहा महिन्यांनी पार पडणाऱ्या या विधानसभा निवडणुकीचे वातावरण आता तापू लागले आहे. विविध मतचाचण्यांमधून सत्ताधारी 'एनडीए' आणि समाजवादी पक्ष-काँग्रेसप्रणीत विरोधी आघाडी यांच्यातील अंतर अत्यल्प असल्याचे चित्र समोर आल्याने भाजपसाठी एक महत्त्वाचा इशारा पहायला मिळत आहे.***



**राही भिडे**

अलीकडील 'वोट वाइब' सर्वेक्षणात देशभरामध्ये 'एनडीए'ला ४१.१ टक्के तर 'इंडिया' आघाडीला ४१.२ टक्के मतदारांचा संभाव्य पाठिंबा दिसून आला आहे. म्हणजेच फरक केवळ ०.१ टक्क्याचा. दुसरीकडे 'मूड ऑफ द नेशन'च्या ऑगस्ट २०२६ च्या अंदाजात लोकसभा निवडणूक आत्ताच झाली, तर 'इंडिया' आघाडीला उत्तर प्रदेशात ४१ जागा, तर 'एनडीए'ला ३८ जागा मिळू शकतात, असे चित्र आहे; मात्र त्याच अंदाजात 'एनडीए'चा मतवाटा 'इंडिया' आघाडीपेक्षा अधिक असल्याचेही नमूद झाले आहे. या आकडेवारीकडे सावधपणे पहायला हवे. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीतील मतदानाचे मुद्दे, मतदारांची पसंती आणि आघाड्यांची गणिते वेगळी असतात. त्याहून महत्त्वाचे म्हणजे निवडणुकीला अजून वेळ आहे. आजचा मतदार उद्या कोणत्या मुद्द्यावर मतदान करेल, हे सांगता येत नाही, तरीही या सर्वेक्षणांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. कारण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीने उत्तर प्रदेशमध्ये भाजपविरोधी मतांचे एकत्रीकरण शक्य असल्याचे दाखवून दिले आहे. २०२४ मध्ये 'एनडीए'ला उत्तर प्रदेशमधील ८० पैकी ३६ जागा मिळाल्या, तर 'इंडिया' आघाडीला ४३ जागा मिळाल्या. विशेष म्हणजे 'एनडीए'चा मतवाटा ४३.६९ टक्के आणि 'इंडिया' आघाडीचा ४३.५२ टक्के होता. म्हणजे मतांच्या बाबतीत दोन्ही आघाड्यांमध्ये केवळ ०.१७ टक्क्यांचे अंतर होते; पण जागांच्या बाबतीत विरोधकांनी स्पष्ट आघाडी घेतली. समाजवादी पक्षाला ३७ आणि काँग्रेसला सहा जागा मिळाल्या, तर भाजप ३३ जागांवर थांबला. यातून उत्तर प्रदेशच्या निवडणूक राजकारणाचा एक मूलभूत धडा मिळतो, तो म्हणजे मतांचे थोडेसे स्थलांतरही जागांच्या संख्येत मोठा फरक घडवू शकते. त्यामुळे भाजपला केवळ आपला पारंपरिक मतदार टिकवून चालणार नाही. दुसऱ्या बाजुने पाहता समाजवादी पक्ष आणि काँग्रेसने २०२४ च्या यशावर समाधान मानल्यास त्यांनाही मोठी किंमत मोजावी लागू शकते. योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली भाजपला सलग तिसऱ्यांदा विधानसभेत सत्ता मिळवायची आहे. २०१७ आणि २०२२ मध्ये भाजपने उत्तर प्रदेशमध्ये स्पष्ट बहुमत मिळवले. त्यामुळे 'योगी सरकारविरोधात सत्ताविरोधी लाट आहे का?' हा प्रश्न आगामी निवडणुकीचा केंद्रबिंदू ठरणार आहे. भाजपकडे विकासकामे, कायदा-सुव्यवस्था, पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी योजनांची मोठी यादी आहे. योगी यांची स्वतःची लोकप्रियता आणि हिंदुत्वाची राजकीय चौकट ही भाजपची मोठी ताकद आहे; पण निवडणुकीमध्ये केवळ सरकारने काय केले, एवढेच महत्त्वाचे नसते. मतदाराला पुढे काय हवे आहे, हे अधिक महत्त्वाचे असते. बेरोजगारी, स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार, तरुणांच्या नोकरीच्या अपेक्षा, महागाई, शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था, जातीय प्रतिनिधित्व आणि सरकारी योजनांचा प्रत्यक्ष लाभ या मुद्द्यांवर विरोधक भाजपला घेरण्याचा प्रयत्न करणार आहेत. 'मूड ऑफ द नेशन' चर्चेतही बेरोजगारी आणि परीक्षांशी संबंधित तरुणांच्या चिंता महत्त्वाच्या असल्याचे नमूद करण्यात आले आहे. भाजपसमोर असलेले दुसरे मोठे आव्हान आहे, ते सामाजिक समीकरणाचे. २०२४ मध्ये समाजवादी पक्षाने 'पीडीए' अर्थात पिछडा, दलित आणि अल्पसंख्याक या समीकरणाला राजकीय धार दिली. भाजपने या सामाजिक आघाडीला छेद देण्यासाठी गैर-यादव ओबीसी, दलित आणि इतर सामाजिक घटकांमध्ये प्रभाव कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. आगामी निवडणुकीत हीच लढाई अधिक तीव्र होणार आहे.

भाजपने अलीकडे कुर्मी समाजासह विविध ओबीसी गटांशी संपर्क वाढवण्यावर भर दिल्याचेही दिसते. समाजवादी पक्षासाठी सर्वात मोठी कसोटी म्हणजे २०२४ चा प्रयोग विधानसभा पातळीवर यशस्वी करून दाखवणे. एकीकडे अखिलेश यादव यांच्यासमोर यादव-मुस्लिम मतदारांचा पारंपरिक आधार मजबूत ठेवण्याचे आव्हान आहे, तर दुसरीकडे 'पीडीए'च्या माध्यमातून गैर-यादव मागासवर्गीय आणि दलित मतदारांमध्ये शिरकाव करण्याचे आव्हान आहे. केवळ भाजपविरोधी वातावरण पुरेसे ठरणार नाही. प्रत्येक मतदारसंघात सक्षम उमेदवार, बूथस्तरीय संघटन आणि स्थानिक सामाजिक समीकरण समजून घेण्याची क्षमता आवश्यक आहे. काँग्रेसची भूमिका याहून अधिक गुंतागुंतीची आहे. २०२४ मध्ये काँग्रेसला उत्तर प्रदेशमध्ये लोकसभेच्या सहा जागा मिळाल्या; मात्र विधानसभेच्या ४०३ जागांमध्ये आपली संघटनात्मक ताकद किती आहे, हा मूलभूत प्रश्न पक्षापुढे आहे. काँग्रेसला समाजवादी पक्षासोबतची आघाडी टिकवायची असेल, तर जागावाटपाचा प्रश्न लवकर सोडवावा लागेल. काँग्रेस आणि समाजवादी पक्ष सर्व ४०३ विधानसभा मतदारसंघांचे स्वतंत्र सर्वेक्षण करत असल्याचे वृत्त आहे. 'जिंकण्याची शक्यता असलेल्या जागा' या निकषावर लवकर जागावाटप व्हावे, अशी काँग्रेसची भूमिका असल्याचेही समोर आले आहे. इथेच विरोधकांची खरी परीक्षा आहे. २०२४ मध्ये एकत्र येणे हा एक राजकीय निर्णय होता. २०२७ मध्ये मतदारसंघनिहाय एकजूट राखणे ही संघटनात्मक परीक्षा असेल. उमेदवारीवरून नाराजी, स्थानिक नेतृत्वातील संघर्ष, जागावाटपातील तणाव आणि परस्पर संशय यामुळे आघाडी कमकुवत झाली तर भाजपला त्याचा थेट फायदा होऊ शकतो. भाजपने हीच शक्यता ओळखून संघटनात्मक पातळीवर मोठी हालचाल सुरू केली आहे. पक्षाने राष्ट्रीय सरचिटणीस आणि राज्यसभा सदस्य विनोद तावडे यांच्यावर उत्तर प्रदेशच्या प्रभारीपदाची जबाबदारी सोपवली असून जगदीश पटेल यांची सहप्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे. तावडे यांची नियुक्ती साधी प्रशासकीय फेरबदलाची बाब मानणे चुकीचे ठरेल. बिहारमध्ये संघटन आणि निवडणूक व्यवस्थापनात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. याशिवाय विविध राज्यांमधील संघटनात्मक कामाचा त्यांना अनुभव आहे. बूथव्यवस्था, उमेदवारांची निवड, सामाजिक समीकरणे, मित्रपक्षांशी समन्वय आणि निवडणूक व्यवस्थापन या सर्व बाबींचा एकत्रित विचार करण्याची त्यांची क्षमता भाजपसाठी महत्त्वाची ठरू शकते; मात्र बिहार आणि उत्तर प्रदेश यांची तुलना करणे धोकादायक आहे. बिहारमध्ये यशस्वी ठरलेली रणनीती उत्तर प्रदेशमध्ये तशीच लागू होईल, असे नाही. उत्तर प्रदेश भौगोलिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या अधिक मोठे आणि गुंतागुंतीचे आहे. पश्चिम उत्तर प्रदेश, अवध, पूर्वांचल, बुंदेलखंड या प्रत्येक भागाची राजकीय भाषा वेगळी आहे. जातीय समीकरणे मतदारसंघागणिक बदलतात. मित्रपक्षांची अपेक्षा वेगळी आहे. उमेदवार निवडीपासून बंडखोरीपर्यंत अनेक प्रश्न तावडे यांना हाताळावे लागतील. तावडे यांच्यापुढचे सर्वात मोठे आव्हान म्हणजे भाजपची संघटनात्मक ताकद आणि सरकारविषयी निर्माण होणारी संभाव्य नाराजी यांचा मेळ घालणे. संघटना मजबूत असली, तरी मतदाराचा मूड बदलला, तर केवळ बूथ यंत्रणा पुरेशी ठरत नाही. उलट सरकारबद्दल सकारात्मक वातावरण असेल, तर संघटना त्याला निर्णायक विजयात रूपांतरित करू शकते. तावडे यांना या दोन्ही टोकांमध्ये समतोल साधावा लागेल.

भाजपसमोर मित्रपक्षांचे गणितही आहे. अपना दल, निषाद पक्ष आणि इतर सहयोगी घटकांना जागावाटपात योग्य प्रतिनिधित्व देणे आवश्यक ठरेल. एका बाजूला भाजपला स्वतःची जागांची संख्या वाढवायची आहे आणि दुसरीकडे मित्रपक्ष नाराज होणार नाहीत याची काळजी घ्यायची आहे. निवडणुकीत मताचा प्रत्येक टक्का महत्त्वाचा असताना मित्रपक्षांचा छोटासा मताधारही निर्णायक ठरू शकतो. समाजवादी पक्ष आणि काँग्रेससमोर याच्या उलट आव्हान आहे. त्यांना भाजपविरोधी मतांचे विभाजन होऊ न देणे आवश्यक आहे. बसपचा प्रभाव कमी झाला असला, तरी दलित मतदार पूर्णपणे एका आघाडीच्या बाजूला जातील, असे गृहीत धरता येत नाही. लहान पक्ष, स्थानिक नेते आणि जातीय संघटनांची भूमिका काही मतदारसंघांमध्ये निर्णायक ठरू शकते. त्यामुळे विरोधकांनी केवळ 'भाजपविरोधी मत' या संकल्पनेवर विसंबून न राहता सकारात्मक राजकीय पर्याय उभा करणे गरजेचे आहे. अखिलेश यादव यांच्यासाठी ही निवडणूक आपल्या राजकीय नेतृत्वाची निर्णायक परीक्षा असेल. २०२४ मध्ये त्यांनी समाजवादी पक्षाला उत्तर प्रदेशमधील सर्वात मोठा पक्ष बनवले. आता त्या यशाचे रूपांतर विधानसभा पातळीवर करणे आवश्यक आहे. काँग्रेसला स्वतःचे अस्तित्व वाढवायचे आहे; पण त्यासाठी समाजवादी पक्षाशी संघर्ष करण्यापेक्षा आघाडी मजबूत ठेवणे अधिक फायदेशीर ठरू शकते. राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांच्यातील समन्वय हा त्यामुळे निवडणुकीतील महत्त्वाचा घटक ठरेल.

**। चर्चा आजची**

# शिक्षण व्यवस्थेला नैतिक आधाराची गरज

**सुयोग आंग्रे**

स्वातंत्र्यापूर्वी तीन दशके कोणत्याही उमेदवाराला पेपर लीक किंवा सॉल्व्हर यासारख्या शब्दांचे ज्ञान नव्हते, परंतु आज पेपरफुटीला तोंड देणे हे तरुणांचे नशीब बनले आहे. अशी परिस्थिती निर्माण करणारे गुन्हेगार सुशिक्षित असतात. त्यांना सिस्टीम माहीत असते आणि ती चालवणाऱ्यांची ओळख करून घेतात आणि त्यांचा समावेश करतात.यावरून हे स्पष्ट होते की 'व्यक्तीतून व्यक्तिमत्व' घडवणे हा त्यांचा उद्देश असलेल्या शाश्वत मूल्यांपासून शैक्षणिक संस्था आणि व्यवस्था किती दूर गेलेल्या नाहीत. हे बदलायचे असेल तर शिक्षण व्यवस्थेबाहेरील परिस्थितीकडेही पाहावे लागेल आणि त्याचे विश्लेषण करावे लागेल. याचे कारण आज शिक्षणव्यवस्था हा एक व्यवसाय बनली आहे. या व्यवसायाचे आता बाजारीकरण होऊन ज्ञान विकत घेण्याकडे अधिक कल वाढलेला दिसतो. खरेतर जीवनात यशस्वी होण्यासाठी व्यवहारज्ञानाचीआवश्यकता असते. तरी देखील स्पर्धेच्यायुगात शिक्षण क्षेत्राकडे अधिक सुखसं पाने पहिले जात आहे.

यामुळे जगाच्या रेट्यात आपले अस्तित्व टिकवण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचारीआपली पोळी भाजण्यासाठी दिवस-रात्र एक करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बुद्धीबरोबर खेळताना दिसत आहेत. यामुळे पदरी येणारीनिराशा जीवन संपवण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर भविष्यातील साम्राज्ये ही ज्ञानाची साम्राज्ये असतील असे म्हटले जात होते. मात्र, ज्ञानापेक्षा पवित्र काहीही नाही हे भारताला फार पूर्वीच समजले होते. प्राचीन भारतातील ऋषीमुनींना हे समजले. सत्याचा शोध घेणे आणि 'सर्वभूते हित रताह' या तत्त्वज्ञानाला व्यावहारिकता देणे हे त्यांच्या ज्ञान अभ्यासाचे उद्दिष्ट होते. त्यासाठी उत्तमोत्तम शिक्षण संस्थांची स्थापना करण्यात आली, गुणवत्तेला आणि प्रतिभेला योग्य संधी देऊन आणि त्यांचे योग्य पालनपोषण करून भारताला आपल्या ज्ञानाच्या श्रेष्ठतेची जागतिक मान्यता मिळाली.आजच्या आधुनिक विज्ञानाच्या क्षेत्रात ज्ञान संपादनाचा वेग आणि ज्ञान संपादनाची प्राचीन भारतीय परंपरा यात खूप फरक आहे. आज मशीन घटक, स्पर्धा आणि धोरणात्मक उपयोगिता यांना प्राधान्य मिळत आहे. बरं, आता हे प्रस्थापित झालं आहे की ज्ञानासोबत बुद्धिमत्ता, विवेक आणि मानवी संवेदनशीलता यांचा संपूर्ण समन्वय आवश्यक आहे.जागतिक स्तरावर सहिष्णुतेची कल्पना प्रस्थापित करणे ही भारताची नैतिक जबाबदारी आहे, परंतु भारताची शिक्षण व्यवस्था आणि व्यवस्थापन अनुकरणीय पातळीवर असेल तरच ते पूर्ण करू शकेल. आज तसे होताना दिसत नाही, ही चिंतेची बाब आहे. जगातील ज्या देशांसाठी भारत ही केवळ बाजारपेठ आहे ते देश भारताला रस्ता दाखवू शकत नाहीत. भारतानेही पाश्चिमात्य देशांची नक्कल करून आपल्या शिक्षणाचा आशय तयार केला तर तो केवळ पदवी देऊ शकतो, भारतीयत्व नाही. आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच शिक्षण आणि त्याचे व्यवस्थापन नवीन स्तरांवर नेत आहे. त्यातही भारताला आघाडीवर राहावे लागेल. पण त्यात भारतीय घटक भरकटणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल. ज्या देशाची शिक्षणपद्धती गुणवत्ता, उत्कृष्टता आणि मानवी घटकांनी परिपूर्ण आहे, तोच देश जगात मान-प्रतिष्ठा मिळवू शकतो.भारताच्या सध्याच्या शैक्षणिक धोरणात असे घटक उपलब्ध आहेत जे ते भविष्याभिमुख बनवू शकतात, परंतु त्यासाठी प्रत्येक स्तरावर शैक्षणिक नेतृत्वाची उपस्थिती आवश्यक आहे. गेल्या शतकाच्या सातव्या-आठव्या दशकापर्यंत देशाच्या शैक्षणिक संस्थांचे नेतृत्व नोकरशहांच्या हाती नव्हते. गंमत म्हणजे आज राज्यांमध्ये पाठ्यपुस्तक महामंडळाचे अध्यक्षही नोकरशहा आहेत. देशाची शिक्षण व्यवस्था कमकुवत होत चालली आहे हे खेदजनक आहे. राज्यातील पाच सरकारी विद्यापीठांमध्ये एकही नियमित शिक्षक नाही. देशातील एक लाखाहून अधिक सरकारी शाळा केवळ एक शिक्षक चालवतात. गेल्या दोन वर्षांत सरकारी शाळांमधील पटसंख्या ८६ लाखांनी घटली आहे, तर याच काळात खासगी शाळांमध्ये ८८ लाखांनी वाढ झाली आहे. राज्यघटनेने देशातील मुलांना समानता आणि समानतेच्या आधारावर शिक्षणाचा अधिकार दिला आहे, पण त्यात शिक्षकांच्या नियमित नियुक्तीचा समावेश नाही का?शाळा असो वा विद्यापीठ, मूलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत. केवळ धोरणात शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तराचे महत्त्व दाखवणे आणि व्यावहारिकतेकडे डोळेझाक करणे हा सरकारी व्यवस्थेत सक्तीने शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक मुलावर अन्याय आहे. हे मूल अशा व्यक्तीच्या कुटुंबातून आले आहे ज्याला शिक्षणाची सर्वाधिक गरज आहे, जी गांधीजींनी सूचित केलेल्या ओळीच्या शेवटी उभी आहे. प्रश्नपत्रिका सतत फुटणे आणि त्यानंतर जंतरमंतरसारख्या घटनांमुळे हे स्पष्ट होते की, शिक्षण घेत असलेल्या तरुणांच्या भविष्याबद्दल किती शंका आहे? एका वर्षात केवळ सात टक्के पदवीधरांना नियमित वेतनश्रेणीसह रोजगार मिळत असल्याचे आकडेवारी सांगते. देशातील ६७ टक्के पदवीधर तरुणांना रोजगार मिळू शकलेला नाही. आउटसोर्सिंगच्या प्रथेने मध्यस्थांना रोजगाराच्या क्षेत्रात आणून तरुणांच्या शोषणाचे नवे क्षेत्र खुले केले आहे. भविष्याबद्दल अनिश्चितता ताणतणाव वाढवते. याचा विपरित परिणाम विद्यार्थ्यांच्या वैचारिक शक्तीवर आणि वैचारिक प्रतिभेवर होतो. त्यामुळे जिज्ञासा खचतात आणि सर्जनशीलतेलाही मर्यादा येतात. अशा परिस्थितीत नवनिर्मितीची व्याप्तीही कमी होते. ज्या दिवशी प्रत्येक मुलाला आवश्यक दर्जाची शाळा, पुरेशा प्रमाणात प्रशिक्षित आणि समाधानी शिक्षक आणि आवश्यक साधनसंपत्तीने सुसज्ज शाळा मिळेल आणि कोणत्याही तरुणाला आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी जाण्यासाठी कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, त्या दिवशी देशाची बौद्धिक संपत्ती अनेक पटींनी वाढेल. यातूनचआपल्या देशाच्या इतिहासातील शिक्षण व्यवस्था किती प्रगल्भ होती याची प्रचिती पुन्हा एकदा आपल्याला जगासमोर आणता येईल.

**लोकसंसद**

## आता कांदा रडवतोय!



मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात सध्या कांद्याच्या भावात मोठी तेजी पाहायला मिळत असून कांद्याचे घाऊक बाजारभाव ४५०० ते ६१०० प्रति क्विंटल दरम्यान पोहोचले आहेत. परिणामी किरकोळ बाजारात कांदे ७० ते ७५ प्रति किलो दराने विकले जात आहेत. त्यामुळे स्वयंपाकातील महत्वाचा घटक असलेल्या, महागलेल्या कांद्याने सद्या गृहिणींच्या डोळ्यात अक्षरशः पाणी आणले आहे. चातुर्मासातल्या पवित्र सणासुदीच्या काळात बाजारात कांद्याला मोठी मागणी निर्माण झाली असतानाच कांद्याची आवक अचानक कमी झाली आहे. त्यातच हवामानातील बदलांमुळे आणि अनेक कांदा उत्पादक भागांमध्ये पावसाने ओढ दिल्यामुळे कांद्याचे उत्पादन घटले आहे, अशी कारणे कांद्याच्या या भाववाढी मागे असल्याचे सांगण्यात येत आहे. खरे तर गेल्या काही महिन्यांत सर्वच जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. कधीकाळी गोडवा देणारी साखर आता वाढलेल्या किमतींमुळे सर्वसामान्यांच्या खिशाला 'कडू' वाटू लागली आहे. केवळ साखर आणि कांदाच नव्हे तर खाद्यतेल, डाळी आणि भाजीपाला या सर्वांचेच भाव आवाक्याबाहेर गेले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य माणसाचे बजेट कोलमडून पडले आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे**

**। दिनविशेष**

# भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज जयंती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी



केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्राह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला.

ते एक समाजशास्त्रज्ञ आणि समाजसेवक, एक राजकीय तत्त्वज्ञ आणि स्वतंत्र भारतातील सर्वात मोठ्या राजकीय चळवळीचे नेते, एक शिक्षणतज्ज्ञ आणि साहित्यिक प्रतिभावंत हे सर्व आणि याहूनही बरेच काही होते. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ते एक ईश्वरभक्त आणि असे ऋषी होते, ज्यांनी आपल्यामध्ये मानवजातीच्या आध्यात्मिक परंपरा मूर्त रूपात साकारल्या होत्या. फार कमी लोकांनी मानवजातीला त्यांच्याइतका वारसा दिला आहे. त्यांनी आपले अखेरचे दिवस मध्य भारतातील पावनार येथील त्यांच्या आश्रमात घालवले. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

**पान १ वरून**

## मला लाज वाटतेय!

गोव्यापर्यंत प्रवास करून महामार्गाचे काम आणि प्रवासात काय सुविधा आहेत हेदेखील ते पाहणी करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सदर कामासंदर्भात अधिकाऱ्यांसोबत बैठकदेखील झाली आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. दरम्यान, पायाभूत सुविधा प्रकल्यापांच्या कामामध्ये विलंब किंवा निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारांवर आणि त्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी यावेळी दिला. मुंबई–गोवा महामार्गाची लांबी ४४० किलोमीटर असून, सदर महामार्गाच्या रूंदीकरणाला मुदतवाढ मिळाली आहे. जेथे काम पूर्ण झाले आहे, त्याठिकाणी पहिल्याच पावसात खड्डे आणि रस्त्यांचे नुकसानदेखील झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. वळणमार्ग, तसेच पाणी साचणे, वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरुस्ती यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

**महामार्गावर स्थानिक संस्कृतीचे दर्शन**

गडकरींनी गोवा सरकारला मुंबई–गोवा महामार्गाच्या दुतर्फा प्रवाशांसाठी विशेष सुविधा विकसित करण्याची सूचनाही केली. या सुविधांमध्ये गोव्याची वास्तुकला, खाद्यसंस्कृती आणि हस्तकला परंपरा यांचे दर्शन घडवता येईल, असे त्यांनी म्हटले. पेट्रोल आणि डिझेल पंपांबरोबरच जैवइंधन, इलेक्ट्रिक वाहने आणि इतर पर्यायी इंधनांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

## सोलर पंप थेट शेतकऱ्यांच्या दारात

बसवून देण्यात आले नव्हते. त्यामुळे पाण्याच्या प्रश्नाला सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता.

या समस्येची दखल घेत शेतकरी कामगार पक्षाचे मुलचेरा तालुका चिटणीस भाई चिरंजीव पेंदाम यांनी विद्युत विभागाकडे निवेदन सादर करून पात्र शेतकऱ्यांच्या शेतात तातडीने सोलर पंप बसवून देण्याची मागणी केली होती. मुलचेरा तालुका शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आलापल्ली येथील विद्युत विभागाच्या उपकार्यकारी अभियंत्यांकडे हे निवेदन देण्यात आले होते.

शेतकऱ्यांनी शासनाकडे आपल्या हिस्स्याची रक्कम वेळेत भरूनही विद्युत विभागाच्या वेळकाढू धोरणामुळे सोलर पंप बसविण्याचे काम रखडले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना पाण्यासाठी मोठा आटापिटा करावा लागत होता. यामुळे शेतकरी कामगार पक्षाने आक्रमक भूमिका घेत, सोलर पंप तातडीने बसवून न दिल्यास आलापल्ली येथील विद्युत विभागाच्या कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा भाई चिरंजीव पेंदाम यांनी दिला होता. या इशाऱ्याची विद्युत विभागाने दखल घेत तातडीने कार्यवाही सुरू केली आहे. अहेरी उपविभागातील पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या दारात सोलर पंपाचे साहित्य पोहोचविण्यात आले असून, लवकरच संबंधित शेतकऱ्यांच्या शेतात पंप बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे अनेक दिवसांपासून रखडलेला प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी केलेल्या पाठपुराव्यामुळे शासन आणि विद्युत विभागाला तातडीने कार्यवाही करावी लागल्याने, शेतकरी कामगार पक्षाच्या मागणीला अखेर यश मिळाले, अशी प्रतिक्रिया शेतकरी वर्तुळातून व्यक्त होत आहे.

## वाहनाच्या धडकेत महिला वकिलाचा मृत्यू

करत होत्या. त्या नेहमीप्रमाणे चालण्यासाठी आपल्या मोटारीने विमानतळालगतच्या सेवा रस्त्यावर आल्या होत्या. त्यांनी रस्त्यालगत मोटार उभी केली आणि वाघीवलीकडून चिंचपाड्याच्या दिशेने जाणाऱ्या सेवा रस्त्यावर चालत होत्या. दरम्यान, पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या वाहनाने प्रियाला जोरदार धडक दिली. धडकेमुळे त्या गंभीर जखमी झाल्या. अपघातानंतर इतर वाहनचालकांच्या मदतीने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले.

## परप्रांतियांकडून स्थानिकावर हल्ला

तेथील परप्रांतीय व्यक्तींनी बेकायदेशीर जमाव जमवला आणि त्यांच्यावर जीवघेणा हल्ला चढवला. या हल्ल्यात रुपेश भोईर जखमी झाले. एवढ्यावरच न थांबता संतप्त जमावाने दांडके व अन्य हत्यारांनी रुपेश भोईर यांची स्कूटी पूर्णपणे फोडून टाकली, तसेच पत्नी व मुलीच्या दिशेनेही प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेची माहिती पसरताच परिसरात प्रचंड संताप व्यक्त होत आहे. किरकोळ कारणावरून स्थानिक नागरिकावर जीवघेणा हल्ला केल्याने तसेच अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या परप्रांतियांच्या मुजोरीमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, या अगोदर ही कोप्रोली, चिरनेर, द्रोणागिरी नोड परिसरात परप्रांतीय नागरिकांनी स्थानिकांवर प्राणघातक हल्ला केल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे परप्रांतीय नागरिकांची दहशत मोडीत काढण्यासाठी अशा अनधिकृत व्यावसायिकांवर कारवाई करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे.

याप्रकरणी गुड्डू सिंग, बंटी सिंग आणि संदिप सिंग या तिघांसह १०–१५ अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच दि. १० सप्टेंबर रोजी तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी काही आरोपींना अटक करण्यात आली असून, पोलीस उपनिरीक्षक निलेश कोंडाळकर, गोविंद केंद्रे हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. उरण पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींचा शोध सुरू आहे.

## रिकामी खेडी पुन्हा हसणार

ओलावा जरासुद्धा कमी होत नाही. याच उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणातील वृद्ध पालकांनी शासनाला एक आर्त साद घातली आहे आणि बाप्पाच्या चरणी साकडे घातले आहे. सरकारने गावागावांत रोजगार आणि धंदे उपलब्ध करून द्यावेत, जेणेकरून आमची तरुण मुलं नोकरीसाठी शहरात जाणार नाहीत आणि ही गावंदेखील कधी ओस पडणार नाहीत, अशी भावनिक मागणी पालकांकडून होत आहे. वृद्ध आई–वडील म्हणतात, लेकरं डोळ्यांसमोर राहिली, तर आमची ही रोजची मरणयातना थांबेल. मुले शहरात असतात, त्यामुळे आमचे संपूर्ण लक्ष त्यांच्या काळजीकडे लागलेले असते. मुलं दूर असल्याच्या याच विवंचनेत आणि मानसिक तणावात आम्ही वारंवार आजारी पडतो. त्यामुळे गावातच उदरनिर्वाहाची साधने मिळाली, तर कुटुंब कधीच विभक्त होणार नाहीत, हा संदेश यानिमित्ताने समोर आला आहे.

कोकणातील गणेशोत्सवाची खरी रंगत म्हणजे तिथली संस्कृती. बाप्पाच्या समोर ते उत्साहाने नाचणे, टाळ–मृदंगाच्या ठेक्यावर रात्र–रात्र जागवून भजन गाणे, आणि पारंपरिक जाखडी–नमन नृत्यात रमून जाणे, ही गावाची एक वेगळीच मजा असते. या आनंदाच्या भरात चाकरमान्यांच्या सुटीचे दिवस कधी संपतात तेही कळत नाही. बाप्पाच्या आगमनामुळे रायगडच्या वेशीपासून ते थेट सिंधुदुर्गाच्या टोकापर्यंतची नाती पुन्हा एकदा गावाकडच्या मातीशी घट्ट जोडली जात असून, अवघा कोकण प्रांत आता या महाउत्सवाच्या रंगात न्हाऊन निघण्यासाठी सज्ज झाला आहे. शासनाने या वृद्ध पालकांच्या आर्त हाकेकडे लक्ष देऊन ग्रामीण भागात रोजगाराचीनिर्मिती करावी, हीच आता वृद्ध आई–वडीलांचे बाप्पाला साकडे आहे.

## डिजिटल प्रणाली शेतकऱ्यांची डोकेदुखी!

अडचणी आणखी वाढल्या आहेत. डिजिटल सुविधांच्या नावाखाली प्रत्यक्ष शेतकऱ्यांचीच गैरसोय होत असल्याने कृषी आणि महसूल विभागाच्या या प्रणालींवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

खतासाठी शेतकऱ्यांचे होणारे हेलपाटे कमी करण्यासाठी कृषी विभागाने एफएफएस अर्थात फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल ही डिजिटल प्रणाली विकसित केली आहे. रायगड जिल्ह्यात ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून ही प्रणाली सुरू करण्यात आली. या प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना घरबसल्या खताची बुकिंग करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. खत खरेदी करताना होणारी आर्थिक लूट आणि फसवणूक टाळण्यासोबतच शेतकऱ्यांना सहज आणि पारदर्शक पद्धतीने खत उपलब्ध व्हावे, या उद्देशाने कृषी विभागाने आधुनिक पद्धतीने खत विक्रीवर भर दिला. एफएफएस प्रणालीचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना मोबाईलमध्ये हे ॲप डाऊनलोड करावे लागते. त्यानंतर आधारकार्ड अथवा शेतकरी आयडीद्वारे लॉगिन करावे लागते. पिकाच्या शिफारशीनुसार खताची निवड करून बुकिंग पूर्ण केल्यानंतर क्यूआर कोड जतन करावा लागतो. हा क्यूआर कोड खत विक्री केंद्रावर दाखविल्यानंतर खत खरेदी करता येते. या प्रक्रियेतून एकरी ४५ किलोच्या खताची बॅग खत विक्री केंद्राकडून उपलब्ध करून दिली जाते. ही प्रणाली शेतकऱ्यांसाठी फायदेशीर असल्याचा दावा कृषी विभागाकडून करण्यात आला आहे.

मात्र, रायगड जिल्ह्याची शेतीची रचना पाहता हीच डिजिटल प्रणाली अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी अडचणीची ठरत असल्याचे समोर आले आहे. जिल्ह्यात सध्या सुमारे ८० हजार हेक्टर क्षेत्रावर भातपीक घेतले जाते. जिल्ह्यात वीस लाखांहून अधिक नोंदणीकृत शेतकरी असल्याची माहिती आहे. रायगडमध्ये मोठ्या प्रमाणात गुंठ्या–गुंठ्यावर शेतीचे क्षेत्र आहे. बोटावर मोजण्याइतक्या शेतकऱ्यांकडेच तुलनेने मोठे शेती क्षेत्र आहे. तब्बल ९५ टक्क्यांहून अधिक शेतकऱ्यांची शेती पाच ते पंधरा गुंठ्यांपर्यंत असल्याने त्यांच्या खताची गरजही अत्यल्प असते.

रायगड जिल्ह्यात सध्या २४० खत परवानाधारक विक्रेते आहेत. जिल्ह्यात युरिया ५४५ मेट्रिक टन, इतर अनुदानित रासायनिक खत ३६४ मेट्रिक टन आणि ऑरगॅनिक खताचा एक हजार ६७७ मेट्रिक टन साठा उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा परिषद कृषी विभागाकडून उपलब्ध झाली आहे. खताचा साठा उपलब्ध असतानाही अल्पभूधारकांना त्यांच्या गरजेनुसार सुट्टे खत मिळत नसल्याने डिजिटल प्रणालीच्या अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

**ई–पीक पाहणीलाही तांत्रिक ब्रेक**

खताच्या डिजिटल प्रणालीची समस्या कायम असतानाच खरीप हंगामासाठी सुरू करण्यात आलेल्या डिजिटल क्रॉप सर्व्हे अर्थात ई–पीक पाहणीवरही तांत्रिक ब्रेक लागला आहे. गेल्या आठ दिवसांपासून ई–पीक पाहणीची प्रक्रिया ठप्प असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. खरीप हंगामातील ई–पीक पाहणीसाठी महसूल विभागामार्फत तलाठ्यांच्या मदतीला गावपातळीवर सहाय्यकांची निवड करण्यात आली आहे. या सहाय्यकांच्या माध्यमातून गावागावात ई–पीक पाहणी करण्याचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र, गेल्या आठ दिवसांपासून ई–पीक पाहणीच्या सॉफ्टवेअरमध्ये बिघाड झाल्याने ही प्रक्रिया थांबली आहे. त्यामुळे वेळेत ई–पीक पाहणी पूर्ण होण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत.

**साठा आहे; तरी खत मिळेना!**

रायगड जिल्ह्यात सध्या खताचा साठा उपलब्ध असल्याची कृषी विभागाची आकडेवारी आहे. युरिया ५४५ मेट्रिक टन, इतर अनुदानित रासायनिक खत ३६४ मेट्रिक टन आणि ऑरगॅनिक खत एक हजार ६७७ मेट्रिक टन उपलब्ध आहे. मात्र, अल्पभूधारक शेतकऱ्यांना मागणीनुसार सुट्टे खत मिळत नसल्याने उपलब्ध साठ्याचा फायदा नेमका किती शेतकऱ्यांना होतो, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

**रायगड जिल्ह्यात शेतीचे क्षेत्र कमी आहे. त्यामुळे एफएफएस प्रणालीद्वारे सुट्टे खत उपलब्ध होत नाही. याबाबत आयुक्त स्तरावर चर्चा झाली आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या या प्रश्नावर राज्य स्तरावर चर्चा सुरू आहे. लवकरच हा प्रश्न सुटण्याची शक्यता आहे.**

**– कृषी विभाग, जिल्हा परिषद (नाव न सांगण्याच्या अटीवरून)**

## जलजीवनबाबत भाजपचा दिखावा!

१३० कोटी रुपयांचा निधी अद्याप प्रलंबित असल्याचे समोर आले आहे. निधीअभावी अनेक योजनांची कामे रखडली असून, काही ठिकाणी सुरू झालेली कामेही पूर्णत्वास जाण्यास अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष गावागावातील नागरिकांना नळाद्वारे नियमित पाणी मिळण्याची समस्या कायम असताना, बैठकीत मात्र जलजीवन योजनेच्या माध्यमातून पाणीपुरवठा मोठ्या वेगाने झाल्याचा दावा करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

भाजपच्या जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत जलजीवन योजनेबाबत पंधरा पट जास्त वेगाने घरांमध्ये नळाद्वारे पाणी पोहोचल्याचा दावा करण्यात आला असला, तरी जिल्ह्यातील अपूर्ण योजनांची संख्या आणि प्रलंबित निधीची आकडेवारी वेगळेच वास्तव दाखवत आहे. त्यामुळे जलजीवन योजनेबाबत भाजपकडून केवळ राजकीय श्रेय घेण्यासाठी दिखावा केला जात आहे का, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## १९.२३ लाखांचा गुटखा जप्त

एकशिंगे यांनी अवैध धंद्यांविरोधात मोहीम हाती घेतली आहे. त्याचाच भाग म्हणून गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

पोलीस उपनिरीक्षक प्रदीप नाईक व गुन्हे शोध पथकाने आरोपी समीर पारेख याच्या ताब्यातील महिंद्रा मॅक्सिमो टेम्पो (एमएच ०६ बीजी १८८०) तसेच महाड–मध्यमा ट्राय सिटी बिल्डिंग, डोंगडी पुल येथील गाळ्याची तपासणी केली. यावेळी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला विमल पान मसाला, सुगंधी सुपारी आणि सुगंधी तंबाखू मोठ्या प्रमाणात आढळून आला.पोलिसांच्या माहितीनुसार, शासनाने विक्री, उत्पादन व साठवणुकीवर बंदी घातलेल्या या पदार्थांचा साठा करून त्यांची विक्री केली जात असल्याचे तपासात समोर आले. पोलिसांनी सर्व मुद्देमाल जप्त करून आरोपीविरुद्ध महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

या कारवाईत गुन्हे शोध पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक प्रदीप नाईक, पोलीस हवालदार भोईर, पोलीस शिपाई कांदे, विन्हेरकर व आंधळे सहभागी झाले. पुढील तपास पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रदीप नाईक करीत आहेत.

महाड शहरातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी यापुढेही कठोर कारवाया सुरूच राहतील, असा इशारा पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांनी दिला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध गुटखा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.


**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**
**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड**

जा.क्र. ७९२

**फॉम झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक १३/०७/२०२३ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १५/०७/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्रीमती.मंदाकिनी राजेश पाटील मारुती मंदिरा जवळ, मु-रोडे, पो-कांदळेपाडा, ता.पेण, रायगड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक १५/०३/२०२३ पर्यतची रक्कम रूपये १५,५२,३१८/- व दिनांक १६/०३/२०२३ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यत त्यावरील १४ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारणाने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकांनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकांराचा वापर करून

श्रीमती. मंदाकिनी राजेश पाटील यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन ग्रुप ग्रामपंचायत कांदळे ता.पेण मालमत्ता क्र.६०/अ क्षेत्रफळ ८९५.९९ चौ.फुट

येथिल खालिल मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा वडखळ च्या दिनांक १५/०३/२०२३ रोजी येणे रक्कम रूपये १५,५२,३१८/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्रीमती. मंदाकिनी राजेश पाटील**

श्रीमती. मंदाकिनी राजेश पाटील यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन.
ग्रुप ग्रामपंचायत कांदळे ता.पेण मालमत्ता क्र.६०/अ क्षेत्रफळ ८९५.९९ चौ. फुट

स्थळ : पेण
दिनांक : १०/०९/२०२६

**श्री.अजित नामदेव भगत**
वसूली व विक्री अधिकारी पेण रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग



## सार्वजनिक सूचना

ही सूचना सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते की आमच्या ग्राहकांनी, जमीन मिळकतीचे मालक अंबालाल जेठालाल पटेल यांच्याकडून जमीन मिळकती खरेदी करण्यास सहमती दर्शविली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**मौजे शिरसे, तालुका- कर्जत, जिल्हा - रायगड, वर्ग - १**

| सर्वे नंबर / हिस्सा नंबर | क्षेत्रफळ (हे आर.-चौ.मी.) | |
|---|---|---|
| १४/१ | ००-४३-०० | खाता क्र. १३२ |
| १४/३ | ००-१३-५० | खाता क्र. १३२ |
| १४/४ | ००-३०-५० | खाता क्र. १६१ |
| १४/५ | ००-१०-०० | खाता क्र. १३२ |
| ६/१ | ००-२९-१० | खाता क्र. १३३ |
| | एकूण क्षेत्रफळ- ०१-२६-१० (हे आर.चौ.मी.) | |

कोणत्याही व्यक्तीस वरील नमूद केलेल्या जमीन विक्री, विनिमय, तारण, भार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, हक्क, परवाना, हायपोथिकेशन, मालकी हक्काचा हस्तांतरण, कोणत्याही ट्रस्टखालील लाभदायी हक्क, प्रिएम्शन हक्क, प्रथम खरेदी हक्क, करार, डिक्री, आदेश, निर्णय किंवा इतर कोणत्याही प्रकारे दावा, आक्षेप, स्वारस्य किंवा वाद असल्यास त्यांनी त्यांचे दावे/आक्षेप/वाद याबाबतची कागदपत्रे सादर करून या सूचनेच्या प्रकाशनापासून एकवीस (२१) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्याशी संपर्क साधावा. अन्यथा आमचे क्लायंट वरील मालकाशी विक्री व्यवहार पूर्ण करतील आणि नंतर कोणताही तृतीय पक्षाचा दावा/आक्षेप/वाद विचारात घेतला जाणार नाही.

**Mr. Vishal Singh**
**For M/s V R legal & Co**
कार्यालय क्र.२२५, थापर कॉम्प्लेक्स,
प्लॉट क्र. ५१, सेक्टर - १५,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
संपर्क: +९१- ९९२०३९०९५९
ईमेल आयडी : adv.vrlegal@gmail.com



सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे दिले असुन **वाटपपत्र/ करारनामा** करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र (हे. आर.) | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनिशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| १ | तळोजा १००९ | १/२००८ | २५२/१-७ | ०-३१-० | ४५० चौ.मी. पैकी १५० चौ.मी. | भूखंड क्र.९८, सेक्टर-१४, क्षेत्र-३०० चौ.मी. | दिवाणी दावा क्र.रे.मु.क्र-३७४/२०२१ मधील न्यायालयीन आदेशानुसार प्रतिवादी श्री. बळीराम बाबुराव कदम यांना इरादित भूखंड क्र.९८, सेक्टर-१४, क्षेत्र ३०० चौ.मी. | रे.मु.क्र-३७४/२०२१ |
| | | | २५०/१७ | ०-२१-० | | | | |
| | | | **एकूण क्षेत्र** | **०-५२-०** | | | | |
| | तळोजा १००९ | १/२००८ | २५९/९/२ | ०-२०-० | १५० | | | |
| | | | **एकूण क्षेत्र** | **०-५२-०** | ३०० चौ.मी. | | | |
| २ | पेंधर | ४ब | ८४/० ९०/० ९३/० ५४/१पै ५५/० ५६/० ५७/१पै ५७/२ | ०-२७-१ ०-४४-३ १-११-८ ०-१२-० ०-१५-४ ०-१८-५ ०-८५-४ ०-२-० **३-१६-५** | एकूण १२१५० चौ.मी. पैकी हिस्सेवाटणी नुसार १९५० चौ.मी. | तळोजा येथे भुखंड क्र. ६५B, सेक्टर-१७, क्षेत्र-१९५० चौ.मी. | अब्दुल कादिर अब्दुल लतीफ पटेल | एकूण १२१५० चौ.मी. मंजुर पात्रतेपैकी मा.न्यायालयीन दिवाणी दावा क्र.७६/२०२१ मधील दि.२२.०४.२०२१ रोजीच्या तडजोड पुरशीस आदेशाप्रमाणे अब्दुल कादिर अब्दुल लतीफ पटेल यांच्या हिस्स्यास येणारी १९५० चौ.मी. पात्रता |
| | पेंधर | ४क | १००/० १०४/०पै १०५/० १०८/०पै ८९/० | ०-८६-३ ०-४०-२ ०-५७-३ ०-०९-९ ०-५८-० **२-५१-७** | | | | |
| | पेंधर | ४अ | ८१/० ८७/० ८८/० १०२/० ५७/३पै | २-०४-९ ०-६८-५ ०-२०-४ ०-८९-८ ०-२७-० **४-१०-६** | | | | |
| | पेंधर | ४ड | ९१/० ९२/० | १-९९-३ १-८०-१ **३-७९-४** | | | | |
| | तळोजा | ३८ | ७३/१ | ०-३०-० | | | | |
| ३ | उलवे ३४१ | गव्हाण ८१५ | १५७/३ +४+६ +९D | ०-१४-२ | १०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. २१G, सेक्टर-२२, क्षेत्र-९९.९६ चौ.मी. | कै. बाळकृष्ण धाऊ पाटील (मयत) यांचे वारस १) श्रीमती वत्सला बाळकृष्ण पाटील, २) श्रीमती नैनिता संदिप पारिंगे, ३) कु. प्राजक्ता बाळकृष्ण पाटील ४) श्री. प्रतिक बाळकृष्ण पाटील | --- |
| ४ | उलवे १७६६ | गव्हाण ४११ | ४८/८ ४२/१० ४५/३ ७६/५ | ०-१७-२ ०-५-० ०-२४-० ०-२०-६ | ६०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. ४००, सेक्टर-१७, क्षेत्र-५९९.८४ चौ.मी. | श्रीमती कृष्णाबाई पांडुरंग म्हात्रे | --- |
| ५ | उलवे १६८ | गव्हाण ३१५ | ९/१ | ०-३२-९ | ३०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. ११F, सेक्टर-२२, क्षेत्र-३०० चौ.मी. | **कै. दामा रामा तांडेल (मयत) यांचे वारस** श्रीमती यमुनाबाई दत्तात्रेय भोईर | --- |
| ६ | उलवे ६१३ | गव्हाण ५०अ | २३८/ ६क | ०-०५-३ | ९०० चौ.मी. पैकी ३०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. A-४५, सेक्टर-१३, क्षेत्र-३०० चौ.मी. | शेख उस्मान शेख अली | --- |
| | | गव्हाण ७१७ | २४०/० | ०-१७-४ | | | | |
| | | गव्हाण ६७५+ ६७६ | २३९/२ | ०-७९-१ | | | | |
| ७ | २९७ | १४६D +३६१B | ३०५/२+३+३६० ते ३१०/०+३११/१+३ १२/२Plot No.२८(२) | ५४३७ | ४५० चौ.मी. | भूखंड क्र. ६१, सेक्टर-६ए, क्षेत्र ८०० चौ.मी कामोठे नोड | **(संचिका क्र. २९७ मधील भुधारक)** कै. जगन्नाथ गंगाराम कांडपिळे कै. पुष्पा जगन्नाथ कांडपिळे यांचे वारस **१) श्री. दिपक जगन्नाथ कांडपिळे २) श्रीमती. इंद्रायणी किरण कांडपिळे ३) श्री. मनोहर कृष्णाजी कांडपिळे, (संचिका क्र. १५२ मधील भुधारक)** कै. यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे वारस **१) श्री. संजय यशवंत कांडपिळे, २) श्री. अजय यशवंत कांडपिळे (संचिका क्र ५६२ मधील भुधारक)** कै. सुलोचना हनुमंत कांडपिळे कै. जयवंत हनुमंत कांडपिळे यांचे वारस १) कै. प्रमोद जयवंत कांडपिळे यांचे वारस १.१) श्रीमती. किशोरी प्रमोद कांडपिळे, १.२) श्री. तनय प्रमोद कांडपिळे १.३) श्री. देवेन प्रमोद कांडपिळे, २) कै. रमेश हनुमंत कांडपिळे यांचे वारस २.१) श्रीमती. उज्वला रमेश कांडपिळे, २.२) श्री. जतीन रमेश कांडपिळे, २.३) श्री. प्रवीण रमेश कांडपिळे ३) कै. चंद्रकांत हनुमंत कांडपिळे यांचे वारस ३.१) श्रीमती. नलीनी चंद्रकांत कांडपिळे | निरंक |
| | १५२ | ३८३B | ३०५/२+३+३०६ ते ३११/२+३११/३+३ १२/२Plot No.१६, | १२४४.४० | २०० चौ.मी. | | | |
| | | | ३०५/२+३+३०६ ते ३१०+३११/१+३११ /३+३१२/२ Plot No.२२(१) | १२२४.०० | | | | |
| | ५६२ | ५३१A | ३०५/२+३+३०६ ले ३१०+३११/१+३११ /३+३१२/२/Plot no. १२ | १४४९.२ | १५० चौ.मी. | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संपादित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, १२.५% टक्के भूमी विभाग (रायगड), सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२२१/२०२६–२७

# घराघरात घुमणार ढोलकीचा नाद




**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

डीजेच्या दणदणाटासह आधुनिक साऊंड सिस्टीमचा जमाना असला, तरी गणरायाच्या आरतीतील ढोलकीचा ठेका आजही भक्तांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्याने बाप्पाच्या स्वागताची लगबग सुरू झाली असून, बाजारपेठांमध्ये लहान-मोठ्या ढोलक्यांची दुकाने सजली आहेत. आधुनिकतेच्या प्रवाहातही पारंपरिक वाद्याची क्रेझ कायम असल्याचे चित्र रायगड जिल्ह्यामध्ये पाहायला मिळत आहे.

गणरायाच्या आगमनाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. बाप्पाची मूर्ती घरी आणण्याची लगबग सुरू असून, प्रतिष्ठापनेच्या ठिकाणी सजावट आणि विद्युत रोषणाईची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. गणरायाच्या आगमनानंतर घराघरांत धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू होणार आहे. सकाळ-संध्याकाळच्या आरतीपासून विविध कार्यक्रमांपर्यंत ढोलकीच्या तालाची साथ लाभणार आहे.

अलिबागसह पेण आणि रायगडातील विविध ठिकाणी ढोलकी तयार करणारे आणि विक्रेते दाखल झाले आहेत.

### ■ आधुनिक संगीताच्या युगातही गणेशोत्सवात पारंपरिक वाद्याला भक्तांची पसंती

गेल्या पंधरा दिवसांपासून रस्त्यालगत त्यांची तात्पुरती दुकाने आणि कारखाने उभारले आहेत. उत्तर भारतातील कारागीर हजारो किलोमीटरचा प्रवास करून कोकणात दाखल झाले असून, रस्त्याच्या कडेला उभारलेला तंबू, बाजूला लाकडाचे ओंडके, हातातील पारंपरिक हत्यारे आणि आकार घेत असलेल्या ढोलक्या असे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे या ठिकाणी एखाद्या छोटेखानी फिरत्या कारखान्याचे स्वरूप निर्माण झाले आहे.

**पारंपरिक वाद्यांना मागणी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक वाद्यांना मागणी वाढू लागल्याने वाद्यनिर्मिती करणाऱ्या कारागिरांची लगबग वाढली आहे. कोकणासह महाराष्ट्रात गोकुळाष्टमी आणि गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कोकणातील गणेशोत्सवाचे विशेष आकर्षण असलेल्या घरगुती भजन, कीर्तन, डबल बारी यांसारख्या पारंपरिक कार्यक्रमांमध्ये वाद्यांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे या दिवसांत ढोल, ताशा, हलगी, मृदंग, तबला यांसह विविध पारंपरिक वाद्यांची मागणी वाढते.कोकणातील भजनी मंडळे, गणेशोत्सव मंडळे तसेच अनेक नामवंत वादक या कारागिरांकडून वाद्य खरेदी करण्यासाठी येतात. सण जवळ येत असल्याने सध्या वाद्यांचीनिर्मिती, दुरुस्ती आणि रंगरंगोटीची कामे वेगाने सुरू आहेत. आधुनिक वाद्यांचा वापर वाढला असला तरी गणेशोत्सव आणि भजनाच्या पारंपरिक वातावरणात ढोल-ताशा, मृदंग आणि इतर वाद्यांचा नाद आजही तितकाच लोकप्रिय आहे.

**घरगुती गणेशोत्सवाची परंपरा कायम**

रायगडसह संपूर्ण कोकणात घरगुती गणेशोत्सवाची परंपरा आजही मोठ्या श्रद्धेने जपली जाते. सकाळ-संध्याकाळ होणाऱ्या आरतीला टाळ-मृदुंगासह ढोलकीची साथ दिली जाते. त्यामुळे आधुनिक वाद्यांचा वापर वाढला असला, तरी गणेशोत्सवाच्या काळात पारंपरिक ढोलकीची मागणी कायम आहे. आंबा, शिसम, खैर, आईन यांसारख्या लाकडाचा वापर करून विविध आकारांच्या ढोलक्या तयार करण्यात आल्या आहेत. लाकडाचा प्रकार, आकार आणि दर्जानुसार त्यांची किंमत ठरते. साधारण ३०० रुपयांपासून ३ हजार रुपयांपर्यंत ढोलकी उपलब्ध असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली.

**परंपरेचा ठेका कायम**

काळाच्या ओघात अनेक पारंपरिक कला आणि वाद्ये लोप पावत असताना गणेशोत्सवाने ढोलकीला आजही घराघरात स्थान मिळवून दिले आहे. दीड दिवसांपासून पाच, सात, दहा आणि २१ दिवसांच्या गणेशोत्सवात आरतीच्या वेळी घुमणारा ढोलकीचा प्रत्येक ठेका केवळ भक्तीचा सूर नाही, तर एका समृद्ध पारंपरिक कलेच्या अस्तित्वाचा ठेका ठरत आहे.

# श्रीवर्धन शहरात सीएनजी पंपाचा अभाव

## पर्यटन स्थळ असूनही वाहनचालकांची गैरसोय

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी|**



ऐतिहासिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने राज्यभरात नावाजलेल्या श्रीवर्धन शहरात अद्यापही सीएनजी पंप सुरू झालेला नाही. एकीकडे केंद्र सरकार प्रदूषण मुक्तीसाठी आणि इंधन बचतीसाठी गॅसवर चालणाऱ्या वाहनांचा वापर करण्याचे सातत्याने आवाहन करत आहे; मात्र दुसऱ्या बाजूला पर्यटनस्थळ असलेल्या श्रीवर्धन येथे या मूलभूत सुविधेचा फटका स्थानिक आणि पर्यटकांना बसत आहे. परिसरात सध्या विविध विकासकामांचा धडाका सुरू आहे, मात्र, वाहनधारकांसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या सीएनजी पंपाचा प्रश्न प्रलंबित आहे. विशेष म्हणजे, खा. सुनील तटकरे हे केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू विषयक संसदीय समितीच्या अध्यक्षपदी कार्यरत आहेत. तरीदेखील श्रीवर्धन सारख्या महत्त्वाच्या पर्यटन स्थळी सीएनजी पंप उपलब्ध न झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

सध्या अनेक स्थानिक नागरिकांनी सीएनजीवरील वाहनांना पसंती दिली आहे.याशिवाय, निसर्गरम्य श्रीवर्धन आणि परिसरातील समुद्रकिनारे अनुभवण्यासाठी सुट्टीच्या दिवसात शेकडो पर्यटक आपली वाहने घेऊन येतात. मात्र, शहरात सीएनजी पंप नसल्याने स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनाही मोठी धावपळ करावी लागते. सीएनजी पंप अभावी स्थानिकांना आणि पर्यटकांना श्रीवर्धन शहराबाहेर जावे लागते. ज्यामुळे वेळेचा व पैशांचा अपव्यय होत आहे.

शासन आणि लोकप्रतिनिधींनी या समस्येची गंभीर दखल घेऊन श्रीवर्धन शहरात लवकरात लवकर सीएनजी पंप मंजूर करून तो कार्यान्वित करावा, अशी जोरदार मागणी आता स्थानिक नागरिक आणि पर्यटकांकडून केली जात आहे.

# करिअर कट्टा अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**| खरोशी | प्रतिनिधी |**



पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पेण येथे करिअर कट्टा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. एस आर कान्हेकर यांनी करिअर कट्टा बाबत माहिती दिली. उपक्रम हा महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहीती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांत व महाविद्यालयात राबविण्यात येत आहे. करिअर कट्टा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी ३६५ दिवस दोन प्रकारचे मार्गदर्शन केले जाते. यामध्ये आयएएस. आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र लोकसेवा सेवा आयोग, बँकिंग सेवा, पोलीस भरती, स्टाफ सिलेक्शन कमिशन, केंद्र पातळीवर युपीएससी अशा विविध स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन केले जाते. उद्योजक आपल्या भेटीला उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे मार्गदर्शन केले जाते. कार्यक्रमास प्र. प्राचार्य डॉ. व्ही डी भाबड, प्रा. सायली पितळे, डॉ. एस आर कान्हेकर, प्रा. नितीन मिटकुळे, प्रा. रणजित लोंढे, डॉ. देविदास बामणे, डॉ. एस. डी. लकडे, उपस्थित होते.

## निवडक

### चिखले आश्रमशाळेत शिक्षक दिन उत्साहात

**पनवेल :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून लायन्स क्लबच्या वतीने चिखले येथील आश्रमशाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आश्रमशाळेतील २१ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रवीण सरनाईक यांनी भावी पिढी घडविण्यात शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच लायन्स चळवळीची माहिती देत विद्यार्थ्यांनी भविष्यात सक्षम झाल्यानंतर समाजसेवेची भावना जपावी, असे आवाहन केले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप, तर विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप करण्यात आले. तसेच बालकांमधील कर्करोगाविषयी मुश्ताक खान यांनी विद्यार्थ्यांना जनजागृतीपर मार्गदर्शन केले.कार्यक्रमादरम्यान शाळेतर्फे आयोजित रानभाज्या महोत्सवाचे उद्घाटन प्रवीण सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक विष्णू गायकर यांनी प्रास्ताविक व स्वागत केले, तर संजय गोडसे यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाचे आयोजन बाल शिक्षण समितीचे राजेशकुमार, जिल्हा सहखजिनदार संजय गोडसे आणि मुश्ताक खान यांनी केले होते. न्यू पनवेल स्टील टाऊन, पनवेल सरगम, उलवे जेम्स, नवी मुंबई प्लॅटिनम, तुर्भे, सीबीडी आणि नेरुळ येथील लायन्स क्लबचा या उपक्रमात सहभाग होता. याप्रसंगी प्रवीण सरनाईक, विजय गणात्रा जागृती पाटील, आदित्य दोशी, राजेश जगासिया, स्वाती गोडसे, श्रेया तिवारी, ए. सी. झुल्का, आर. पी. पांडे यांच्यासह लायन्स परिवारातील सदस्य,शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### वाजेकर महाविद्यालयात व्याख्यान

**चिरनेर :** उरण येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयात आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विशेष व्याखनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी कोणताही संकोच न बाळगता गरज पडल्यास प्रशिक्षित समुदेशकांचीही मदत घेण्यास सांगितले. यावेळी प्रा. योगेश कुलकर्णी, प्रा.श्रीकांत गोतपागर आदी उपस्थित होते. व्याखनाची सुरुवात आत्महत्या प्रतिबंधात्मक जागृती संदर्भात शपथ घेऊन झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे चेअरमन प्रा. श्रीकांत गोतपागर यांनी मानले. व्याखनास विद्यार्थ्यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- महालक्ष्मी किराणा स्टोअर्स जागा भाड्याने देणे आहे. १२०० स्क्वेअर फुट दुकानाचे तीन गाळे भाड्याने देणे आहे. ७०३८६५६४४६
- नागाव येथे रोडटच ६ गुंठे जागा विकणे आहे. तार कंपाऊंड मारले आहे. संपर्क- ७०३८६५६४४६
- ऑफिस कामाकरीता अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर, ऑफिस असिस्टंट रिसेप्शनिस्ट मुलगी पाहिजे. शिक्षण- ग्रॅज्युएशन पूर्ण. Typing, MS-CIT संपर्क- विधान्त इंफ्रा + ९१७२१९२९१२३१ पत्ता- अलिबाग वेळ- ११.०० ते ५.००
- Vacancy in furniture Workshop office Education - Graduation Experience - 2 years Location - Bamansure, chondhi Contact - 9823585321
- फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे ठिकाण-झिराड, पात्रता -MBA अनुभव -३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना Contact- 9823585321
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी स्थानिक मुलगी पाहिजे व ड्रायव्हर पाहिजे. 9763006555
- अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# निर्माल्यातून कंपोस्ट खत निर्मितीला वेग

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**



गणेशोत्सव अवघ्या दोन-तीन दिवसांवर येऊन ठेपल्याने पनवेल शहरातील बाजारपेठांमध्ये गणेशभक्तांची खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे. घरगुती गणपतींच्या दीड दिवसानंतर होणाऱ्या विसर्जनासाठीही पनवेल महानगरपालिकेने तयारीला वेग दिला आहे.

गणेशमूर्ती विसर्जनानंतर मोठ्या प्रमाणात जमा होणाऱ्या निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी यंदा पालिकेने विशेष नियोजन केले आहे. शहरातील विविध विसर्जन घाटांवर निर्माल्य कलश ठेवण्यात येणार असून, त्यामध्ये जमा होणाऱ्या निर्माल्यापासून कंपोस्ट खत तयार करण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमासाठी नवीन पनवेल सेक्टर सहा येथील मैदानात दहा बाय दहा फुटांचे खड्डे तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. अशाच प्रकारे शहरातील एकूण पाच ठिकाणी निर्माल्यापासून कंपोस्ट खत निर्मितीसाठी खड्डे तयार करण्यात येणार आहेत.

यंदा महानगरपालिका क्षेत्रात एकूण ७७ कृत्रिम विसर्जन घाट तयार करण्यात येणार आहेत. याशिवाय शहरात २१ कायमस्वरूपी विसर्जन घाट उपलब्ध आहेत. त्यामुळे गणेशभक्तांना जवळच्या घाटावर मूर्ती विसर्जन करता यावे, यासाठी पालिकेने व्यापक व्यवस्था केली आहे. निर्माल्यापासून तयार होणारे कंपोस्ट खत पुढील काळात पनवेल महानगरपालिकेच्या उद्यानांसाठी वापरण्यात येणार आहे. त्यामुळे निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन होण्याबरोबरच तयार होणाऱ्या खताचा पुनर्वापरही केला जाणार आहे.

# किशोर मोरे यांना 'योद्धा सेवा सन्मान'



**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

गोळेगणी गावातील सेवानिवृत्त लेफ्टनंट कर्नल किशोर मोरे यांना त्यांच्या देशसेवेबद्दल स्थलसेनाप्रमुख जनरल धीरज सेठ यांच्या हस्ते दिल्लीमध्ये योद्धा सेवा सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. तब्बल ३७ वर्षे देशसेवा करुन गावाकडे परतलेले मोरे सेवानिवृत्तीनंतर सैनिकांच्या कल्याणासाठी सतत प्रयत्नशील आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत एका सामान्य सैनिकापासून लेफ्टनंट कर्नल पदापर्यंत पदोन्नती घेतली.

३७ वर्षांच्या सेवाकाळात मोरे यांनी जम्मू आणि काश्मीर, अरुणाचल प्रदेश, नागालँड सारख्या दूर्गम पर्वतीय क्षेत्रात आपले कर्तव्य बजावले. मोरे यांनी आजमितीस २६ तरुणांना सशस्त्र दलात अधिकारी होण्यासाठी यशस्वी मार्गदर्शन केले आहे. त्यानंतर पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी या मूळगावी ते सध्या स्थायिक झाले आहेत. सेवानिवृत्त मोरे यांना योद्धा सेवा सन्मान नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आल्यानंतर समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत असून महाड पोलादपूर परिसरातील विविध शाळा महाविद्यालय तसेच आपत्ती निवारण कार्यात शासन व शासनासोबत काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनी सैन्यदलातील अनुभवाचा लाभ घेण्याचे आवाहन मोरे यांनी केले आहे.

# रेशनिंगकार्डच्या कामातील दिरंगाईबाबत तहसीलदारांना निवेदन



**| रसायनी | प्रतिनिधी |**

रसायनीपरिसरातीलनागरिकांना रेशनिंगकार्ड ऑनलाइन करण्याच्या कामासाठी तहसीलदार कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. कामात होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या समस्येची तातडीने दखल घेऊन कामकाज सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत रंजना गायकवाड, प्रकाश म्हात्रे, रेश्मा निलाखे तसेच इतरांनी तहसीलदार मीनल भोसले-भामरे यांची भेट घेऊन नागरिकांच्या समस्यांबाबत चर्चा केली. रेशनिंगकार्ड ऑनलाइन करण्यासाठी नागरिकांना चार-पाच वेळा तहसीलदार कार्यालयात चकरा माराव्या लागत असून, त्यानंतरही काम पूर्ण होत नसल्याच्या तक्रारी यावेळी मांडण्यात आल्या.

यावेळी तहसीलदारांनी कार्यालयात मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे कामाला काही प्रमाणात दिरंगाई होत असल्याचे स्पष्ट केले. तसेच नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी लवकरच आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले. याप्रसंगी रेश्मा निलाखे, हलिमा कुरेशी, विश्वनाथ गायकवाड यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीवर्धनमधील दुकाने गजबली

**श्रीवर्धन शहर :** श्री गणरायांचे आगमन आता चार दिवसांवर येऊन ठेपल्यामुळे श्रीवर्धन बाजारपेठेतील दुकाने सजावटीच्या विविध प्रकारच्या साहित्याने सजली आहेत. सजावटीच्या साहित्यांत प्लॅस्टीक व कागदी फुलांच्या विविध रंगांच्या माळा, सुट्टी कागदी फुले, कापडी मंदिरे, सजावटीसाठी लटकण, कंठी, गणेशासाठी प्लॅस्टिकचे हार, सजावटीच्या ओढणी, गौरींचे मुखवटे, वेगवेगळ्या प्रकारचे, डिझाईनचे रंगीबेरंगी कागद, धूप, अगरबत्या, पूजा साहित्य, आदी साहित्य दुकानात उपलब्ध आहेत.

# पोलीस प्रशासनाची शांतता समिती बैठक

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**




सार्वजनिक गणेशोत्सव २०२६ च्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत परिमंडळ-३, पनवेलच्या वतीने गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी व शांतता समिती सदस्यांची महत्त्वपूर्ण बैठक खांदा कॉलनी, सेक्टर-६ येथील श्रीकृपा हॉलमध्ये आयोजितकरण्यात आली. याप्रसंगी एसीपी यांनी गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांनी व मंडळांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले.

गर्दीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे महत्त्व अधोरेखित करत मिरवणुकांमध्ये पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीत मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी वाहतूक कोंडी, रस्त्यांवरील खड्डे, अतिक्रमणे तसेच वीज वितरण विभागाशी संबंधित विविध समस्या मांडल्या.

पनवेलमधील विसर्जन मिरवणुका नेहमीच शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडतात, ही परंपरा कायम ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले. मिरवणुकीदरम्यान ड्रिंक अँड ड्राइव्हची तपासणी करण्यात यावी, अशी सूचनाही त्यांनी पोलीस प्रशासनाला केली.

आपला सण, आपली जबाबदारी या भावनेतून सर्वांनी एकत्र येऊन गणेशोत्सव सुरक्षित, आनंदमय आणि शांततेत साजरा करूया, असे आवाहन यावेळी करण्यात आले. बैठकीच्या शेवटी उपस्थित मान्यवर व नागरिकांचे आभार मानले.

या बैठकीस डीसीपी, एसीपी यांच्यासह परिमंडळ-३ मधील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते वाहतूक पोलीस अधिकारी, तसेच महापालिका अधिकारी, महावितरण विभागाचे अधिकारी, अग्निशमन दलाचे अधिकारी, गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, नगरसेवक, महिला नगरसेविका, पंचायत समितीचे सभापती आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**इमारतीच्या पॅसेजमध्ये पाण्याच्या रिकाम्या बाटल्या | स्वच्छ भारत अभियानाचा कार्यालयातच बोजवारा**

# मध्यवर्ती प्रशासकीय भवनातील आवार अस्वच्छ

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**



श्रीवर्धन येथील सर्व शासकीय कार्यालये एकाच इमारतीत असावी या उद्देशाने श्रीवर्धन शहरामध्ये मध्यवर्ती प्रशासकीय भवनाचे बांधकाम करण्यात आले. या इमारतीमध्ये तळमजल्यावरती श्रीवर्धन तहसील कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय, कृषी विभाग, त्याचप्रमाणे तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालय आहे. तर पहिल्या मजल्यावरती उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांचे कार्यालय असून त्याच्या बाजूलाच सभागृह आहे. मात्र, या इमारतीतील सर्व परिसराचा आढावा घेतला असता, असे लक्षात आले की, या ठिकाणाची नियमित स्वच्छता होत नाही. या ठिकाणचा कचरा काढला जात नाही, किंवा फरशी देखील पुसली जात नाही.

इमारतीच्या पॅसेजमध्ये अनेक ठिकाणी पाणी पिण्याच्या रिकाम्या बाटल्या, चहाचे रिकामे कागदी कप, त्याचप्रमाणे इतर कचरा देखील पडलेला पाहायला मिळाला. या ठिकाणी कर्मचाऱ्यांना खेळण्यासाठी देखील एक व्हॉलीबॉल किंवा बॅडमिंटन कार्पेटलॉन तयार करण्यात आलेले आहे.

या ठिकाणी देखील कचरा असलेला पाहायला मिळत आहे. वास्तविक पाहता एवढी मोठी इमारत असल्यामुळे या ठिकाणी कमीत कमी दोन स्वच्छक असणे आवश्यक आहे. श्रीवर्धन तालुक्यातील व श्रीवर्धन उपविभागातील अनेक नागरिक आपल्या विविध कामांसाठी या कार्यालयामध्ये वारंवार येत असतात. त्यामुळे या ठिकाणची स्वच्छता राखणे ही देखील त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांची प्रथम जबाबदारी आहे.

संपूर्ण देशामध्ये स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत स्वच्छतेची विविध कामे चालू असतात. या इमारतीत असलेल्या सर्व शासकीय कार्यालयांनी इमारतीची स्वच्छता रोज कशा प्रकारे केली जाईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**स्वच्छकांची नेमणूक करण्याची मागणी**

सदर इमारतीची नियमित साफसफाई करण्यासाठी या ठिकाणी स्वच्छकांची नेमणूक करण्यात यावी. जेणेकरून त्या ठिकाणी आपल्या विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना मध्यवर्ती प्रशासकीय भवनाच्या इमारतीत फिरताना प्रसन्न वाटेल.इमारतीच्या स्वच्छतेसाठी निधीची तरतूद नसेल, तर त्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवून निधीची तरतूद करून घ्यावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## शुद्धीपत्रक

मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे.

| सर्व्हे क्रमांक/भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ६९/१ | ००-३५-८० | २-४४ |

या मिळकतींचे मालक ताराबाई पांडुरंग मते यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविलेले, त्याकरीता दिनांक ०३ सप्टेंबर २०२६ रोजी कृषिवल या वृत्तपत्रांत जाहीर पेपर नोटीस देणेंत आलेली होती, दिनांक ०३ सप्टेंबर २०२६ रोजीच्या पेपर नोटीसमध्ये मिळकतीच्या गावांचे नांव मौजे भालिवडी असे चुकीचे लिहीणेंत आलेले आहे, त्या ठिकाणी मौजे गौळवाडी हे नांव योग्य व बरोबर असुन, नोटीशीच्या वर्णनामध्ये मौजे गौळवाडी असे वाचणेंत यावे.

दिनांक :- ११ सप्टेंबर २०२६

**ॲड. शरद आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ.हौ.सो.लि.कोतवालनगर कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड-४१०२०१
मो.नं.९५२७२८२५२५

## जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांनी मौजे - आडीवली, तालुका कर्जत, जिल्हा-रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे मालक समीर दामोदर वांजळे यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे

| जमीन मालक | सर्वे क्रमांक/ हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पी. | आकारणी |
|---|---|---|---|
| समीर दामोदर वांजळे | १२/१ | ०.१४.००<br>पो.ख. ०.०१.०० | ०.२३ |

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण, बोजा, अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अधिकार, ताबा, लिज, लिन, पोटगी, चार्ज, खरेदीखत, बक्षिसपत्र, अन्न, वस्त्र इत्यादी अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत/रायगड
दि. १०/०९/२०२६

वकील
**ॲड. क्रांती लक्ष्मण अभंगे**
पत्ता ३०९ निंबेशवर लँडमार्क पाटील आळी कर्जत,
तालुका कर्जत जिल्हा-रायगड ४१०२०१
मो.न. ९१६८२७००८३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे चांधई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक विजय बन्सीलाल पंजाबी यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|
| ०१ | ५५/३/ड | ००.१५.५० | ०.६२ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ११ सप्टेंबर २०२६

**ॲड. शरद आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला,
बी विंग, विहंग को.ऑ.हौ.सो.लि.
कोतवालनगर कर्जत ता.कर्जत, जि.रायगड -४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस सदरच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे आक्षी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत व त्यामधील घर मिळकती विदयमान मालक १. गीता शांतीप्रकाश महाजन, २. इप्सिता शांतीप्रकाश महाजन, ३. मनिष शांतीप्रकाश महाजन, सर्व रा. फ्लॅट नं.४९, इरिस अपार्टमेंट, कफ परेड, प्रेसिडंट हॉटेल मागे, कोलाबा, मुंबई, महाराष्ट्र, पिनकोड ४००००५ सदर मिळकतीवरील मालकी हक्काची (टायटल) मी तपासणी / चौकशी करीत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| आक्षी, ता.अलिबाग, जि.रायगड राज्य महाराष्ट्र | २०६ | १-२३-२०<br>पो.ख. ०-११-६०<br>एकूण १-३४-८० | ३६-५२ |

वर नमूद मिळकत व त्यामधील ग्रामपंचायत आक्षी मालमत्ता क्र.६६६ व मालमत्ता क्र.४६

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. विहित मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास, असे कोणतेही हक्क किंवा दावे सोडून दिले आहेत ( waived) अथवा त्याग केले आहेत (abondoned) असे गृहित धरले जाईल.

अलिबाग,
दिनांक : ११.०९.२०२६

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस.म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक कार्यालय
अलिबागच्या समोर,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२
ईमेल advmsmhatre@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. भरत मिश्रीमल जैन रा. श्रीबाग नं.२, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड यांचेकडून विकत घेणेचे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| बेलोशी ता.अलिबाग | ३४१ | ०-५३-१०<br>पो.ख ०-००-८०<br>०-५३-९० | ७.४० |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि. १०-०९-२०२६.

**ॲड.आर.बी.कोसमकर**
चिरायु, ब्राम्हण आळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस व संबंधितांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आम्ही आमचे अशील १ श्री. चंदु भगवानदास मुलचंदानी २. नारी भगवानदास मुलचंदानी ३. निशा प्रकाश मुलचंदानी ४.विशाल प्रकाश मुलचंदानी यांच्या सुचनेवरून व सांगण्यावरून खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचे ( ज्यास पुढे सदर मिळकत असे संबोधले आहे) मालकी हक्क, अधिकार, शीर्षक (Title) व हितसंबंधाची कायदेशीर तपासणी करत आहोत

सदर मिळकतीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्ति, हिंदू अविभक्त कुटूंब, कंपनी, बँक, वित्तीय संस्था, बिगर बॅकींग वित्तीय संस्था, संस्था, कर्जदार, शासन किंवा स्थानिक प्राधिकरण, अथवा इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बक्षीसपत्र, बोजा, गहाण, लीज, भाडेपट्टा, ताबा, कुलमुखत्यापत्र, खरेदीखत, करार, सामजस्य करार, अदलाबदल, भागीदारी, कौटूंबिक व्यवस्था/ वाटणी, वाद/न्यायालयीन खटला (lis pendens) आरक्षण, संपादन, अधिग्रहण प्रक्रिया, देखभाल हक्क, वारसाहक्क, रस्ता हक्क, हिस्सा, पोट भाडेकरू, ताबा हक्क, मृत्युपत्र, ट्रस्ट अथवा कोणत्याही न्यायालय/प्राधिकरणाच्या आदेशान्वये किंवा कराराव्दारे कोणताही दावा, आक्षेप, अधिकार, किंवा मालकी हक्काच्या कागदपत्रांचा ताबा असल्यास अशा सर्व व्यक्ति व संस्थांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत आपल्या दाव्याच्या/ आक्षेपाच्या समर्थनार्थ आवश्यक त्या मुळ अथवा साक्षांकित कागदोपत्री पुराव्यांसह खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाचेही आक्षेप वा दावे प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार वा दावा नाही किंवा असल्यास तो सोडून (Waive) दिला आहे असे मानले जाईल. त्यानंतर आमच्या अशिलांचे सदर जमिनीवरील मालकी हक्क व शीर्षक पुर्णपणे स्वच्छ, निर्वेध व विक्रीयोग्य (Clear, Marketable free from encumbrances) आहे असे समजून पुढील व्यवहार पुर्ण केला जाईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही दाव्यांची अथवा आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही .

**मिळकतीचा तपशिल** (SCHEDULE OF THE PROPERTY)

मौजे माणगाव ठाकुरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड, ग्रुप ग्रामपंचायत माणगाव हददीतील जमीन मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे

| सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर. | जुना सर्व्हे नंबर./ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्र. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| २१/२/ई | २४/२/ई | ०.२१.०० | ०.१० |

ठिकाण : कर्जत
दिनांक : ११.०९.२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
पत्ता मु.पो.चिंचवळी ता.कर्जत
जि. रायगड
ई मेल : ubhagat79@gmail.com
मो.नं. ९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत या मिळकतीचे विद्यमान मालक श्री शैलेश चंद्रकांत कुंटे, रा.पो. नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी केली आहेत.

**मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन कमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड | २४२२ | ००-३७-६०<br>पैकी सुमारे ०-०७-१० गुंठे क्षेत्र | २.२३ |

सदर वर नमुद मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या मिळकतीवरील आपली मालकी अबाधित आहे तसेच सदरची मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा श्री शैलेश चंद्रकांत कुंटे यांचे सोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत आणुन दयावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहुन आलेली अशी कोणतीही, कसलीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी. हे सर्वास कळविले.

अलिबाग
दिनांक : १०/९/२०२६

स्वाक्षरीत /-
**ॲड. सविता शं. पिंगळे**
२०१ सृष्टी, दुसरा मजला, वेध शाळेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड

## जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अलिबाग
### २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना
**(फक्त सभासदांकरिता)**

स.न.वि.वि.

जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अलिबाग यांच्या अधिमंडळाची २९ वी वार्षिक सर्व साधारण सभा शनिवार दि.२६/०९/२०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता ''श्री विठोबा मंदिर देवस्थान ट्रस्ट'' च्या सभागृहात, वरसोली, ता.अलिबाग येथे पतसंस्थेचे मा.अध्यक्ष ॲड श्री.जे.टी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार विनिमय करणेसाठी आयोजित करण्यांत आली आहे. तरी सदर सभेस उपस्थित राहून सहभागी व्हावे ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय पत्रिका :**

१) दि.२०/०९/२०२५ रोजी झालेल्या २८ व्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२) सन २०२५-२०२६ च्या वार्षिक अहवालाची नोंद घेणे व तो स्विकृत करणे.
३)वैधानिक लेखापरिक्षण झालेल्या दि.३१/०३/२०२६ अखेरच्या ताळेबंद व नफा-तोटा या आर्थिक पत्रकांवर विचार करणे व स्विकृत करणे.
४) सन २०२५-२०२६ च्या वैधानिक लेखापरिक्षकाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन स्विकृत करणे.
५) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकाच्या लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
६) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी नामतालीकेवरील लेखापरिक्षकाची नेमणुक करणे व त्याचे मानधन ठरविणे.
७) सन २०२६-२०२७ करिता अंतर्गत लेखापरिक्षक व कर लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
८) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५-२०२६ च्या नफा वाटणीस मंजुरी देऊन लाभांश जाहिर करणे.
९) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२६ - २०२७ च्या अंदाजपत्रकास व गतवर्षाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
१०) संचालक मंडळाने शिफारस केलेल्यो पोटनियम दुरुस्तीच्या बाबतीत निर्णय घेणे.
११) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देऊन नोंद घेणे.
१२) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

दिनांक : ११/०९/२०२६

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
**सौ.अमृता आ.पारसनीस**
**व्यवस्थापिका**
**जनसेवा नागरी सह.पत मर्या.अलिबाग.**

**सभासदांना सूचना**

१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब करावी लागल्यास सदर सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
२) सभासदांच्या माहितीसाठी वरील सभेच्या विषयी सर्व माहिती संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.
३) ज्या सभासदांना हिशोबाची पत्रके पहावयाची असतील त्यांना दि. २१/०९/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १०:०० तं. दु. २:०० व दु. ३:०० ते ५:०० मध्ये दाखविली जातील.
४) ज्या सभासदांना हिशोबाचे पत्रकासंबंधी प्रश्न/सुचना/ठराव पाठवायचे असतील त्यांनी दि.२३/०९/२०२६ पर्यंत लेखी स्वरूपात पाठवावेत. तोंडी प्रश्नांवर चर्चा करण्यात येणार नाही.
५) ज्या सभासदांच्या पाल्यांना सन २०२६ मध्ये झालेल्या इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षेमध्ये ७० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत व पदवी परिक्षेत ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत आणि अहवाल सालात ज्या सभासदांच्या पाल्यांनी क्रिडा क्षेत्रात भरीव कामगिरी केलेली आहे, अशा सभासदांनी आपल्या पाल्याच्या गुणपत्रिकेची एक सत्यप्रत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत दि. २१/०९/२०२६ पर्यंत आणून दयावी. अशा पाल्यांना त्यांच्या पारितोषिकांची रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देउन वार्षिक सभेत त्यांचा सन्मान करण्यात येईल.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस व संबंधितांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आम्ही आमचे अशील श्री.निलेश लक्ष्मीचंद मेहता यांच्या सुचनेवरून व सांगण्यावरून खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचे (ज्यास पुढे सदर मिळकत असे संबोधले आहे) मालकी हक्क, अधिकार, शीर्षक (Title) व हितसंबंधाची कायदेशीर तपासणी करत आहोत.

सदर मिळकतीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्ति, हिंदू अविभक्त कुटूंब, कंपनी, बॅक, वित्तीय संस्था, बिगर बॅकींग वित्तीय संस्था, संस्था, कर्जदार, शासन किंवा स्थानिक प्राधिकरण, अथवा इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बक्षीसपत्र, बोजा, गहाण, लीज, भाडेपट्टा, ताबा, कुलमुखत्यापत्र, खरेदीखत, करार, सामजस्य करार, अदलाबदल, भागीदारी, कौटुंबिक व्यवस्था/वाटणी, वाद/न्यायालयीन खटला (lis pendens) आरक्षण, संपादन, अधिग्रहण प्रक्रिया, देखभाल हक्क, वारसाहक्क, रस्ता हक्क, हिस्सा, पोट भाडेकरू, ताबा हक्क, मृत्युपत्र, ट्रस्ट अथवा कोणत्याही न्यायालय/प्राधिकरणाच्या आदेशान्वये किंवा कराराद्वारे कोणताही दावा, आक्षेप, अधिकार, किंवा मालकी हक्काच्या कागदपत्रांचा ताबा असल्यास अशा सर्व व्यक्ति व संस्थांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत आपल्या दाव्याच्या/ आक्षेपाच्या समर्थनार्थ आवश्यक त्या मुळ अथवा साक्षांकित कागदोपत्री पुराव्यांसह खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाचेही आक्षेप वा दावे प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार वा दावा नाही किंवा असल्यास तो सोडून (Waive) दिला आहे असे मानले जाईल. त्यानंतर आमच्या अशिलांचे सदर जमिनीवरील मालकी हक्क व शीर्षक पुर्णपणे स्वच्छ, निर्वेध व विक्रीयोग्य (Clear, Marketable free from encumbrances ) आहे असे समजून पुढील व्यवहार पुर्ण केला जाईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही दाव्यांची अथवा आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही .

**मिळकतीचा तपशिल** (SCHEDULE OF THE PROPERTY)

मौजे माणगाव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड, ग्रुप ग्रामपंचायत माणगाव हद्दीतील जमीन मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे

| सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर. | जुना सर्व्हे नंबर./ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्र. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ६१/६ | ७६/६ | ०.१८.०० | ३.१२ |

ठिकाण : कर्जत
दिनांक : ११.०९.२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
पत्ता मु.पो.चिंचवळी ता.कर्जत
जि. रायगड
ई मेल : ubhagat79@gmail.com
मो.नं. ९०४९४८६८०५

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे बागमळा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-१५-१० आर्स शेतजमिन मिळकत श्री.अभय दत्तात्रय घरत व श्री निवास गजानन घरत यांच्या सामाईक मालकीची असून,

सदरील मिळकतीपैकी दक्षिणेकडील ०-०७-६० आर्स शेतजमिन मिळकत श्री.अभय दत्तात्रय घरत, राहणार ठाणे, यांच्या हिश्श्याची व निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री.अभय दत्तात्रय घरत, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट या अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बागमळा, ता.अलिबाग, | १२० | ०-३७-५०<br>०-१४-३० पो.ख.<br>०-५१-८० एकूण | ०-८१ |

सदरील शेतजमिन मिळकतीपैकी ०-१५-१० आर्स शेत जमिन मिळकत श्री. अभय दत्तात्रय घरत व श्री.निवास गजानन घरत अशा दोघांच्या सामाईक मालकीची असून, सदर जमिन मिळकतीपैकी श्री. अभय दत्तात्रय घरत यांच्या १/२ इतक्या अविभक्त हिश्श्याची दक्षिणेकडील ०-०७-६० आर्स शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : १०/०९/२०२६.

सही/-
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड. खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सदरील जमीन मिळकत व त्याच्या वरील निवासी सदनिका मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरील जमीन मिळकत व निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

मौजे-मुद्रे खुर्द, तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत सदरील जमीन मालकाचे नाव :- ज्ञानसगर गृह निर्माण सह संस्था मर्यादित, स.नं.४ हिस्सा नं. अ प्लॉट नं.१३, क्षेत्र :-१-९३-३१ हे.आर.पॉ., आकार रु.पै. :- ३-८७ असे आहे. वरील जमीन मिळकतीमध्ये असलेल्या निवासी सदनिकेचे वर्णन खालील प्रमाणे

निवासी सदनिकेच्या मालकाचे नाव :- श्री. मनोहर विष्णु गोडबोले, नगरपालिका मालमत्ता क्रमांक :- KARJ00007260, सदनिका क्रमांक :- १३५/०१, क्षेत्र :- ७३ चौ. मी. असे आहे.

तरी सदर जमीन मिळकत व त्याच्या वरील निवासी सदनिका मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :- ११/०९/२०२६
मो. नं. ९९२१०२३८९४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट.
**ॲड. योगेश का. देशमुख**
पत्ता: श्री गणेश प्रसाद सोसा.प्लॅट नं.१०४.
कदम वाड्या जवळ, स्टेशन रोड. कर्जत
ता. कर्जत जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांना मौजे भिसराई, ता. अलिबाग जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालक पांडूरंग नारायण पाटील, दिलीप मुकूंद पाटील, स्नेहा संतोष पाटील, सुनंदा मुकूंद पाटील, भारती नियोग म्हात्रे आणि हरिष मुकुंद पाटील यांचेकडुन खरेदी घेण्याचा करार केला आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे भिसराई, ता.अलिबाग, जि.रायगड येथील**

| भुमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकारणी रू.पैसे. |
|---|---|---|
| १२१ | ००-६३-०० | ७.९४ |

पैकी दक्षीण-पूर्व (अग्नेय) दिशेकडील ००-२४-०० हे. आर.

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १०/०९/२०२६

**ॲड.रविंद्र विनायक ओक**
'गुरूकृपा' महर्षी कर्वे रोड,
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत पराग शेवन्तिलाल पटनी, राहणार अलिबाग यांच्या मालकीची असून सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव, ता.अलिबाग. | १९३३/२/१ | ५-००-०० एकूण | ५०-०० |

अलिबाग,
दिनांक : १०/०९/२०२६.

**सही/-**
**(ॲड.संजय शां.म्हात्रे)**
**नाईक आळी,नागाव,**
**ता.अलिबाग, जि.रायगड.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-पाषाणे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| १) संतोष झिपरू विशे<br>२) वंदना भरत शेळके | १५ | १/ब | ०-६७-०० | ० | १३ |

सदरील मिळकतीपैकी १) संतोष झिपरू विशे, २) वंदना भरत शेळके यांचे मालकीचे अविभक्त सामाईक हिश्याचे क्षेत्र

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला,गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१.

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ११/०९/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे-अंत्राट तर्फे निड, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.चौ.मी | रुपये | पैसे |
| अनिल गणु हजारे<br>बाळकृष्ण गणु हजारे | २७ | २५ | ०-१७-०० | ० | १० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :-११/०९/२०२६

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## निवडक



● (छायाचित्रः गणेश चोडणेकर)

### पोषण महिना कार्यक्रमाचा शुभारंभ

**आगरदांडा** : महिला व बालविकास विभाग, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आणि मुरुड पंचायत समितीच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील ११३ अंगणवाड्यांमधून राष्ट्रीय पोषण महिना राबविण्यात येणार आहे. त्याची सुरूवात बुधवारी (दि.९) झाली असुन, दि.९ ऑक्टोबर पर्यंत ''आमची अंगणवाडी, आमची जबाबदारी'' या संकल्पनेतून पोषण, आरोग्य, बालसंगोपन आणि बालविकासाबाबत विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत. उसरोली येथे बालविकास प्रकल्प अधिकारी संजय शेडगे यांचे हस्ते पोषण महा कार्यक्रमाचा शुभारंभ केला. यावेळी १६ अंगणवाडी सेविका , मदतनीस व ग्रामपंचायत हद्दीतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आहारातील विविधता, पुरेशा प्रथिनांचा आहार, ताजा व गरम शिजवलेला आहार, स्वच्छता आणि बालकांच्या विकासासाठी पोषण उद्दीपनाबाबत पालक व नागरिकांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. स्थानिक पातळीवर उपलब्ध पौष्टिक पदार्थांचा आहारात समावेश करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. मुरुड तालुक्यातील २४ ग्राम पंचायतीतील ११३अंगणवाडी सेविका व १०६ मदतनीसांकडून गृहभेटी घेऊन ० ते ३ वर्षे वयोगटातील बालकांचे पोषण, आरोग्य व विकासाबाबत पालकांचे समुपदेशन केले जाणार आहे.



### 'सुमंगल स्पेशल स्कूल'ला भेट

**माणगाव** : तालुक्यातील मोर्बा येथील युनायटेड एज्युकेशन अँड ट्रस्ट संचालित युनायटेड इंग्लिश स्कुलमधील इयत्ता ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी बुधवारी (दि.९) पेण येथील सुहित जीवन ट्रस्टच्या 'सुमंगल स्पेशल स्कूल'ला भेट दिली. सुहित जीवन ट्रस्टच्या संस्थापिका व अध्यक्षा डॉ. सुरेखा पाटील या गेली २९ वर्ष या सेवेत कार्यरत आहेत. विशेष मुलांसाठी कार्यरत असलेल्या या संस्थेचे काम प्रत्यक्ष पाहताना विद्यार्थ्यांना केवळ एका शाळेची ओळख झाली नाही, तर प्रेम, माणुसकी, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या एका विलक्षण विश्वाचा अनुभव मिळाला. या भेटीत विद्यार्थ्यांसोबत शाळेच्या मुख्याध्यापिका झोया बडे तसेच शिक्षक-शिक्षिका सहभागी झाले होते. सन २००४ मध्ये अवघ्या १० मुलांना सोबत घेऊन सुरू झालेला सुहित जीवन ट्रस्टचा प्रवास आज मोठ्या कुटुंबाचे रूप धारण करीत आहे. सध्या ५४ हून अधिक गावांतील १३० पेक्षा अधिक विशेष मुलांच्या शिक्षण, प्रशिक्षण, विकास आणि स्वावलंबनासाठी संस्था कार्यरत आहे.



### विसर्जन घाटाकडील मार्गांची स्वच्छता

**खांदेश्वर** : आगामी गणेशोत्सवातील श्री गणेशमूर्ती विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पनवेल प्रभाग क्रमांक १९ मधील विसर्जन घाटाकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांची विशेष स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. नागरिकांना तसेच गणेशभक्तांना विसर्जनासाठी ये-जा करताना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी रस्त्यांवरील दगड, गवत, माती आणि चिखल हटवून परिसर स्वच्छ करण्यात आला. या मोहिमेत छत्रपती शिवाजी महाराज सर्कल ते आनंदनगर येथील वीरूपक्ष मंदिर, तसेच कर्मवीर भाऊराव पाटील चौक ते नाट्यगृह रोड या प्रमुख मार्गांची साफसफाई करण्यात आली. विसर्जन मिरवणुकांच्या वेळी या मार्गांवर मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने स्वच्छतेला प्राधान्य दिले आहे. रस्त्याच्या कडेला साचलेली माती, चिखल आणि दगड उचलून मार्ग मोकळा करण्यात आला. काही ठिकाणी वाढलेले गवतही काढून परिसराची स्वच्छता करण्यात आली. त्यामुळे विसर्जन घाटाकडे जाणारे प्रमुख मार्ग अधिक सुरक्षित आणि सुकर होण्यास मदत होणार आहे. या विशेष स्वच्छता मोहिमेची पाहणी मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक महेंद्र भोईर आणि रीना बहिरे यांनी केली.


(छायाचित्रः राकेश खराडे)

### काव्या गाडगेचा विशेष सन्मान

**रसायनी** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेत खालापूर तालुक्यातील काव्या गाडगे हिने रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक तसेच महाराष्ट्र राज्याच्या गुणवत्ता यादीत ग्रामीण भागातून सातवा क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे तिचा खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी सभापती पारंगे यांनी काव्याचे कौतुक करून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा परिषद रेश्मा पाटील, कमल भसमा, काव्याचे आई-वडील तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## बेशिस्त कारभारामुळे उरण चारफाटा
# अतिक्रमणाच्या विळख्यात

**बेकायदा बाजारासह पार्किंगचा धुमाकुळ**

**अधिकारी-कर्मचाऱ्यांचा अशिर्वाद असल्याचा आरोप**



**वाहतूक कोंडीचा भडका उडणार**

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. या काळात उरण शहरात भाविकांची, वाहनांची आणि सार्वजनिक वाहतुकीची मोठी वर्दळ वाढणार आहे. अशा परिस्थितीत चारफाट्यावर बेकायदा बाजार, टपऱ्या, हातगाड्या आणि रस्त्यावर उभी केली जाणारी वाहने कायम राहिली, तर उत्सवाच्या काळात वाहतूक कोंडीचा भडका उडण्याची शक्यता नाकारता येत नाही. एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासनाने जागे होण्यापेक्षा आत्ताच जागे होऊन चारफाटा मोकळा करणे अत्यावश्यक बनले आहे.

**बेकायदा धंद्यांना लाल दिवा दाखवा**

उरण चारफाटा हा जनतेच्या वाहतुकीचा मार्ग आहे; तो कोणाच्या वसुलीचा अड्डा होऊ देऊ नका. सिग्नलला हिरवा दिवा दाखवायचा असेल, तर आधी बेकायदा धंद्यांना लाल दिवा दाखवा. गणेशोत्सवाच्या गर्दीपूर्वी चारफाटा मोकळा करा, अन्यथा वाहतूक कोंडीचा हा खेळ प्रशासनाच्या नाकावर टिच्चून सुरूच राहील. तसेच, 'वसुली झाली की कारवाई थांबते?' हा प्रश्न आता चारफाट्यावर चर्चेचा विषय बनला आहे. अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना मोकळे रान मिळत असेल, तर प्रशासनाचा धाक नेमका कुठे गेला? असा संतप्त सवाल जनतेतून केला जात आहे.

| उरण | प्रतिनिधी |

उरण चारफाटा येथे वाहतूक कोंडी फोडण्यासाठी सिग्नलची व्यवस्था करण्यात आली असून, त्याची चाचपणी सुरू आहे. वाहनचालकही सिग्नलचे पालन करताना दिसत आहेत. मात्र, एका बाजूला वाहतूक शिस्तीचा गाजावाजा आणि दुसऱ्या बाजूला रस्त्यावर बेकायदा बाजार, टपऱ्या, हातगाड्या आणि बेशिस्त पार्किंगचा धुमाकूळ सुरू असेल, तर सिग्नलचा हिरवा दिवा नेमका कशासाठी? असा संतप्त सवाल उरणच्या जनतेतून उपस्थित केला जात आहे.

उरण येथील चारफाटा परिसरात विशेषतः दर रविवारी भरणाऱ्या आठवडा बाजारामुळे मोठी गर्दी होते. त्यातच बेकायदा टपऱ्या आणि हातगाड्यांचा सुळसुळाट सुरू असल्याने रस्त्याच्या कडेला अतिक्रमणाचा विळखा पडला आहे. इको, रिक्षा, टेम्पो तसेच खासगी वाहने भर रस्त्यात उभी केली जात असल्याने वाहतुकीचा अक्षरशः बोजवारा उडत आहे. त्यामुळे रस्ता जनतेच्या वापरासाठी की अतिक्रमण करणाऱ्यांच्या सोयीसाठी? असा सवाल आता नागरिक विचारत आहेत. तसेच, बेकायदा बाजार, टपऱ्या आणि हातगाड्यांकडून नियमितपणे वसुली केली जाते. या कथित वसुलीमध्ये शासकीय यंत्रणेतील काही अधिकारी-कर्मचाऱ्यांचा वाटा असल्यामुळेच या बेकायदा धंद्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप जनतेतून होत आहे. त्यामळे चारफाट्यावरील बेकायदा धंदे आणि कथित वसुलीची वरिष्ठ पातळीवर निष्पक्ष चौकशी करून वसुलीमागचे हात कोणाचे आहेत, याचा पर्दाफाश करावा, अशी मागणी होत आहे.

तसेच, चारफाट्यावर उभारण्यात आलेल्या सर्कलमुळे मोठ्या वाहनांच्या वळणाचाही प्रश्न निर्माण झाला आहे. एका बाजूचा रस्ता अरुंद असल्याने मोठ्या बसेसला वळण घेताना अडचणी येतात. त्यातच एसटी आणि एनएमएमटी बसस्थानकाची व्यवस्था योग्य नियोजनाशिवाय राबवली गेली, तर चारफाटा वाहतूक सुरळीत होण्याऐवजी आणखी कोंडीत जाण्याची शक्यता आहे. एसटी बसेससाठी इनगेटची व्यवस्था करण्यात आली असली तरी तो अद्याप सुरू करण्यात आलेला नाही. त्याचबरोबर रस्त्यावर वाहने कुठे उभी करावीत आणि कुठे उभी करू नयेत, हे स्पष्ट करणारे पांढरे पट्टेही अद्याप मारण्यात आलेले नाहीत. त्यामुळे वाहनचालक मिळेल तिथे वाहने उभी करतात आणि वाहतूक कोंडीला निमंत्रण मिळते. याठिकाणी सिग्नलचा हिरवा दिवा लागला म्हणून चारफाट्याची वाहतूक हिरवीगार होणार नाही; आधी अतिक्रमणांचा काटा काढावा लागेल! बेकायदा बाजार, टपऱ्या, हातगाड्या आणि रस्त्यावरचे अनधिकृत पार्किंग हटविल्याशिवाय वाहतूक व्यवस्थेची सुधारणा केवळ कागदावरच राहील, असे उरणच्या जनतेतून बोलले जात आहे.

त्यामुळे संबंधित प्रशासनाने आता बघ्याची भूमिका सोडून मैदानात उतरावे. चारफाट्याची प्रत्यक्ष पाहणी करून बेकायदा अतिक्रमणे तातडीने हटवावीत, रस्त्यावरील अनधिकृत पार्किंगवर कठोर कारवाई करावी, एसटी इनगेट सुरू करावा, पांढरे पट्टे मारावेत आणि मोठ्या वाहनांसाठी योग्य व सुरक्षित वळणाची व्यवस्था करावी. त्याचबरोबर बेकायदा बाजार, टपऱ्या आणि हातगाड्यांकडून कथितपणे होणाऱ्या वसुलीची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करावी. जर शासकीय यंत्रणेतील कोणाचा या कथित वसुलीशी संबंध आढळला, तर संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी उरणच्या जनेतेकडून होत आहे.

## नगरपरिषदेच्या प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह




| कर्जत | प्रतिनिधी |

माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेच्या प्रशासकीय नोंदींच्या जतनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. डिसेंबर २०२३ पासून मुख्याधिकाऱ्यांची दैनंदिनी, भेट नोंदवही, हालचाल नोंदवही आणि शासकीय दौऱ्यांच्या नोंदी मागविण्यात आल्या होत्या. मात्र, नगरपरिषदेकडून अधिकृत उत्तर देण्यात आले आहे. त्यामुळे या कालावधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन हालचाली तसेच मुख्याधिकाऱ्यांच्या शासकीय दौऱ्यांचा अधिकृत मागोवा कसा ठेवला जात होता, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सामाजिक कार्यकर्ते दिगंबर चंदने यांनी दि.२७ मे रोजी माहिती अधिकाराचा अर्ज माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेत दाखल करून मुख्याधिकाऱ्यांची दैनंदिनी, भेट नोंदवही, हालचाल नोंदवही आणि शासकीय दौऱ्यांच्या नोंदींची साक्षांकित प्रती मागितल्या होत्या. त्याशिवाय या नोंदवही अद्ययावत ठेवण्यासंदर्भातील शासन नियम, अटी व परिपत्रकांच्या प्रतींची मागणी केली होती. मात्र, दि.३० जुलै रोजी नगरपरिषदेच्या जनमाहिती अधिकाऱ्याने, संबंधित माहिती अस्तित्वात नसल्याचे स्पष्टपणे नमूद केलेले नसून, या कार्यासनाच्या अभिलेख्यात आढळून आली नाही, असे उत्तर दिले आहे. त्यामुळे संबंधित नोंदी तयारच करण्यात आल्या नव्हत्या का? त्या अन्य विभागाकडे वर्ग करण्यात आल्या आहेत का? अभिलेख जतन प्रक्रियेत काही त्रुटी झाली आहे का? किंवा सध्या त्या शोधण्यात अपयश आले आहे का? याचा स्पष्ट खुलासा होणे आवश्यक असल्याची मागणी देखील करणार असल्याचे दिगंबर चंदन यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

## प्रज्वल पाटील प्रकरणी सखोल तपासणीची मागणी

| रसायनी | प्रतिनिधी |

रिस-मोहोपाडा येथील १३ वर्षीय प्रज्वल पाटील योन दि. २३ ऑगस्ट रोजी राहत्या घरी आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्यानंतर त्याला तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले; मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमागील कारणांबाबत काही गंभीर शंका असल्याचे नमूद करत वडील रणजित पाटील यांनी या प्रकरणाचा सर्वंकष तपास करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. त्यांनी प्रज्वलच्या मोबाईलमधील इंस्टाग्राम संभाषणे, गुगल सर्च हिस्ट्री, कॉल तपशील तसेच अन्य डिजिटल पुरावे तपासावेत. उपलब्ध तांत्रिक व कायदेशीर प्रक्रियेच्या आधारे संबंधित डिजिटल पुरावे सुरक्षित करून त्यांची फॉरेन्सिक तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, प्रज्वलच्या संपर्कातील काही अल्पवयीन व्यक्तींसह संबंधित व्यक्तींच्या डिजिटल संवादांची चौकशी करून, घटनेपूर्वी त्याच्यावर कोणत्याही प्रकारचा मानसिक दबाव, धमकी, ब्लॅकमेलिंग, प्रवृत्त करणे किंवा अन्य दबाव होता काय, याची वस्तुनिष्ठपणे तपासणी करावी, असे रणजित पाटील यांनी म्हटले आहे.

## १५ हजारांची दुचाकी चोरी

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल रेल्वे स्थानकाजवळ पार्क केलेली सुमारे १५ हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुचाकी मालकाचे नाव दिशांत दिनेश तेंडुलकर (३५) असे असून, त्यांनी आपली लाल व काळ्या रंगाची हिरो होंडा कंपनीची पॅशन प्लस दुचाकी पनवेल रेल्वे स्थानकाजवळील पार्किंगच्या बाहेरील आवारात, इमारतीसमोरील रस्त्यावर उभी केली होती. चोरट्याने ती दुचाकी चोरून नेली.

## पाणी गळतीमुळे रस्त्याला खड्डा



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

हरिहरेश्वर जसवली फाटा ते श्रीवर्धन मार्गावरील आराठी येथे असलेल्या रॉयल रेसिडेन्सी समोर जवळजवळ तीन महिन्यांपासून पाण्याची पाईपलाईन फुटलेली आहे. सुरुवातीला या फुटलेल्या पाईपलाईनमधून अत्यंत कमी प्रमाणामध्ये पाणी गळत होते. याबाबत 'कृषीवल'च्या प्रतिनिधींनी मुख्याधिकाऱ्यांना अनेकदा कळविले होते. परंतु, दरवेळी पाईपलाईन दुरुस्त करण्याचे केवळ आश्वासन मिळाले. मात्र, आता पाईपलाईन मधून जास्त प्रमाणात पाणी गळत असून, त्या ठिकाणी खोल खड्डा तयार झाला आहे. या खड्ड्यात एखादी मोटरसायकल अडकली, एखादा लहान मुलगा पडला किंवा गंभीर अपघात घडला तर याला जबाबदार कोण? एखादी गंभीर दुर्घटना घडल्यावरच प्रशासनाला जाग येणार का? त्यातच यंदा पावसाचे प्रमाण खूप कमी आहे. श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या रानवली पाझर तलावामध्ये पाण्याचे प्रमाण देखील अत्यल्प आहे. भविष्यातील पाण्याची गरज ओळखून नगर परिषदेने पाणी वाचवण्याची आवश्यकता असल्याचे बोलले जात आहे.


● (छायाचित्रः राजेश डांगळे)

## हरतालिका मूर्तींना अंतिम रूप

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

गणेशोत्सवाला दि.१४ सप्टेंबरपासून सुरुवात होत असून, त्याच दिवशी हरतालिका पूजनही होणार आहे. यावेळी हरतालिकेच्या निमित्ताने महिला वर्गाकडून पूजन केले जाते. त्यामुळे पनवेलच्या कुंभारवाड्यात हरतालिका मूर्ती तयार करण्याच्या कामाला वेग आला आहे. येथील मूर्तिकारांकडून विविध आकारांच्या आकर्षक हरतालिका मूर्तींना रंगरंगोटी व सजावटीचे अंतिम रूप देण्यात येत आहे. पारंपरिक पद्धतीने तयार करण्यात येणाऱ्या या मूर्ती खरेदीसाठी महिला वर्गाची लगबग सुरू झाली आहे.

## शहर बचाव समितीची बैठक


● (छायाचित्रः संजय गायकवाड)

| कर्जत | प्रतिनिधी |

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कर्जत शहरातील विविध प्रलंबित नागरी समस्यांचा आढावा घेण्यासाठी कर्जत शहर बचाव समितीची आढावा बैठक बुधवारी (दि.९) नगरपरिषद कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या सुरुवातीला समितीचे कार्यवाहक ॲड. कैलास मोरे यांनी, मागील बैठकीत मांडण्यात आलेल्या विविध प्रश्नांवर नगरपरिषद प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला. या बैठकीस मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, परिवर्तन विकास आघाडीचे समन्वयक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, तसेच नगरसेवक उपस्थित होते. यावेळी पाणीप्रश्नावर उपाययोजना सुरू कर्जत शहरातील गंभीर पाणीप्रश्नावर नगरपरिषदेकडून विविध उपाययोजना सुरू असल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. बैठकीच्या शेवटी उर्वरित प्रलंबित प्रश्नही लवकरात लवकर मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. कर्जत शहरातील नागरिकांच्या प्रश्नांसाठी समिती सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. तसेच, जेव्हा कधी नगरपरिषद काम करणेस कमी पडेल त्यावेळेस कर्जत शहर बचाव समितीच्यावतीने आंदोलनाचा पवित्रा घेण्यात येईल, असे सांगण्यात आले.

## नशेत पोलीस ठाण्यात गोंधळ

- **कर्तव्यात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न**
- **प्रकाश पवार याच्याविरोधात गुन्हा दाखल**

| पनवेल | प्रतिनिधी |

दारूच्या नशेत थेट पोलीस ठाण्यात घुसून गोंधळ घालत पोलिसांच्या कर्तव्यात अडथळा निर्माण करणाऱ्या व्यक्तीविरोधात कामोठे पोलिसांनी कारवाई केली आहे. पोलिसांना शिवीगाळ करून धमकी दिल्याप्रकरणी प्रकाश पांडुरंग पवार (३८) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रकाश पवार हा कामोठे सेक्टर ७ परिसरात राहतो. तो दारूच्या नशेत कामोठे पोलीस ठाण्यात आला. त्यानंतर त्याने मोठमोठ्याने आरडाओरड करून सार्वजनिक शांततेचा भंग केला. पोलिसांनी त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला असता, त्याने कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांसोबत हुज्जत घालण्यास सुरुवात केली. तसेच, पोलिसांना अरेरावीची भाषा वापरून धमकावले. पोलिसांची नोकरी घालविण्याची धमकी देत त्याने शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

## उलवेमध्ये ट्रेलरची कारला धडक

| पनवेल | प्रतिनिधी |

उलवे पुल सर्कलजवळ भरधाव ट्रेलरने कारला धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात कारचे नुकसान झाले आहे. उलवे पुल सर्कल येथील पाण्याच्या पुलाच्या टाकीखाली ही घटना घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फॅलेक्स डिसोझा (३०) हे मारुती इको कारमधून प्रवास करीत होते. त्यावेळी ट्रेलरच्या चालकाने ट्रेलर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून डिसोझा यांच्या कारला बाजूने धडक दिली.

**चिमुकल्यांनी घेतला अध्यापनाचा आनंद** | **आत्मविश्वास, नेतृत्वगुणांना नवी उभारी**

## शाळेतील विद्यार्थी बनले शिक्षक

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

शिक्षक दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजावे, तसेच शिक्षकाची भूमिका, जबाबदारी आणि अध्यापनातील आनंद विद्यार्थ्यांना अनुभवता यावा, या उद्देशाने रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा नवघर येथे आगळावेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिक्षक दिनाच्या निमित्ताने इयत्ता सातवी व आठवीतील विद्यार्थ्यांनी चक्क 'विद्यार्थी शिक्षक' बनून इयत्ता पहिलीपासून सातवीपर्यंतच्या वर्गांचे अध्यापन केले.


● (छायाचित्रः धम्मशील सावंत)

या उपक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थी शिक्षकांनी शाळेतील शिक्षकांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. त्यानंतर विद्यार्थी शिक्षकांनी विविध वर्गांमध्ये जाऊन आपल्या आवडीच्या विषयांचे अध्यापन केले. हसत-खेळत शिक्षण, मनोरंजक कृती, खेळ, प्रश्नोत्तर, कविता, संवाद आणि विविध शैक्षणिक पद्धतींचा वापर करत विद्यार्थ्यांनी अध्यापनाचा मनमुराद आनंद घेतला. या उपक्रमात परी, खुशी, आर्या, सामर्थ्य, शुभम, आरोही, दीपाली आणि उर्मी या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शिक्षकाची भूमिका साकारताना विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि सादरीकरण कौशल्य विकसित होत असल्याचे दिसून आले.

यावेळी शुभम ठाकूर याने आपला अनुभव सांगताना, ''आज शिक्षक होऊन मुलांना शिकवताना खूप आनंद झाला. शिक्षक म्हणून वर्ग घेणे वेगळेच वाटले. मुलांना समजावून सांगताना शिक्षकांचे काम किती आनंददायी आणि जबाबदारीचे आहे, याचा अनुभव आला,'' असे सांगितले. तसेच, परी आणि खुशी यांनी, वर्गात सुंदर कविता सादर करून विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात सहभागी करून घेतले. विद्यार्थ्यांनीही आपल्या मोठ्या दादांना-ताईंना शिक्षकाच्या भूमिकेत पाहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन विषयशिक्षिका वृषाली गुरव व उपशिक्षक राजेंद्र अंबिके यांनी केले. विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्त्व केवळ ऐकून नव्हे, तर प्रत्यक्ष शिक्षकाची भूमिका अनुभवून समजावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे आयडॉल शिक्षक राजेंद्र अंबिके यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना 'शिक्षक होण्याचा' अनुभव देणारा हा उपक्रम नवघर शाळेत आनंददायी, अनुभवाधारित आणि संस्मरणीय ठरला.




## राशीभविष्य

- **मेष** : अचानक पैसा हाती येणार आहे. महत्त्वाच्या कामांना गती येईल. नव्या विचारांना चालना मिळेल.
- **वृषभ** : कौटुबिक जीवनात स्वास्थ्य लाभेल. अडचणीतून मार्ग निघेल. उपजत कला-गुणांचा विकास होईल.
- **मिथुन** : नव्या योजना मार्गी लागतील. उत्साहवर्धक घटना घडतील. चिंता कमी झाल्याने समाधान लाभेल.
- **कर्क** : अर्थप्राप्तीचे विविध मार्ग उपलब्ध होणार आहेत. शिक्षणातून प्रगती होईल. अनावश्यक खर्च टाळावे.
- **सिंह** : आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. अभियांत्रिकी क्षेत्रात प्रगती होईल. सुसंधींचा लाभ उठवा.
- **कन्या** : आनंददायी घटना घडतील. आर्थिक चिंता राहणार आहे. औषधपाण्यासाठी खर्च करावा लागेल.
- **तूळ** : आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. घरात सुखसोयींच्या वस्तू घ्याल. नव्या संधींचा लाभ उठवावा.
- **वृश्चिक** : आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. सुख-स्वास्थ लाभेल, दैनंदिन कामात अधिक लक्ष लागेल.
- **धनु** : कार्यक्षेत्रात मनासारखं यश लाभेल. भाग्य वृध्दींगत करणाऱ्या घटना घडतील. स्पर्धेत यश मिळेल.
- **मकर** : नव्या विचारांना चालना मिळेल. शारीरिक तक्रारींची दखल घ्यावी. अडचणीतून मार्ग निघू शकेल.
- **कुंभ** : नव्या कामांना गती प्राप्त होईल. अडचणी कमी होतील. कौटुंबिक जीवनात सामंजस्यानं रहावं.
- **मीन** : नव्या योजना मार्गी लागतील. प्रगतीच्या संधींचं स्वागत करावं. सर्व प्रतिकूलतेवर मात कराल.

## दिन विशेष
### ११ सप्टेंबर

**१९०१** : मराठीतील श्रेष्ठ कवी आत्माराम रावजी देशपांडे ऊर्फ अनिल यांचा जन्म.
**१९८७** : सुप्रसिद्ध हिंदी कवयित्री महादेवी वर्मा यांचे निधन.
**२०१४** : जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या 'अग्नी १' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेण्यात आली.
**२०१७** : अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेत राफेल नदालने पुरुष एकेरीचं विजेतपद जिंकलं.

## आरोग्यमंत्र
### दुसऱ्यांचा कंगवा वापरताय?

घरात जेवढी माणसं आहेत, तेवढे कंगवे असलेच पाहिजेत. शिवाय येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांसाठी एक दोन कंगवे एक्स्ट्राचे ठेवावेच. कारण एकमेकांचे कंगवे शेअर करणं म्हणजे स्वत:च्या केसांचं चांगलंच नुकसान करून घेणं आहे. शक्यतो कुणाचा कंगवा शेअर करूच नये. पण अगदीच गरज असली, तर जो कंगवा वापरणार आहात तो सॅनिटाईज करून



स्वच्छ कपड्याने पुसून घ्या आणि त्यानंतरच वापरा. मोठ्या माणसांचा कंगवा लहान मुलांसाठी अजिबात वापरू नये. मुलांचा कंगवा वेगळाच ठेवावा. अनेक घरांमध्ये बरेच कंगवे असतात. पण कुणी कोणता कंगवा वापरायचा याचे काही नियोजन नसते. हाताला येईल तो कंगवा घ्यायचा आणि केस विंचरून मोकळे व्हायचे, असे करत असाल तर थांबा. एकमेकांचे कंगवे वापरण्याची सवय सोडून द्या. कारण असं करणं तुमच्या केसांच्या आणि डोक्याच्या त्वचेच्या आरोग्यासाठी अतिशय घातक ठरू शक्अनेकदा ऑफिसमध्ये किंवा कुणाच्या घरी पाहुणे म्हणून राहायला गेल्यावर किंवा एखाद्या लग्न- समारंभप्रसंगी कार्यालयात, हॉटेलमध्ये राहण्याची वेळ आल्यावर अनेक जण सर्रास आपले कंगवे एकमेकांसोबत शेअर करतात. मुळात कंगवा शेअर करण्याचे काही साईड इफेक्टही असू शकतात. अनेकदा आपला कंगवा लहान मुलांच्याही डोक्यात फिरवतो. असे करणे खूपच त्रासदायक ठरू शकते.

## टेक फन
### मोबाईल ठरवतोय मूड

मुलांनो, मोबाईल फोन स्मार्ट झाल्यापासून आपलं आयुष्य पूर्णपणे बदलून गेलं आहे. आपण आता मैदानी खेळ खेळत नाही तर मोबाईलच्या आभासी जगात गुंतलेले असतो. आपल्या आयुष्यातल्या बऱ्याच गोष्टी आता हा स्मार्टफोन ठरवू लागला आहे. आपला मूडही स्मार्टफोनच्या बॅटरीनुसार बदलू लागला आहे. ऑल्टो विद्यापीठाने फोनच्या बॅटरीचा माणसाच्या मूडवर होणाऱ्या परिणामांबाबत अभ्यास केला. त्यातून ही भन्नाट माहिती समोर आली आहे.

स्मार्टफोनची बॅटरी पूर्ण चार्ज असताना लोकांचा मूड चांगला रहात असल्याचं हा अभ्यास सांगतो. बॅटरी पूर्ण चार्ज केलेला फोन घेऊन बाहेर पडल्यावर माणसं दिवसभर उत्साही रहतात. पण मोबाईल अर्धा किंवा कमी चार्ज असेल तर मूडचा पार विचका होऊन जातो. हे लोक खूप चिडचिड करतात. त्यांचं कामही नीट होत नाही. लंडन विद्यापीठातही यावर संशोधन करण्यात आलं. फोन १०० टक्के चार्ज असेल तेव्हा लोकांच्या मनात सकारात्मक विचार येतात आणि कमी चार्ज असताना नकारात्मक विचार येत असल्याची बाब समोर आली आहे. या संशोधनासाठी २३ ते ५७ या वयोगटातल्या लोकांचा अभ्यास करण्यात आला.

## स्टाईल स्टेटमेंट
### अनोख्या रंगसंगती

स्टायलिंगमध्ये रंगसंगतीला खूप महत्त्व असतं. आपण ठराविक रंगसंगतीचे कपडे नेहमीच परिधान करत असतो. काळा, नेव्ही ब्लू, पांढरा हे रंग ऑल टाईम हिट ठरतात. विविध रंगांसोबत शोभून दिसतात. त्यामुळे कुर्ता किंवा टॉपवर बॉटम कॅरी करायची असेल तर याच रंगांना प्राधान्य दिलं जातं. इतकंच नाही तर कपड्यांमध्येही ठराविक रंगसंगती पहायला मिळते. पण तुम्ही वेगळ्या रंगसंगतीचे कपडेही घालू शकता. ठराविक रंगसंगतींपलीकडे विचार करू शकता. अशाच काही हटके रंगसंगतींविषयी...

✻ व्हाईट अँड सिल्व्हर हे कॉम्बिनेशन छान दिसतं. बॉलिवूडमधल्या बऱ्याच अभिनेत्रींनी या रंगसंगतीचे कपडे परिधान केले आहेत. मध्यंतरी दीपिका पदुकोणने या रंगसंगतीचा पेहराव केला होता. तुम्हाला व्हाईट टॉप आणि सिल्व्हर बॉटम कॅरी करता येईल किंवा पांढऱ्या स्कर्टवर झगमगता चंदेरी टॉप घालता येईल. **(क्रमश:)**

## पंचांग

**शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
श्रावण कृ. १५, चंद्रराशी : सिंह,
नक्षत्र : पू. फाल्गुनी, योग : साध्य,
सूर्योदय ६.२८, सूर्यास्त ६.४३

## फॉरवर्ड्स

**मुड़े मुड़े से हैं क़िताब-ए-ज़िंदगी क़े पन्ने...**

**ये क़ौन हैं ज़ो हमें हमारें बाद पढ़ने आतें हैं...!**

## भटकंती

महाराष्ट्रातलं जव्हार खूप सुंदर पर्यटन स्थळ आहे. जव्हारमध्ये तुम्हाला आदिवासी संस्कृती अनुभवायला मिळेल. वारली चित्रकृतींसाठीही हा भाग प्रसिद्ध आहे. हिरवाईने नटलेलं जव्हार तुम्हाला आकर्षित करेल. इथली छोटी छोटी घरं मन मोहवून टाकतील. ग्रामीण जीवनाचा आनंद तुम्ही लुटू शकता. इतर पर्यटन स्थळांप्रमाणे इथे फार गर्दी किंवा गजबजाट नसतो. त्यामुळे तुम्हाला इथे खूप निवांत वाटेल. जव्हार परिसरात बघण्यासारखं बरंच काही आहे. या भागात एकापेक्षा एक सुंदर धबधबे आहेत. या धबधब्यांखाली भिजताना खूप गंमत वाटते. **(क्रमश:)**

## करिअरवाटा
### व्यवसाय पेपर कप्सनिर्मितीचा

सणा-समारंभांमध्ये द्रव पदार्थ सर्व्ह करण्यासाठी कागदी कपांचा वापर केला जातो. हे कप दिसायला आकर्षक असतात. इकोफ्रेंडली असल्यामुळे पर्यावरणाची हानी होत नाही.



त्यामुळे अशा कागदी ग्लासचा वापर वाढत आहे. तुम्हीही शिक्षण पूर्ण झाल्यानंतर स्वत:चा व्यवसाय सुरू करायच्या विचारात असाल तर पेपर कप्सच्या व्यवसायाचा आढावा घ्यायला हरकत नाही. ✻ पेपर कप्सचा वापर विविध ठिकाणी केला जातो. त्यामुळे या कप्सची मागणी प्रचंड आहे. पेपर कप्सचं उत्पादन वाढवल्यानंतर रेस्तराँ, कॉफी शॉप्स, हॉटेल्स, टी स्टॉलशी कनेक्ट होता येईल. पेपर कप्सचा वापर करत असलेल्या संस्था संघटनांशी संपर्क वाढवता येईल. ✻ पेपर कप्सच्या निर्मितीसाठी एक हजार वर्गफूट जागा हवी. या जागेत दोन उपकरणं बसवता येतील. त्यासाठी सहा ते सात लाख रूपये खर्च येईल. यापासून दिवसाला १५ ते २० हजार कप्सची निर्मिती होईल.✻ खरेदी, प्रिंटिंग, कागद कापणं, कपची निर्मिती, पॅकेजिंग आणि स्टोरेज असे या व्यवसायाचे विविध टप्पे आहेत. आईसक्रीम कप, ज्यूस कप, चहाचे कप असे विविध आकाराचे कप तयार करू शकता. पेपर कपच्या निर्मितीसाठी जास्त प्रशिक्षणाची गरज नसते.

## खेचाखेची
### लहान मासा

संजय आणि विजय हॉटेलमध्ये जेवायला जातात. दोन मासे आणायला सांगतात. वेटर दोन मासे आणतो; पण त्यातला एक लहान आणि एक मोठा असतो.
**संजय** : अरे घेना तू त्यातला एक.
**विजय** : नाही तूच घे आधी.
संजय त्यातला मोठा मासा घेतो.
**विजय** : तुझ्या जागी मी असतो तर लहान मासा निवडला असता.
**संजय** : मला माहीत होतं. म्हणूनच मी मोठा मासा घेतला.

## वेगळं काही

गाझियाबाद विकास महामंडळाच्या संचालकांच्या घराच्या गच्चीवर पक्ष्यांसाठी पाच मजली इमारत उभारण्यात आली आहे. हा पक्ष्यांसाठीचा गृहप्रकल्प आहे. या गृहप्रकल्पासाठी दोन लाख रुपये खर्च करण्यात आले. या प्रकल्पात ६० घरटी आहेत. म्हणजे प्रत्येक मजल्यावर १२ पक्षी राहू शकतात. ऊन आणि पावसापासून बचावासाठी या इमारतीवर छत्री लावण्यात आली आहे. पक्ष्यांची घरटी लाकडापासून तयार करण्यात आली आहेत. हा प्रकल्प प्राथमिक स्तरावर सुरू करण्यात आला आहे. इथे पक्षी राहू लागले तर शहरातल्या इतर इमारतींवरही अशाप्रकारे पक्ष्यांसाठी गृहप्रकल्प उभारण्यात येईल. याला 'बर्ड टॉवर' असं नाव देण्यात आलं आहे.

## जाणून घ्या
### हे उपाय करा

वेळ वाचवण्यासाठी तसंच अधिक चांगले परिणाम मिळवण्यासाठी काही टिप्स कामी येऊ शकतात. आता हेच पहा एखादी वस्तू गुंडाळण्यासाठी फॉईलचा उपयोग होतो. विशेषत: अन्न अधिक वेळ गरम राहण्यासाठी अॅल्युमिनिअम फॉईल वापरतात. मात्र या फॉईलचे इतरही अनेक उपयोग आहेत. उदाहरणार्थ ग्रीलवरची धुळ आणि जळमटं स्वच्छ करण्यासाठी पेपर फॉईलचा उपयोग केला जातो. पिझ्झा पुन्हा गरम करायचा असेल तर फॉईलमध्ये ठेवून गरम करावा. काळवंडलेली भांडी स्वच्छ करण्यासाठी देखील फॉईलचा उपयोग करणं शक्य आहे.



✻ लहान मुलांना सतत बाहेरचं, काही तरी चटपटीत खायचं असतं. त्यामुळे घरात बनवलेले अन्नपदार्थ खाण्याकडे मुलांचा फारसा कल नसतो. अशा वेळी सर्व्हिंगमधील बदल मुलांचा जेवणातला रस वाढवू शकतो. मुलांना जेवण सर्व्ह करताना पदार्थांना ड्रॅमॅटिक लूक देण्याचा प्रयत्न करावा. अनेकदा अन्न नीट शिजवलं न गेल्यानेही मुलं खाण्याबाबत तक्रार करतात. त्यामुळे अन्न नीट शिजलं आहे का याची खात्री करावी.

## सुडोकू १४८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | | ७ | ६ | | | | ९ | १ |
| | ८ | | | ७ | | २ | | |
| ६ | | २ | | ४ | ५ | | | |
| | २ | | | | | | | |
| ९ | १ | ६ | | ३ | | ७ | ४ | ८ |
| | | | | | | | १ | |
| | | | ७ | ८ | | ५ | | ४ |
| | | ८ | | ९ | | | ३ | |
| २ | ७ | | | | ४ | ९ | | ६ |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १४७चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | १ | ९ | ८ | ३ | ७ | ४ |
| ७ | १ | ३ | ६ | ४ | ५ | ८ | २ | ९ |
| ४ | ९ | ८ | २ | ७ | ३ | १ | ६ | ५ |
| ६ | ३ | ९ | ५ | ८ | १ | २ | ४ | ७ |
| ८ | ४ | २ | ३ | ६ | ७ | ९ | ५ | १ |
| ५ | ७ | १ | ९ | २ | ४ | ६ | ८ | ३ |
| ९ | ८ | ७ | ४ | १ | २ | ५ | ३ | ६ |
| १ | २ | ५ | ७ | ३ | ६ | ४ | ९ | ८ |
| ३ | ६ | ४ | ८ | ५ | ९ | ७ | १ | २ |

## शब्दकोडे क्रमांक १४८



**आडवे शब्द :-**
१) हल्या, रेडा
३) आभाराचा एक शब्द
६) पायापासून डोक्यापर्यंत
१०) भुई
११) तापट, रागीट
१३) सडक
१४) लाकडी जिना
१५) इंद्र
१६) दिनांक
१८) माणूस
२०) शुद्ध, पवित्र
२१) लक्ष्मीचे एक नाव
२३) अभिप्राय
२४) झाडाभोवतीचा कट्टा
२५) अंकुर, मूळ
२७) कट्टर
२८) पालखीत बसण्याचा अधिकार मिळलेला
३०) भेसळ
३२) चक्र
३३) मानलेला मुलगा
३७) मऊ
३९) देवासारखा
४१) लापशी
४३) घोड्याची गाडी
४५) धैर्य
४६) पुरुष
४७) अस्ताव्यस्त पडलेले सामान,
४९) धातूचा धागा
५०) शपथ
५२) समाचार
५३) रानरेडा
५५) राहुट्या, डेरे वगैरे ठेवण्याची जागा
५६) सावली
५७) एक पालेभाजी
५८) जास्तीतजास्त
६०) विद्युल्लता
६२) कोंदणात बसविण्याचे काम
६३) कापडी बैठक, सतरंजी
६५) प्रार्थना
६७) चांदी
६९) संपूर्ण
७१) न वापरलेला, नवा
७२) चिंतन
७३) दागदागिने
७४) मळलेला

**उभे शब्द :-**
१) अणकुचीदार
२) ज्याला कशाचीही पारख करता येत नाही असा
३) श्रीमंत
४) हवेचे आच्छादन
५) धमकी
७) परीक्षा, ज्ञान
८) बंदुकीचा मागचा भाग
९) स्तोत्र
१२) जानकी
१७) अस्वल
१८) मातीचा वास येऊ लागलेला
१९) अरण्यात राहाण्याची शिक्षा
२२) पत्ता, ठिकाण
२४) पालन करणारा
२५) एक श्वासरोग
२६) स्वत:ला
२८) चार शिष्ट लोक बोलतील ते खरे (वा.प्र.)
२९) उथळ आकार
३०) सूर्याचे एक नाव
३१) सोयीचे आश्रयस्थान म्हणून स्वीकारलेला अरण्यवास
३४) मऊ
३५) पापच्या विरुद्ध
३६) आकाशयान
३८) माया, प्रेम ३९) देह
४०) पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
४२) पृथ्वी
४४) फळाचे साल
४५) सामन्यातील पराक्रमी खेळाडू
४८) संताप
५०) तापापूर्वीची पूर्वचिन्हे
५१) जिवलग मित्र
५४) वक्र
५९) मावशीच्या संबंधीचे नाते दाखविणारा शब्द
६१) काकडीची एक जात
६२) रक्षण, सांभाळ
६३) अंड्यातील पिवळा भाग
६४) पिकांवर पडणारा एक रोग
६५) विश्रांती
६६) टक्कर
६८) बस्तान
७०) हात

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



## आशियाई क्रीडा स्पर्धा
### भगव्या रंगाचा वाद मिटला; हॉकी महासंघाचे अध्यक्ष तिर्की यांची माहिती

# पुन्हा निळ्या जर्सीला प्राधान्य

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला हॉकी संघ पुन्हा एकदा आपल्या पारंपरिक निळ्या रंगाच्या जर्सीमध्ये मैदानात उतरणार आहेत. हॉकी जर्सीच्या रंगात अचानक बदल करून भगवा रंग लागू करण्यात आल्यानंतर मोठ्या प्रमाणावर वाद निर्माण झाला होता. तीव्र वादानंतर भारतीय हॉकी महासंघाने (हॉकी इंडिया) पुन्हा जुना निळा रंग बहाल करण्याचा निर्णय घेतला आहे. महासंघाचे अध्यक्ष दिलीप तिर्की यांनी स्वत: याविषयी माहिती दिली.

नेदरलँड्स आणि बेल्जियम येथे ऑगस्ट महिन्यात एफआयएच विश्वचषक स्पर्धेदरम्यान भारतीय हॉकी संघाच्या जर्सीचा रंग निळ्यावरून भगवा करण्यात आला होता. या निर्णयावरून क्रीडा वर्तुळात तसेच राजकीय क्षेत्रातही तीव्र पडसाद उमटले. विरोधी पक्षांनी या मुद्द्यावरून सरकारवर थेट निशाणा साधला होता. याशिवाय, माजी कर्णधार वीरेन रस्किन्हा, परगट सिंग, धनराज पिल्ले आणि अजितपाल सिंग यांसारख्या अनेक दिग्गज खेळाडूंनीही जर्सीचा रंग बदलण्याच्या निर्णयावर सार्वजनिकरीत्या प्रश्न उपस्थित केले होते. निळ्या रंगाच्या टर्फवर निळ्या जर्सीत खेळताना खेळाडूंना दृश्यमानतेचा त्रास होतो, असा तर्क रंग बदलामागे देण्यात आला होता.



जर्सी बदलावरून निर्माण झालेला वाद अध्यक्ष दिलीप तिर्की यांच्या विधानामुळे अधिकच वाढला होता. निवडून आलेले नेतृत्व आणि कार्यकारी मंडळाला अंधारात ठेवून हा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप तिर्की यांनी केला होता. आशियाई क्रीडा स्पर्धेत जाणाऱ्या भारतीय पथकाच्या निरोप समारंभादरम्यान तिर्की यांनी यावर स्पष्टीकरण दिले. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) किटच्या रंगांबाबत दिलेले पर्याय पाहता हॉकी इंडियाने निळ्या रंगाची पहिली पसंती म्हणून निवड केली असून नारंगी रंग हा दुसरा पर्याय असेल. विश्वचषकापूर्वीच भगवी जर्सी कायमस्वरूपी नसून भविष्यात बदलली जाऊ शकते, असे सांगितले होते. आता आशियाई क्रीडा स्पर्धेत संघ निळ्या जर्सीमध्येच खेळेल, असे तिर्की यांनी स्पष्ट केले.

विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष हॉकी संघाची कामगिरी निराशाजनक झाली असून संघ आठव्या स्थानावर फेकला गेला होता. दुसरीकडे, महिला संघाने १९७४ नंतरची आपली सर्वोत्कृष्ट कामगिरी नोंदवत पाचवे स्थान पटकावले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून आगामी २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकचे थेट तिकीट मिळवण्याची आणि आशियाई स्तरावर आपले वर्चस्व सिद्ध करण्याची मोठी संधी भारतीय संघांना मिळणार आहे.

### भारताचे दोन्ही संघ जपानला रवाना

विश्वचषक स्पर्धेतील निराशाजनक कामगिरी विसरून, भारतीय हॉकी संघांनी आपल्या त्रुटी शोधून त्या सुधारण्यावर लक्ष केंद्रित करावे, असा सल्ला केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांनी दिला आहे. आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेद्वारे २०२८च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकचे थेट पात्रता तिकीट मिळवणे हेच भारतीय हॉकी संघांचे प्रमुख ध्येय असायला हवे, असे त्यांनी स्पष्ट केले. क्रीडामंत्र्यांनी सोमवारी भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साइ) मुख्यालयात सुमारे एक तास चाललेल्या विशेष बैठकीत दोन्ही हॉकी संघांच्या कामगिरीचा आढावा घेतला. या बैठकीला पुरुष हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन, कर्णधार हरमनप्रीत सिंग, महिला संघाचे प्रशिक्षक शोर्ड मरीन, कर्णधार सलिमा टेटे यांच्यासह हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की, सरचिटणीस भोलानाथ सिंग, क्रीडा सचिव हरी रंजन राव, टॉप्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी एन. एस. जोहल आणि साइचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. भारताचे दोन्ही हॉकी संघ बैठकीपूर्वीच जपानला रवाना झाले होते.

## निवडक

### अल्काराझला यूएस ओपनमधून बाहेर

**नवी दिल्ली :** यूएस ओपन २०२६ च्या पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या कार्लोस अल्काराझला, आठव्या क्रमांकावर असलेल्या अमेरिकन खेळाडू बेन शेल्टनने पराभूत केले. या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात, शेल्टनने गतविजेता अल्काराझचा चुरशीच्या लढतीत पराभव केला. या पराभवामुळे कार्लोस अल्काराझच्या सलग ८ ग्रँड स्लॅम विजयाची मालिका संपुष्टात आली. बेन शेल्टनविरुद्धचा हा उपांत्यपूर्व फेरीचा सामना पाच सेटपर्यंत चालला, ज्यात कार्लोसने केवळ दोनच सेट जिंकले.



कार्लोस अल्काराझचा शेवटचा ग्रँड स्लॅम स्पर्धेतील पराभव २०२५ च्या विम्बल्डनच्या अंतिम सामन्यात जॅनिक सिनरविरुद्ध झाला होता. अल्काराझने पहिला सेट टायब्रेकमध्ये जिंकला. दुसऱ्या सेटमध्ये शेल्टनने जबरदस्त पुनरागमन करत तो सेट जिंकला. त्यानंतर तिसऱ्या सेटमध्येही शेल्टनने सहज विजय मिळवला. मग चौथ्या सेटमध्ये अल्काराझने जबरदस्त पुनरागमन करत तो सेट जिंकला. पाचवा आणि निर्णायक सेट बरोबरीत सुटला आणि तो टायब्रेकमध्ये गेला. टायब्रेकमध्ये शेल्टनने विजय मिळवला. शेल्टनचा सामना आता उपांत्य फेरीत फ्रान्सिस टियाफोशी होईल.

### आरसीबीसी लेजंड्सचे सलग दोन विजय

**पुणे :** डेक्कन जिमखाना क्लबच्या वतीने आयोजित व्योहर-डेक्कन जिमखाना करंडक क्यु स्पोर्ट्स आंतरक्लब लीग २०२६ स्पर्धेत आरसीबीसी लेजंड्स संघाने सलग दोन विजय नोंदवून वर्चस्व गाजवले. दुसऱ्या बाजूला, कोरिंथियन ग्लॅडिएटर्स आणि पुना क्लब मॅजिशियन्स् या दोन्ही संघांनी एकमेकांना कडवी झुंज देत प्रत्येकी एक विजय मिळवला. पुना क्लब, आरसीबीसी आणि कोरिंथियन क्लबच्या बिलीयर्डस् व स्नुकर हॉलमध्ये झालेल्या या साखळी लढतींमध्ये अत्यंत चुरशीचे निकाल पाहायला मिळाले. पहिल्या सामन्यात कोरिंथियन ग्लॅडिएटर्सने पुना क्लब मॅजिशियन्स्चा पराभव केला. पहिल्या डावात कोरिंथियनच्या राजिव लाल याने कपिल पंजाबीचा पराभव केला.पुना क्लबच्या विघ्नेश संघवीने विराफ बोकदावाला याच्यावर सहज मात करत बरोबरी साधली. दुहेरीच्या लढतीत कोरिंथियनच्या झुबिर शेख व विनीत पारकेरीया जोडीने अंगद सहानी व अनिल काकडे या जोडीचा पाडाव केला. पुढील लढतीत पुना क्लबच्या दिनेश मेहतानीने सिध्दार्थ वर्माचा असा पराभव करून संघाला बरोबरी मिळवून दिली. निर्णायक सामन्यात कोरिंथियनच्या रजत फरसवालने अव्वल मानांकित सुरज राठीचा ७३-२९ असा पराभव करत अनपेक्षित निकालासह संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.परतीच्या सामन्यात पुना क्लब मॅजिशियन्स्ने अप्रतिम पुनरागमन केले. त्यांनी कोरिंथियन ग्लॅडिएटर्सचा ३-२ असा पराभव करून आधीच्या पराभवाचा वचपा काढला.



## गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीचा वर्धापन दिन साजरा

**| रसायनी | प्रतिनिधी |**




गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीच्या १० गौरवशाली वर्षपूर्तीनिमित्त आयोजित जीटीए कप २०२६ क्योरुगी आणि पुमसे चॅम्पियनशिप स्पर्धा वारकरी भवन, सीबीडी बेलापूर येथे उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील नेरुळ, कोपरखैरणे, पनवेल, नवीन पनवेल आणि उलवे या अकॅडमीच्या पाचही प्रशिक्षण केंद्रांतील १२५ हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेत आपल्या तायक्वांदो कौशल्याचे दमदार प्रदर्शन केले.

अकॅडमीच्या नवीन १०० ब्रँडेड मॅट्स आणि अत्याधुनिक सेन्सर प्रणालीवर ही स्पर्धा घेण्यात आल्याने स्पर्धेला विशेष आकर्षण प्राप्त झाले. आंतरराष्ट्रीय दर्जाची अशी यंत्रणा उपलब्ध असलेल्या भारतातील मोजक्या तायक्वांदो अकॅडमींपैकी गुरुकुल तायक्वांदो अकॅडमी एक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

क्योरुगी आणि पुमसे या दोन्ही प्रकारांत विविध वयोगटातील खेळाडूंनी शिस्त, आत्मविश्वास, तांत्रिककौशल्य आणि क्रीडाभावनेचे उत्कृष्ट दर्शन घडविले.

स्पर्धेचे नेतृत्व आंतरराष्ट्रीय पंच, आशियाई पुरस्कार विजेते आणि अकॅडमीचे संस्थापक तुषार सिनलकर यांनी स्पर्धा प्रमुख म्हणून काम केले. तर राष्ट्रीय पंच व मुख्य प्रशिक्षक रोहित सिनलकर यांनी नियोजन समितीचे नेतृत्व करत स्पर्धेचे काटेकोर नियोजन व दिमाखदार आयोजन केले.

या कार्यक्रमाला तेरणा विद्यालयाच्या मुख्य प्रशासकीय अधिकारी अनिसा पटेल, ॲड. सुरेखा भुजबळ, ग्लोरी शिप मॅनेजमेंटचे राजेश शाही तसेच अकॅडमीचे संचालक तानाजी सिनलकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन कोमल झेंडे आणि रेणुका शुक्ला यांनी केले.स्पर्धेच्या सांगता समारंभात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडू तसेच पंचांचा विशेष गौरव करण्यात आला.

## क्रीडा प्रमाणपत्राची पडताळणी तीन महिन्यांत करणे गरजेचे

**| मुंबई | प्रतिनिधी |**

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय आणि इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५ टक्के आरक्षणाबाबत सुसूत्रता तसेच एकसंधता आणण्यासाठी सुधारित धोरण लागू करण्यास मंगळवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या सुधारित धोरणानुसार आरक्षणासाठी पात्र खेळाडूंना तीन महिन्यांच्या मुदतीत क्रीडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करून घेणे आवश्यक आहे.

खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी नोकरीसाठी ५ टक्के आरक्षणाबाबतचे सुधारित धोरण लागू करण्यात येत आहे. हे आरक्षण मंत्रालयीन विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, महानगरपालिका, शासकीय उपक्रम, मंडळे, महामंडळे अशा सर्व प्रकारच्या संस्था, मंडळांच्या आस्थापनेवर गट-अ, ब, क आणि ड मधील सरळसेवेच्या पदांसाठी खेळाडूंना पाच टक्के समांतर आरक्षण लागू राहणार आहे. आरक्षणाबाबत धोरणात सुसूत्रता आणि एकसंधता आणण्यासाठी यापूर्वीचे सर्व शासन निर्णय रद्द करण्यात आले असून एकत्रित सुधारित धोरणासंबंधीचा शासन निर्णय लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल, असे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे.

## ब्राझील विरुद्ध भारत मैत्रीपूर्ण सामना

**नवी दिल्ली :** ब्राझीलचे स्टार खेळाडू विनीसियस ज्युनियर आणि राफिन्हा ३ ऑक्टोबर रोजी कोलकाता येथे भारताच्या विरोधात मैदानात उतरतील. प्रशिक्षक कार्लो एंसेलोटी यांनी ऑस्ट्रेलिया आणि भारताच्या विरोधात मैत्रीपूर्ण सामन्यांसाठी २६ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. यात विनीसियस, राफिन्हा, मार्क्विन्होस आणि ब्रुनो गुइमारेस यांसारख्या मोठ्या नावांचा समावेश आहे.

सामना कोलकाता येथील सॉल्ट लेक स्टेडियममध्ये संध्याकाळी ७:३० वाजता खेळला जाईल.२०२६ च्या वर्ल्ड कपमध्ये नॉर्वेकडून पराभूत होऊन राउंड ऑफ १६ मधून बाहेर पडल्यानंतर एंसेलोटी यांनी ब्राझीलच्या संघात बदल करण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी पेड्रो मोरिस्को, ओटाव्हियो, मौरो ज्युनियर, ब्रेनो बिडोन आणि गेब्रियल बोन्टेम्पो यांसारख्या युवा खेळाडूंना संधी दिली आहे. नेमारने वयाच्या ३४ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती घेतली आहे, तर कासेमिरो आणि गोलकीपर एलिसनला यावेळी संघात स्थान मिळालेले नाही.

## ऑस्ट्रेलिया अ मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था|**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने ऑस्ट्रेलिया अफसंघाविरुद्धच्या दोन चार दिवसीय आणि तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी भारत अ संघाची घोषणा केली आहे. दोन्ही फॉरमॅटमध्ये संघाचे नेतृत्व करण्यासाठी वेगवेगळ्या खेळाडूंना नियुक्त करण्यात आले आहे.

देवदत्त पडिक्कल दोन चार दिवसीय सामन्यांचे, तर ऋतुराज गायकवाड एकदिवसीय मालिकेत संघाचे नेतृत्व करेल. हार्दिक पांड्याचाही एकदिवसीय संघात समावेश करण्यात आला आहे, परंतु त्याचा सहभाग फिटनेस चाचण्यांवर अवलंबून असेल.

देवदत्त पडिक्कलला चार दिवसीय सामन्यांसाठी कर्णधार नियुक्त करण्यात आले आहे. साई सुदर्शनचेही संघात पुनरागमन झाले आहे. दुखापतीमुळे सुदर्शन श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत खेळू शकला नव्हता. आता तो ऑस्ट्रेलिया अ संघाविरुद्ध टीम इंडियात परतणार आहे. दुलीप ट्रॉफीमध्ये ईस्ट झोनसाठी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कुमार कुशाग्रचाही संघात समावेश करण्यात आला आहे.

## पीएनपी सायरस पूनावाला स्कूल नागावच्या गार्गी नाईकची सुवर्ण कामगिरी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

पीएनपी सायरस पूनावाला स्कूल, नागाव येथील सिनियर केजी वर्गातील विद्यार्थिनी गार्गी नाईक हिने सुवर्ण, अभिमानास्पद कामगिरी बजावली आहे.

६ सप्टेंबर रोजी नागपूर येथील ग्रामीण पोलीस मुख्यालयात ७ वी राज्यस्तरीय लाठी-काठी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पीएनपीच्या लहान आणि प्रतिभावान खेळाडू गार्गी नाईक हिने तिचे उत्कृष्ट कौशल्य आणि जिद्दीने रौप्य पदक द्वि-लाठी, सुवर्ण पदक द्वि-अणिका खेळ पटकावले. राज्यस्तरावरील तिच्या या नेत्रदीपक कामगिरीमुळे तिला वापी (गुजरात) येथे होणाऱ्या राष्ट्रीय लाठी काठी स्पर्धेत प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. इतक्या लहान वयात तिचा आत्मविश्वास, समर्पण, शिस्त आणि कठोर परिश्रम खरोखरच प्रेरणादायी आहेत. तिच्या या यशामुळे संपूर्ण पीएनपी संस्थेला अत्यंत अभिमान वाटत आहे.



या उत्कृष्ट कामगिरी बद्दल संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका गीतिका भूचर, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी गार्गी नाईक हिचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ज्युनियर आशिया कप
# भारताच्या मुलींनी पाकिस्तानचे वाजवले तीनतेरा

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था|**

भारत आणि पाकिस्तान हा सर्व पातळीवर युद्धाचा विषय मानला जातो. केवळ क्रिकेट या खेळातच नाही तर सर्वच खेळांमध्ये पाकिस्तानच्या संघाला मात देण्यासाठी भारतीय खेळाडू तयार असतात आणि आता महिला ज्युनियर आशिया चषक स्पर्धेत भारताने पाकिस्तानचा एकतर्फी सामन्यात पराभव केला आहे.

चीनमधील मोकी येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेच्या पहिल्या उपांत्यपूर्व फेरीत भारत आणि पाकिस्तान आमनेसामने आले होते. भारताने हा सामना १९-० अशा मोठ्या फरकाने जिंकला.

या महिला ज्युनियर आशिया कपमधील कोणत्याही संघाचा हा सर्वात मोठा विजय आहे. या विजयासह संघाने उपांत्य फेरी गाठली असून, तेथे त्याचा सामना दक्षिण कोरिया किंवा मलेशियाशी होणार आहे.



भारताकडून सामन्यातील पहिला गोल ७व्या मिनिटाला झाला. हा गोल पूजा साहूने पेनल्टी कॉर्नरवर केला. पहिल्या क्वार्टरमध्ये पाच गोल झाले आणि भारताने फक्त दुसऱ्या क्वार्टरमध्ये गोल केला. तिसऱ्या क्वार्टरमध्ये पाकिस्तानने चांगला खेळ केला पण यावेळीही भारताने तीन गोल केले. शेवटच्या क्वार्टरमध्ये सर्वाधिक ६ गोल झाले. अशा प्रकारे भारताने सामन्यात एकूण १९ गोल केले.

या सामन्यात भारतासाठी १३ खेळाडूंनी गोल केले. पूजा मलिकने २७व्या, ४९व्या आणि ५१व्या मिनिटाला गोल नोंदवत संघाची हॅट्ट्रिक पूर्ण केली.

तर रोशनी, सानिका चंद्रकांत माने, मधु सिदार आणि सुप्रिया यांनी प्रत्येकी दोन गोल केले. पूजा साहू व्यतिरिक्त तनुश्री दिनेश कडू, सुखवीर कौर, गीता यादव, तनुजा टोप्पो, पूर्णिमा यादव, कृष्णा शर्मा आणि बिनिमा धन यांनी प्रत्येकी १ गोल केला.

## रायसोनी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धा
### ११५ खेळाडूंनी नोंदविला स्पर्धेत सहभाग
# खुल्या गटात उमेश कुलकर्णी प्रथम

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जी.एच.रायसोनी स्मृती चषक रायगड स्पर्धा रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेने आयोजित केली होती. या स्पर्धेत ११५ जणांनी सहभाग नोंदविला. पंच म्हणून आविष्कार मारभळ, चंद्रशेखर पाटील, श्रेयस पाटील, सुशील गुरव, तुषार देशपांडे यांनी काम पाहिले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष विलास म्हात्रे, सुशील गुरव, चंद्रशेखर पाटील, आल्हाद पाटील, स्नेहल म्हात्रे आदी उपस्थित होते.





१३ वर्षाच्या गटामध्ये प्रथम क्रमांक आशुतोष प्रसाद, द्वितीय क्रमांक हर्ष दळवी, तृतीय क्रमांक यश पाटील, चतुर्थ क्रमांक मृण्मयी केळकर, पाचवा क्रमांक आदित्य भोस्टेकर आणि सहावा क्रमांक स्वर पटेल यांनी पटकावला. स्वरा साईदेव आणि ओजस्वी थळे यांनी रोख रक्कम मिळविली. अकरा वर्षाखालील मुलीमध्ये ओवी म्हात्रे, निधी रोगे, गार्गी राऊत, अनुष्का कोळी आणि किमया बारगुडे यांनी तर मुलांच्या गटांमध्ये कार्तिक बांदल, विहांग पाटील, आईद्वात ठमके, नवनाथ भगत आणि सार्थ पोवळे, नऊ वर्षाच्या गटांमध्ये अन्वय कुलकर्णी, मानस पेंडसे आणि अर्णव पेणकर तर ९ वर्षाचे गटात आर्वी राणे, मृण्मयी केळकर आणि शर्वरी कदम तर ऋषिकेश वेळे यांनी ट्रॉफी देण्यात आल्या.

सतरा वर्षाखालील गटांमध्ये प्रथम क्रमांक कौस्तुभ भगत, गौतम पवार, प्रथमेश वेल्हाळ, विदेहा मेटकर, अपेक्षा मारभळ, सेजल चांदोरकर, आर्या जाधव, अविनाश ल्हासे, रुद्राक्ष खुतवाल आणि अस्मित पल्लकपरांबिल यांनी रोख बक्षीस आणि ट्रॉफी मिळवली.उत्तेजनार्थ म्हणून अपेक्षा राऊत अथर्वा घरत, वैदेही तेटगुरे, बसील फकी, श्रेयश भोईर, अर्णव पालकर, स्मित कोळवणकर आणि शर्विल कदम यांनी ट्रॉफी मिळविल्या.

खुल्या गटांमध्ये प्रथम क्रमांक उमेश कुलकर्णी, धीरज पाटील, विश्वदीप जाधव, सुयश वाटोरे, अतुल काकडे, अमर गोडबोले, प्रशांत चव्हाण, वेदांत मेहता, गोवर्धन वसावे आणि काशीद मामुनकर यांनी बक्षिसे, ट्रॉफी मिळवली तर उत्तेजनार्थ शिफा शेख, ज्येष्ठ खेळाडू गटामध्ये श्रीकांत शेरे, जनार्दन पुगावकर, प्रकाश कुमार केंद्रे, तसेच अलिबाग खेळाडू म्हणून राजेंद्र वेळे, भावेश वेळे, सन्मिल गुरव, अविनाश ल्हासे, मंदार शिंदे आणि अंश पाटील यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. अलिबागच्या उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे यांनी शाळांमध्ये बुद्धिबळाची माहिती, प्रचार आणि प्रसारासाठी काही कार्यक्रम घेण्याची माहिती दिली. स्पर्धेच्या बक्षीस समारंभावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपनगराध्यक्षा ॲड.मानसी म्हात्रे, नगरसेविका ॲड. अश्विनी ठोसर, अलिबाग कारागृह, अधीक्षक विशाल बांदल आणि अमर गोडबोले आदी उपस्थित होते.

## नागोठण्यातील तनया जैनची नेमबाजीत नेत्रदीपक कामगिरी

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या वेस्ट झोन शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये विलेपार्ल्यातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलातील प्रतिभावान नेमबाज तनया निलेश जैन हिने आपल्या अचूक आणि दमदार नेमबाजीचे दर्शन घडवत १० मीटर एअर रायफल प्रकारात तब्बल चार सुवर्णपदकांची कमाई केली.

तनिया जैन ही नागोठण्यातील सामाजिक कार्यकर्ते सुभाष जैन यांची नात असल्याने तिच्या या कौतुकास्पद कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तनयाने या स्पर्धेत सीनियर, ज्युनियर, युथ आणि सब-युथ अशा चारही गटांत अव्वल स्थान पटकावत आपले वर्चस्व सिद्ध केले.




तिने ४०० पैकी तब्बल ३९७ गुण मिळवत नेमबाजीतील आपली गुणवत्ता आणि सातत्य अधोरेखित केले. चार गट, चार विजय आणि चार सुवर्णपदके, अशी दैदिप्यमान कामगिरी करत तनया जैनने आपल्या महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. तिच्या या यशामुळे प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या शिरपेचातही आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

तनयाच्या या उल्लेखनीय यशामागे तिचे प्रशिक्षक स्नेहल जितेश कदम आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे अचूक मार्गदर्शन, प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलातील सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि अविरत सराव तसेच अध्यक्ष अरविंद प्रभू यांचे वेळोवेळी खेळाडूंना मिळालेले प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले. त्याचबरोबर तनयाची जिद्द यामुळे तिने हे यश संपादन केले. तनयाच्या या शानदार कामगिरीबद्दल तिचे प्रशिक्षक, क्रीडा संकुलातील पदाधिकारी आणि क्रीडाप्रेमींकडून तिचे अभिनंदन करण्यात येत आहे. नेमबाजीच्या क्षेत्रात तनया भविष्यातही अशीच दमदार कामगिरी करत देशाचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास तिच्या प्रशिक्षकांनी व्यक्त केला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)